साप्ताहिक
माणूस
१ ऑक्टोबर ८३/दोन रुपये

# ऊसाकडून निलगिरी



# लग्न आणि सहजीवन

एकानं सांगायचं आणि दुसऱ्यानं ऐकायचं हे सहजीवन आहे ?

एकाच्या मोठेपणासाठी दुसऱ्यानं त्याग करायचा हे सहजीवन आहे ?

एका घरात राहून एकमेकांशी संवाद नसणं हे सहजीवन म्हणायचं ?

एकानं मागणं न् दुसऱ्यानं बिनतक्रार पुरवणं यातून सहजीवन खरंच आकार घेतं ?

सतत एकमेकांचे पाय ओढत राहणं, मनं कुरतडणं हे सहजीवन आहे का ?

मरत आणि मारत राहण्यासाठी का लग्नं करायची ?

सुखी आणि यशस्वी संसार कशाला म्हणायचं ?

घटस्फोट न घेता अनेक वर्षं एकत्र राहिलं म्हणून ?

पैसा मिळवला म्हणून ?

मुलं झाली म्हणून ?

कीर्ती मिळाली म्हणून ?

सहजीवनाशिवाय या साऱ्याला अर्थ असतो ?

प्रत्येकाला अंतर्मुख करणारा **शोभा भागवत** यांचा विशेष लेख !

# कारकुनी विश्वाचं हे इंद्रधनुष्य

सरकारी नोकरीत कारकुनांचा एक अफाट समुद्र असतो. त्यात खळबळी जास्त. उसळणाऱ्या लाटा क्वचित ! सरकारी यंत्रणा नामक किनाऱ्याला धडकून या लाटा पुन्हा पूर्ववत होतात. ३७-३८ वर्षांच्या सरकारी सेवेत सांगण्यासारखं जमत जातंच. ' नाझी भस्मासुराचा उदयास्त ' या प्रसिद्ध ग्रंथाचे लेखक **श्री. वि. ग. कानिटकर** यांचा सरकारी नोकरीतले अनुभव, किस्से त्यांच्या खास विनोदी शैलीत सांगणारा एक खुसखुशीत लेख.

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : तेविसावे

अंक : अठरावा

¤

१ ऑक्टोबर १९८३

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

संजय पवार

# इथून - तिथून

## जनता राजवट आणि रशिया

१९७९ साली जनता सरकार पाडण्याचा घाट रशियाने घातला होता, याचा पडताळा देणारे एक पत्र नुकतेच कलकत्त्याच्या 'दि टेलिग्राफ'ने प्रसिद्ध केले आहे. त्या वेळचे अमेरिकेतील भारताचे राजदूत प्रसिद्ध विधिज्ञ नानी पालखीवाला यांनी यासंबंधी माहिती देणारे पत्र जनता सरकारचे पंतप्रधान मोरारजी देसाई यांना पाठवले होते. त्या पत्राची फोटोस्टॅट प्रत टेलिग्राफने प्रसिद्ध केली आहे.

श्री. पालखीवाला आपल्या पत्रात लिहितात : 'गेल्या आठवड्यात अमेरिकेतल्या परराष्ट्रखात्याच्या अधिकाऱ्यांनी मला बोलावून घेतले. आणि अत्यंत गुप्त अशी माहिती अमेरिकेच्या इंटेलिजन्स विभागाला मिळाली होती, ती मला सांगितली. त्यानुसार रशियन सरकारने भारतातले जनता सरकार पाडण्याचे ठरवले असून त्यादृष्टीने भारतातल्या काही निवडक कम्युनिस्ट पक्षाच्या सदस्यांना संदेशही गेले आहेत. यासंबंधी मी शंका व्यक्त करताच हे अधिकारी मला म्हणाले की, तुमचा यावर विश्वास बसला नाही तरी हे पूर्णपणे खरे आहे. शेवटी मी हे सारे आपणाला कळवायचे ठरवले आहे. यासंबंधी तुम्हीच ठरवू शकता.'

या पत्रावरची तारीख आहे २२ जानेवारी ७९. महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यानंतरच्या दोन महिन्यांनीच जनता पक्षातील वादावादी आणि फाटाफुटीच्या राजकारणाला कडवे रंग चढले आणि जुलै महिन्यात सरकार साफ कोसळले सुद्धा !

## व्हिडिओ विरुद्ध सिनेमासृष्टी

व्हिडिओवरून दाखवण्यात येणाऱ्या सिनेमासाठी परवाना आवश्यक आहे का ? व्हिडिओ शो सार्वजनिक ठिकाणी करता येतो का ? त्यामुळे कॉपीराइटच्या हक्काला बाध येतो का ? असे अनेक प्रश्न सध्या चित्रपटसृष्टीत उभे राहिले असून व्हिडिओला विरोध करण्याचा निर्णय जवळपास बहुतेक संघटनांनी घेतला आहे. या घडामोडीतली सर्वांत महत्त्वाची घटना म्हणजे कोल्हापूरच्या सिने एक्झिबिटर्स असोसिएशनने कोल्हापूर शहरातील पाच वेगवेगळ्या ठिकाणी दाखवण्यात येणाऱ्या व्हिडिओ सिनेमांविरुद्धचा अर्ज कोल्हापूर न्यायालयात दाखल केला आहे.

या वादीतर्फे वकिलांनी म्हटले आहे की, व्हिडिओ सिनेमा दाखवला जातो त्या ठिकाणी हॉटेले किंवा शीत पेयांचा व्यवसाय आहे. सिने एक्झिबिटर्स असो. चे सदस्य असलेले थिएटरमालक करारापोटी ज्या फिल्मस् प्रदर्शनासाठी घेतात, त्याच्या मुदतीपुरत्या हक्कावर या व्हिडिओ सिनेमांमुळे बाध येतो.

तसेच करमणूक-कर गोळा करून सरकारला देणे, सार्वजनिक ठिकाणी सिनेमाचे प्रदर्शन करणे या गोष्टी कायद्याला धरून आमचे सभासद करतात. ज्यांना या स्वरूपाचा व्यवसाय करावयाचा असेल त्यांना १९५३ चा मुंबई सिनेमा (रेग्युलेशन) कायदा, १९२८ चा मुंबई करमणूक कर कायदा, १९५२ चा सिनेमॅटोग्राफ कायदा आणि १९५७ चा कॉपीराइट-कायदा याखाली व्यवसाय करावा लागेल, असेही वकिलांनी अर्जात म्हटले आहे.

दरम्यान राजस्थान हायकोर्टाने व्हिडिओवर सिनेमा दाखवणे कायदेशीर असल्याचा एक निकाल दिल्यामुळे तिथे व्हिडिओची लाटच आली आहे. हॉटेलातून हे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे काही सिनेमागृहे बंद पडली आहेत.

'फिल्म फेडरेशन ऑफ इंडिया' या संस्थेचे अध्यक्ष श्रीराम बोहरा, 'फिल्म प्रोड्यूसर्स गिल्ड ऑफ इंडिया' चे अध्यक्ष जी पी. सिप्पी, टी. सी. देवन आणि विजय आनंद यांनी नुकतीच केंद्रीय माहिती-नभोवाणीमंत्री एच्. के. एल. भगत यांची भेट घेतली. या शिष्टमंडळाने श्री. भगत यांना १९५७ च्या कॉपीराइटॲक्टमध्ये सुधारणा करावी असे सुचवले आहे. देशात बहुतेक ठिकाणी व्हिडिओवरून सिनेमा दाखवण्याची केंद्रे सुरू झाली असल्याने हा कायदा बदलावा अशी सूचना आहे. यासंबंधी आपण विचार करीत असून कायद्यात सुधारणा करण्याचा प्रश्न संसदेच्या हिवाळी अधिवेशनात चर्चेला येईल असे श्री. भगत यांनी सांगितले. श्री. बोहरा यांनी कॉपीराइटचा भंग करणाऱ्याला कडक शिक्षा सुचवली असून कॉपीराइटची सरकारदप्तरी नोंद करण्याची पद्धत सुलभ असावी असेही म्हटले आहे. ☐

मुखपृष्ठ छायाचित्रात — श्री. दादासाहेब बिडकर, श्री. विनायकराव पाटील व निलगिरी मोहिमेतील इतर सहकारी.

# "रामराव आदिक इंजिनिअरिंग कॉलेज, नव मुंबई" या लेखावरील दोन प्रतिक्रिया

## ( १ ) टीका विधायक नाही

'एक तेजीत चालू शकणारा धंदा – रामराव आदिक इंजिनिअरिंग कॉलेज नव मुंबई' हा १० सप्टेंबर १९८३ च्या 'माणूस' च्या अंकात प्रसिद्ध झालेला आणि शीर्षकाला मुखपृष्ठावर स्थान देऊन विशेष महत्त्व दिलेला लेख वाचण्यात आला. 'माणूस' मधील टीका जरूर प्रखर असते; पण तिला विधायक दृष्टीचे अधिष्ठान असते. त्याचा आढळ या लेखात घडत नाही म्हणून या विषयाची ही दुसरी बाजू.

अभियांत्रिकी शिक्षणाविषयी महाराष्ट्र शासनाने स्वीकारलेल्या धोरणाबाबत 'विद्वानां'त मतभिन्नता आहे आणि याबाबत उलटसुलट चर्चाही वर्तमानपत्रांतून होत राहिली आहे. मतभिन्नता असू शकते. तथापी महाराष्ट्र शासनाच्या या धोरणाला महाराष्ट्रातील जनतेने आणि गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला आहे ही वस्तुस्थिती आहे. शासनाचे हे धोरण योग्य की अयोग्य याची कसोटी अखेर काळच ठरवील! कारण टीका होत असतानाच, धोरणाची अंमलबजावणीही होत राहिली आहेच.

विष्णू जयदेव यांनी महाराष्ट्रात सुरू झालेल्या सर्वच अभियांत्रिकी महाविद्यालयांचे विशुद्ध शैक्षणिक दृष्टीने व्यापक मूल्यमापन करून काही विधायक विचार मांडले असते तर ते शैक्षणिक जगताच्या दृष्टीने उपकारक ठरले असते. तथापी असे न करता केवळ रामराव आदिक इंजिनिअरिंग महाविद्यालयाला आणि त्या निमित्ताने मा. आदिक आणि मा. डी. वाय्. पाटील यांना 'लक्ष्य' बनवण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्रात चौतीस इंजिनिअरिंग महाविद्यालये सुरू होऊनही फक्त रामराव आदिक इंजिनिअरिंग महाविद्यालयालाच 'टारगेट' बनविण्याचा प्रयत्न 'माणूस'प्रमाणेच इतर काही वृत्तपत्रांतून का होत आहे? त्यामागे राजकीय हेतूने कार्यरत असणारा एखादा 'गट' असावा की काय अशी शंका येते.

अशी शंका येण्याचे कारण पुढीलप्रमाणे आहे.

(१) महाराष्ट्रात नव्याने सुरू झालेल्या अनेक महाविद्यालयांची नावे पाहिली तर मा. वसंतदादांच्यापासून एखाद्या आमदाराच्या नावापर्यंत अनेक व्यक्तिनामे आढळतात. केवळ मा. आदिकांचेच नव्हे. महाविद्यालयाच्या नावाचे निमित्त करून मा. आदिकांनाही गोवण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. खरे तर सर्वत्र 'व्यक्तिनामे' देण्यात आढळणाऱ्या प्रवृत्तीवर टीका व्हायला हवी. फक्त एखाद्या नावापुरती नव्हे.

(२) सिडकोने आपली इमारत या संस्थेला कोणत्याही निवेदा न मागविता दिल्याची एकांगी माहिती विष्णू जयदेव देतात. त्याच वेळी रयत शिक्षणसंस्था सातारा, भारती विद्यापीठ पुणे, किंग जॉर्ज स्कूल, बॉंबे सोसायटी, न्यू एज्युकेशन सोसायटी मुंबई, होलीक्रॉस हायस्कूल इ. मान्यवर संस्थांना सिडकोने आपल्या इमारती दिल्या आहेत याचा उल्लेख का टाळतात? अन्य संस्थांना ज्या अटी आणि शर्तीवर इमारती दिल्या आहेत त्याच अटी व शर्तीवर याही कॉलेजला इमारत दिली आहे. मग सिडकोने फक्त या संस्थेवर 'खास मेहरबानी' केली आहे असा सूर काढण्याची आवश्यकताच का भासावी? उलट सिडकोचे धोरण स्वागतार्हच आहे.

(३) व्ही. जे. टी. आय. मध्ये प्रात्यक्षिके आयोजित केली जाणार आहेत हे सांगून त्यामुळे व्ही. जे. टी. आय. चे विद्यार्थी आंदोलन करण्याच्या विचारात आहेत असा शोध (?) ही लेखकाने लावला आहे. व्ही. जे. टी. आय. मधील प्रात्यक्षिके शनिवार, रविवार या सुट्टीच्या दिवशी आयोजित केली जाणार आहेत. व्ही. जे. टी. आय. मध्ये केलेली प्रात्यक्षिक सुविधा तात्पुरती म्हणजे डिसेंबर १९८३ पर्यंतच आहे. वस्तुस्थितीचा विपर्यास करताना गोवा आणि नांदेड येथील विद्यार्थी प्रात्यक्षिकासाठी अजूनही व्ही. जे. टी. आय. मध्ये येतात, याचा निर्देश लेखकाने का टाळावा? गोवा, नांदेड येथील विद्यार्थ्यांची सोय पाहणाऱ्या व्ही. जे. टी. आय. ने नव्या मुंबईतील इंजिनिअरिंग महाविद्यालयाला सहकार्य केले तर बिघडले कुठे?

(४) मुंबई विद्यापीठाच्या कार्यकारिणी समितीचा विरोध असतानाही मा. उपकुलगुरु मा. गोरे यांनी खास अधिकार वापरून रामराव आदिक महाविद्यालयाला मान्यता दिली म्हणजे मा. रामराव आदिकांच्या नावामुळे 'कृपाछत्र' धरले! महाराष्ट्रातील अन्य विद्यापीठांनी आपल्या कार्यक्षेत्रात निघालेल्या इंजिनिअरिंग महाविद्यालयांना जणू मान्यताच दिली नाही? शिवाजीच्या कणबरकरसाहेबांनी, पुण्याच्या ताकवलेसाहेबांनी वा मराठवाडा, नागपूरच्या कुलगुरूंनी काय केले? सर्वच विद्यापीठांनी आपल्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांना मान्यता दिली आहे. गोरेसाहेबांनी काय विशेष केले?

(५) नवीन महाविद्यालय वा महाविद्यालयात नवा अभ्यासक्रम सुरू करावयाचा झाला तर आधीच्या शैक्षणिक वर्षात विद्यापीठाकडे अर्ज करावा लागतो. असे अर्ज किती नव्या महाविद्यालयांनी केले होते? कोणत्याच नाही आणि ते शक्यही नाही. कारण इंजिनिअरिंग कॉलेजिस सुरू करण्याचा निर्णय शासन १९८३–८४ या शैक्षणिक वर्षात घेते. त्याची अंमलबजावणीही १९८३–८४ मध्येच होते आणि संस्थांनी मात्र १९८२–८३ मध्ये अर्ज केले पाहिजेत अशी अपेक्षा कशी करता येईल? कोणत्याच महाविद्यालयाने अर्ज केलेला नसताना, फक्त रामराव आदिक इंजिनिअरिंग महाविद्यालयाचा अर्जही नसताना मान्यता दिली असा जावईशोध लावण्याची आवश्यकता नव्हती!

(६) डायरेक्टर ऑफ टेक्निकल बोर्ड मेरिट लिस्टवरून अॅडमिशन देते, ह्या नव्या कॉलेजातून दहा टक्के जागा मॅनेजमेंटच्या इच्छेनुसार ( at the discretion ) दिल्या जातील. तंत्रशिक्षण खात्याचा अथवा सरकारचा त्यांच्यावर ताबा नाही, असे लेखक

लिहितात. येथे 'ह्या' या दर्शक सर्वनामाचा वापर नसता तर विधान अधिक न्याय्य झाले असते. कारण केवळ 'ह्या' च महाविद्यालयात नव्हे तर सर्वच महाविद्यालयांतून अशा जागा सर्व मॅनेजमेंटना दिल्या आहेत. शिवाय त्यांच्यावर शासनाचा वा खात्याचा ताबा नाही हेही अर्धसत्य आहे. कारण या जागांवर प्रवेश देताना विद्यार्थ्यास किमान ५०% गुण हवेतच; शिवाय उर्वरित सर्व जागा गुणवत्तेनुसार आहेत. फीआकारणीही शासनानेच ठरवून दिली आहे. त्या दरानेच निदान 'ह्या' महाविद्यालयात फी आकारली जाते. इतरत्र काय चालते याचा शोध जयदेवनी घेऊन 'माणूस' मध्ये मांडावा.

(७) 'इंजिनिअरिंग महाविद्यालये म्हणजे तेजीत चालणारा धंदा' असल्याचे जयदेवांच्या दृष्टीला दिसते. काय पहावे, दिसावे हे ज्याच्या त्याच्या दृष्टीवर अवलंबून आहे; पण प्रश्न असा की, शासनाने अनुदान दिले तर हा 'धंदा' असल्याचे कुणाला दिसणार नाही. कुणी सांगावे ? शासनाची आर्थिक स्थिती सुधारली तर भविष्यात शासन अनुदानही देईल. शिवाय फीआकारणीचे स्वातंत्र्य शासनाने संस्थांना दिलेलेच नाही. फी शासनानेच ठरवून दिली आहे. ती ठरविताना विद्यमान इंजिनिअरिंग महाविद्यालयांच्या खर्चाचा ताळमेळ शासनाने घेतला असावा.

## प्रस्थापितांचा विरोध

(८) भाऊराव पाटील 'कर्मवीर' कधी ठरले? कर्व्यांनाही 'महर्षि' ही किताबत केव्हा प्राप्त झाली ? या दोन्ही महापुरुषांनी आपल्या स्वीकृत कार्याला आरंभ केला तेव्हा प्रस्थापितांनी, सनातन्यांनी नाके मुरडलीच होती. भाऊरावासारखा ब्राह्मणेतर तरुण शैक्षणिक कार्याला वाहून घेत होता, तेव्हाही त्याला विरोध झाला होताच. शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या नवागतांना कर्मवीर भाऊरावांचा नि महर्षि कर्व्यांचा आठव देताना, स्वक्षेत्रातील बाळ गंगाधरांचा नि गोपाळ गणेशांचा आदर्श सोयिस्करपणे विसरला जावा यात नवल नाही. कर्मवीर भाऊरावांनी अध्ययन नि अध्यापन ही विशिष्ट वर्गाची मक्तेदारी मानली नव्हती. आज भाऊराव हयात असते तर महाराष्ट्र शासनाच्या इंजिनिअरिंग महाविद्यालयांच्या योजनेला त्यांच्या 'रयत'. महाराष्ट्राने दिलेला पाठिंबा पाहून आनंदच वाटला असता. म्हणूनच कर्मवीर भाऊरावांचा वसा घेतलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या विद्यमान नेतृत्वानेही इंजिनिअरिंग महाविद्यालय सुरू केले आहे.

(९) जुन्या, मान्यवर संस्थांचे इंजिनिअरिंग महाविद्यालयाचे किती प्रस्ताव शासनाने नाकारले आहेत यावर 'माणूस'ने प्रकाश टाकावा म्हणजे नव्या संस्थांना दोष देता येईल. प्रस्थापित संस्था शासनाच्या धोरणाला प्रतिसाद द्यायला पुढे आल्या नाहीत हा काही नव्या संस्थांचा गुन्हा नव्हे !

लेखात सत्याचा अपलाप करून असत्यालाच अशा पद्धतीने 'ट्विस्ट' केले आहे की असत्याचाच सत्याभास व्हावा — पण तो भासच. कारण—

(१) रामराव आदिक इंजिनिअरिंग महाविद्यालयात लेखक नोंदवितात त्याप्रमाणे विद्यार्थीप्रवेशक्षमता १२० नाही तर १९८ आहे. या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची अंतिम गुणवत्ता ८१% ची आहे.


(२) दि. २५ ऑगस्टला कॉलेजला भेट दिली त्या वेळी तिथे सामसूम होती आणि संस्थेच्या बोर्डावरील ट्रस्टींची नावे लिहून घ्यायला पहारेकरी विरोधही करीत होता म्हणे ! कॉलेज १ सप्टेंबरला सुरू होणार, विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांसाठी सोय म्हणून महाविद्यालयाचे तात्पुरते ऑफिस हिलग्रेंज हायस्कूलमध्ये ठेवलेले, अशा अवस्थेत तेथे गजबज असेलच कशी ? की १ तारखेच्या व्याख्यानासाठी २५ तारखेस विद्यार्थ्यांनी वर्गात गर्दी करावी अशी अपेक्षा ? त्याहीपेक्षा विनोद म्हणजे ट्रस्टीजच्या नावाची संगमरवरी खोदपाटी महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारात जाहीरपणे लावूनही, ट्रस्टींची नावे उतरून घ्यायला पहारेकरी म्हणे विरोध करत होता. ट्रस्टीजची नावे लपवावयाची तर ती मुळात न येणाऱ्या स्वरूपात, जाहीरपणे उघड्यावर लावण्याची आवश्यकता नव्हती ! म्हणजे चौकात बोर्ड करून लावायचा आणि येणाऱ्या—जाणाऱ्यांना तो 'पाहू' नका म्हणून सांगण्याचाच हा प्रकार !

(३) २५ ऑगस्टच्या भेटीच्या आधारे लिहिलेला वृत्तांत १० सप्टेंबरच्या अंकात प्रसिद्ध झाला. कॉलेज १ सप्टेंबरपासून सुरू होणार असल्याचे संस्थेने जाहीर केले होते. पुरेसा कालावधी होता. विष्णू जयदेव यांनी निदान एक सप्टेंबर रोजी कॉलेजमध्ये फेरफटका मारून लेखात केलेल्या विधानांची तपासणी करावयास हवी होती आणि मग वस्तुस्थिती मांडावयास हवी होती. १ तारखेला विष्णू जयदेव यांनी कॉलेजला भेट दिली असती तर काय दिसले असते ? १) सर्व वर्गांत फळे, प्राध्यापकासाठी डायस, विद्यार्थ्यांसाठी सनमाइकाचे सुंदर डेस्क आणि त्यावर विराजमान होऊन अध्ययन-अध्यापनात मग्न असलेला प्राध्यापकवर्ग २) १० ड्रॉइंगबोर्डस नव्हे (जयदेवांनी ड्रॉइंग टेबल्सनाच ड्रॉइंग बोर्ड म्हटले आहे.) तर ६६ सनमाइकाची सुंदर ड्रॉइंग टेबल्सनी सुसज्ज असलेला ड्रॉइंग हॉल. ३) वेल फर्निशड कार्यालय, स्टाफरूम आणि प्राचार्यांची केबिन त्यातील आवश्यक त्या कर्मचाऱ्यांसह ४) अत्याधुनिक सुविधांनी युक्त व फर्निशड् वसतिगृह आणि कॅन्टीन ५) ग्रंथालयासाठी येऊ लागलेल्या ग्रंथांचे संच आणि प्रयोगशाळा, वर्कशॉप यांच्या उभारणीचे काम आणि हे सर्व पाहिले असते तर विष्णू जयदेवांच्या लेखाचे स्वरूप बदलले असते. महाविद्यालयाच्या उभारणीचेच काम सुरू आहे, अजून बरीच साधनसामुग्रीची मागणी नोंदविली आहे, साधनसामुग्री येत आहे, येत राहणार आहे.

(४) गुणवत्ताप्राप्त व्यक्तींची नियुक्ती : मुंबई विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे स्थापन झालेल्या निवडसमितीने नेमणुका केल्या आहेत. प्राचार्यासह सर्व प्राध्यपक २ सप्टेंबरपासून कामावर रुजू झाले आहेत नि अध्यापनकार्यही सुरू आहे. माहितीसाठी त्यांची नावे व पात्रता पुढीलप्रमाणे—

१) प्राचार्य पी. एन ठाकरे — बी. ई. (इलेक्ट्रिकल)
एम. ई. (ॲटो कंट्रोल इंजिनिअरिंग)
सी. सी. आय. एस. ई.
डी. आय. आय. एस. सी. ई. (इंट. टेक)
एम. आय. सी. मेंबर आय. एस. आय. एम. आय. आय. एस. टी.
२) डॉ. एस. पी. सिंघ — एम. एस. सी., पीएच. डी.
३) डॉ. एस. जी. नेमलेकर — एम. एससी., पीएच. डी.

पृष्ठ ३१ वर



# मुंबापुरी

## संशयकल्लोळ–रणदुंदुभी–खडाष्टक

महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस ( आय ) ची ब्याण्णव सदस्यांची यादी बुधवारी जाहीर झाली. या यादीमुळे संघटना मजबूत बनेल आणि पक्षाला व्यापक दिशा मिळेल अशी पेटंट प्रतिक्रिया कॉंग्रेस ( आय ) च्या नेतेमंडळींनी व्यक्त केली आहे. ज्यांचं घोडं गंगेत न्हालं ते आशावाद व्यक्त करताहेत. ज्यांना अपेक्षेइतकं मिळालं नाही ते वादावाद सुरू करण्याच्या तयारीत गुंतले आहेत. बैठका सुरू झाल्या आहेत. मनसुबे तयार होताहेत.

राहिला पक्ष मजबूत करण्याचा प्रश्न. यासाठी महाराष्ट्रातल्या एकाही नेत्याची इंदिरा गांधींना गरज नाही. महाराष्ट्रातल्या थोर, तडफदार, तळागाळाचं नेतृत्व करणाऱ्या बाणेदार पुढाऱ्यांना इंदिराबाई काय किंमत देतात हे परवा विमानतळावर त्यांच्या स्वागताच्या वेळी लक्षात आलं. इंदिराजींना गुलाबाचं फूल देताना महाराष्ट्रातल्या तमाम दैदीप्यमान नेत्यांच्या तोंडावरचं लाचार, पिवळंधम्मक हसू ज्यांनी पाहिलं असेल त्यांनाच कळेल की ह्या नेत्यांना हायकमांडकडून 'अशी' वागणूक का मिळते.

या यादीमुळे महाराष्ट्रात पक्षाला बाळसं येईल असं कुणालाच वाटत नाहीये हायकमांडनं फक्त एक जुम्स काढून दिलाय. पूर्वीच्या काळी संगीत नाटक मंडळी शंभर–दीडशे माणसं घेऊन गावगन्ना नाटकाला फिरत असे. तर हीसुद्धा अशीच एक नाटक–मंडळी. यादी जाहीर झाल्यापास्नं नाटकं सुरू झाली आहेत असं ऐकिवात आहे. सध्या तरी 'संशयकल्लोळ'चा प्रवेश सुरू आहे. काही दिवसांनी 'रणदुंदुभी' आणि 'खडाष्टक'पर्यंत मजल जाईल यात शंका नाही !

एमपीसीसीच्या नव्या यादीत वसंतदादा–आदिक ग्रुपला अजिबात स्थान नाही. याचा अर्थ मराठा लॉबीला बाई दूर ठेवणार असा राजकीय निरीक्षकांचा कयास आहे ! (लिस्ट जाहीर होण्याअगोदर हे राजकीय निरीक्षक प्रत्येक मंत्र्याकडे बसून लिस्ट केव्हा बाहेर येणार याचा कयास बांधत होते; पण एका सीनियर मंत्र्याने सांगितल्याप्रमाणे एमपीसीसीच्या यादीची खुद्द कांबळ्यांनाच माहिती नाही, मग आम्हाला कुठून कळणार ? )

दादांनी अद्याप नव्या कार्यकारिणीविषयी काहीच मतप्रदर्शन केलं नाहीये हे विशेष आहे. म्या पामराने वसंतदादांशी फोनवरून बोलण्याचा प्रयत्न केला. ज्या दिवशी यादी झाली त्याच दिवशी रात्री साडेदहाला 'वर्षा'वर फोन लावला. 'दादासाहेब खाना खा रहे हैं' असं उत्तर मिळालं. पाच मिनिटांनी पुन्हा फोन जोडला. 'दादा जेवताहेत. दहा चाळीसला फोन करा' असा जवाब मिळाला. पुन्हा दहा चाळीसला नंबर लावला 'दादा भोजन घेताहेत. बरोबर दोन मिनिटांनी फोन करा !' दोन मिनिटांनी पुन्हा फोन लावला. उत्तर– 'दादासाहेब सो गये !' दादांनी झोपू नये. रात्र वैऱ्याची आहे !

बाबासाहेब भोसले–तिरपुडे–बाबुराव काळे मंडळी जाम खुशीत आहेत. 'निष्ठावंतांची बूज राखली गेली' ही भोसल्यांची प्रतिक्रिया खूप बोलकी आहे. तिसऱ्या शक्तीला बरे दिवस आले ते बाबुराव काळ्यांच्या राजीनाम्याच्या फार्समुळे. आपणही काळ्यांसारखी हूल दिली असती तर बरं झालं असतं असं वसंतदादा, आदिक यांच्या मनात आलं असेल (असा राजकीय निरीक्षकांचा कयास आहे एवढं जोडलं की ही न्यूज झाली.)

तिकडे अंतुले पुन्हा मेकपला बसलेत. म्हणजे पुढचा प्रवेश रंगणार ! जसजशा निवडणुका जवळ जवळ येतील तो तो अंतुले–तिरपुड्यांना टाच मिळेल असा रागरंग दिसतो. आपल्या मरीन–ड्राईव्हच्या गुहेत बसून अंतुले कदाचित म्हणत असतील :

शायद मुझे निकालके
पछता रहे हैं आप
महफिलमें इस खयालसे
फिर आगया हूं मैं.

## विघ्नकर्ता.... लाऊडस्पीकर

What is powerful for good is potential for evil.

सार्वजनिक गणपतीची प्रथा टिळकांनी सुरू केली. या दैवताचा उपयोग राष्ट्रवाद जोपासण्यासाठी करता येईल असे त्यांना वाटले. उत्सवाच्या निमित्ताने दहा दिवस व्याख्याने, वादविवाद, सभा नाटके इत्यादींचा पूर येत असे. पुण्याच्या लोकांना हे आम्ही सांगायला नकोच.

मुंबापुरीत मात्र विघ्नहर्ता आणि लाउडस्पीकर ह्यांची प्रतिष्ठापना एकाच दिवशी होते. अगदी भल्या पहाटे घनःशाम सुंदरा श्रीधरा ह्या लाउडस्पीकरवरील गाण्याने तुम्ही दचकून जागे झालात की मग सावकाशीने दादा कोंडक्यांच्या चित्रपटांतील गाणी, शोले, डॉन या चित्रपटांतील डायलॉग अलबेला ते कुरबानी असा प्रवास करत करत उषा उत्थाप यांचे 'अहा नाचे नाचे' पुरे केल्याशिवाय हा लाउडस्पीकर थंड होत नाही.

भर रस्त्यात मांडव घातले जातात. पान खात माणसे मंडपात येरझाऱ्या घालतात. एरवी नाक्यावर टवाळी करणारी पोरे एक हात पाठीवर आणि दुसरा डोक्यावर आडवा धरून दारू पिऊन नाच करतात. मांडवा बाहेर संध्याकाळचे आकर्षण जाहीर करून ठेवलेले असते. सोमवारी बरोब्बर सात वाजता हिंदी चित्रपट 'शोले' मंगळवारी 'राम–रावण युद्ध' बुधवारी 'कुरबानी', गुरुवारी 'सरगम' आणि शुक्रवारी दणदणीत ऑर्केस्ट्रा. घरातले गणपती दीड-दोन दिवसात काढता पाय घेतात पण सार्वजनिक गणपती जवळच्या नातेवाइकांसारखे दहा दिवस तळ ठोकून बसतात.

अनंतचतुर्दशीला लालबाग, परळ, गिरगाव आणि दादरकडील रस्ते माणसांनी फुलून निघतात. चौपाटीवर माणसांचा समुद्र जमतो. विसर्जनाचा सोहळा आटोपता आटोपता मध्यरात्र उलटून जाते.

दुसऱ्या दिवसापासून शांतपणे ज्ञानार्जनाला विद्यार्थी मोकळे होतात. लहानपणी गणपती मला तीन कारणांसाठी आवडायचा. एक म्हणजे दिवाळीच्या सुट्टीइतका गणपतीच्या सुट्टीत अभ्यास दिला जायचा नाही. आराशीचे सारे सामान घरीच करायला परवानगी असे आणि गल्लीत मुलांसाठी नाटयस्पर्धा असत. त्यात भाग घेतला नाही तरी पहायला गंमत वाटत असे.

आता मला गणपती एकाच कारणासाठी आवडतो– गणेशचतुर्थी हा 'प्रेस हॉलीडे' आहे !

–विष्णू जयदेव

मुंबई वार्ता

# सर्वांना सामावून घेणारी पण ज्याची त्याची जागा दाखवून देणारी कार्यकारिणी

नजीकच्या काळात निवडणुका घ्यायच्या असल्या की इंदिरा गांधी पक्षातल्या सर्व गटांना सामावून घेण्याचा प्रयत्न करतात, असं याच स्तंभात मी म्हटलं होतं. ९३ सदस्यांची प्रदेश कॉंग्रेसची जाहीर झालेली कार्यकारिणी, त्याच रांगेतील एक प्रयत्न आहे, सर्वच असंतुष्ट गटांना सामावून घेण्यासाठी ९३ सदस्यांची भली मोठी मोट इंदिरा गांधींनी बांधली आहे

येत्या ऑक्टोबरमध्ये कॉंग्रेस महासमितीचे अधिवेशन मुंबईत व्हायचे असल्यानेच प्रा. एन. एम्. कांबळे यांची कार्यकारिणी इतक्या लवकर जाहीर होऊ शकली. प्रदेश कॉंग्रेसच्या कार्यकारिणीवाचून इंदिराबाईंचं अडतं अशातला भाग नाही. राज्यकार्यकारिणीशिवाय प्रदेशाध्यक्ष असण्याला जेवढा अर्थ तेवढाच कार्यकारिणीची सदस्यसंख्या ९३ असण्याला आहे. त्यामुळे एवढी मोठी प्रदेश कार्यकारिणी झाल्याने महाराष्ट्रात फार मोठं काही घडणार आहे अशातला भाग नाही. प्रत्येक असंतुष्टाच्या हातात एक खुळखुळा देणारी ही कार्यकारिणी आहे. म्हणून प्रदेशसमितीची सदस्यसंख्या जेवढी मोठी तेवढीच पदाधिकाऱ्यांची संख्याही मोठी आहे. ९३ मध्ये २४ पदाधिकारी आहेत. तर १४ कायम निमंत्रित. सर्वच गटांना सामावून घ्यायचे असल्याने कार्यकारिणीची सदस्यसंख्या वाढणं जितकं साहजिक होतं. तितकंच त्यात आमदार-खासदारांची बहुसंख्या असणंही स्वाभाविक होतं. १६ खासदार आणि ३५ आमदार असे एकूण ५१ जण कार्यकारिणीत आहेत. ही सख्या इतकी असण्याचं कारण म्हणजे कार्यकर्त्यांच्या असंतोषाला तशी इंदिरा कॉंग्रेस पक्षात फारशी किंमत नसते आणि मंत्रिमंडळात स्थान न मिळालेला प्रत्येक आमदार असंतुष्ट असतो. म्हणूनच मंत्रीमंडळात स्थान नसलेल्या आणि एखाद्या महामंडळाचे अध्यक्षपद न मिळालेल्या तीस आमदारांची प्रदेशसमितीत वर्णी लावण्यात आली आहे.

## एका दगडात अनेक !

एका दगडात अनेक पक्षी मारण्याची इंदिरा गांधींची कार्यपद्धती आहे. प्रदेश समिती जाहीर करून इंदिराबाईंनी बरेच उद्देश साधलेत. कार्यकारिणीची यादी वाचली तर एक लक्षात येतं की, कोणत्याही एका गटास त्यांनी वरचढ होऊ दिलेलं नाही. काही जुन्यांना अडगळीतून बाहेर काढलेलं आहे, तर काहींना केवळ सदस्यत्व दिलं आहे. ' महाराष्ट्रात खरेदी-विक्री संघापासून ते बँकांपर्यंत सत्तेची सर्व केंद्रे एका समाजाने काबीज केली आहेत,' असं एक विधान प्रदेशाध्यक्ष प्रा. कांबळे यांनी १८ सप्टेंबर रोजी म्हणजे कार्यकारिणी जाहीर होण्याच्या फक्त दोन दिवस आधी पुण्यात केलं होतं. प्रदेशाध्यक्षांचा हा आरोप मराठा समाजाला उद्देशून होता हे वेगळं सांगायला नको. त्याच वेळी प्रदेश कार्यकारिणीत मराठा समाजाला वरचढ होऊ दिलं जाणार नाही हे स्पष्ट झालं. पश्चिम महाराष्ट्राला सर्वाधिक ३४ सदस्यांचं प्रतिनिधित्व मिळालेलं असलं तरी एकूण मराठ्यांची संख्या खूपच कमी आहे आणि नेतृत्वाच्या फळीत म्हणजे पदाधिकाऱ्यांमध्ये ही संख्या ४-५ हून अधिक नाही. आपले मेव्हणे मनोहर फाळके आणि राम मनोहर त्रिपाठी यांना सरचिटणीस करण्याची मुख्यमंत्री वसंतदादांची इच्छा होती. परंतु पंतप्रधानांनी ते मान्य केलेलं नाही. उपमुख्यमंत्री आदिकांची तर पार बोळवण झाली आहे. त्यांच्या बंधूंना— गोविंदराव आदिक यांना सरचिटणीस व्हायचे होते. पण त्यांना केवळ सदस्यत्वावर समाधान मानावे लागले आहे. कार्यकारिणीत आदिकांची माणसे तुलनेने फारच कमी आहेत. त्यामानाने तिसऱ्या शक्तीच्या म्होरक्यांना चांगले स्थान मिळाले आहे. बाबुराव काळे यांचे बंड तर त्यांना चांगलेच पथ्यावर पडले. उपाध्यक्षपदाचे आश्वासन मिळाले तेव्हाच त्यांनी राजीनामा मागे घेतला.

यशवंतराव, धोटे, तिडके, अंतुले, दर्डा आणि रूपवते यांना कायम निमंत्रितांच्या यादीत सामावून त्यांची बोळवण करण्यात आली आहे. कायम निमंत्रितांना मतदानाचा हक्क असत नाही. कायम निमंत्रितांची यादी स्वत: पंतप्रधानांनी तयार केल्याचे सांगण्यात येते. अंतुल्यांना कायम निमंत्रितांच्या यादीत ढकलण्यात आलं असतं तरी त्यांच्या दोन माणसांना— रवींद्र राऊत आणि युसुफ हाफिज यांना-सरचिटणीसपद मिळाले आहे हे विशेष. अंतुले आणि भोसले मुख्यमंत्रीपदी असतांना, दोन्ही वेळा बंडाचे नेतृत्व करणाऱ्या खासदार बाळासाहेब पवारांना केवळ सदस्यत्व मिळालं आहे. गुलाबराव पाटील प्रदेशाध्यक्ष असताना त्यांच्या कार्यकारिणीत पवार उपाध्यक्ष होते त्यांचं दुर्दैव म्हणजे त्यांच्याशी विळ्याभोपळ्याचं नातं असलेले बाबुराव काळे यांना या वेळी उपाध्यक्षपद मिळालं आहे, तर दोन्ही वेळा बंडखोरांच्या तंबूत नसलेले बाळासाहेब विखे पाटील यांना उपाध्यक्षपद पुन्हा मिळाले आहे. एकूण यादी पाहता सर्व गटांना सामावून घेणारी परंतु त्या सर्वांना आपापली जागा दाखवून देणारी कार्यकारिणी इंदिराबाईंनी तयार केली आहे असंच या कार्यकारिणीचं वर्णन करता येईल. कार्यकारिणी आल्याने राज्यपक्षातल्या कटकटी थांबणाऱ्या नाहीत हेही लक्षात घेतले पाहिजे.

राज्यकार्यकारिणी जाहीर झाली आहे, म्हणजे महाराष्ट्रातील इंदिरा कॉंग्रेस फार मोठी क्रियाशील होणार आहे अशातला भाग नाही. राज्ययंत्रणेवाचून इंदिराबाईंचे अडत नाही. राज्ययंत्रणा बळकट करण्याचा त्यांचा उद्देश यामागे आहे अशातलाही भाग नाही. ही केवळ रंगसफेती आहे कॉंग्रेस महासमितीचे अधिवेशन मुंबईत व्हायचेय हे तात्कालिक कारण प्रदेश समिती जाहीर होण्यामागे आहेच; पण नजीकच्या काळात निवडणुका घ्यायच्या असल्याने त्यांच्या पूर्वतयारीचा भाग हेही निमित्त आहे, सर्वांना सामावून घेण्यासाठी.

पक्षाच्या राज्यशाखा बळकट व्हाव्यात असं राजकारण इंदिराबाईंनी कधीच केलेलं नाही. त्यांना फक्त स्वत:चे हात बळकट करायचे असतात. विरोधी सरकारे असलेल्या राज्यांवर पंतप्रधान ज्यासाठी खार खातात आणि आग ओकतात त्याचसाठी आपल्या पक्षांच्या राज्ययंत्रणा त्या बळकट होऊ देत नाहीत. कुठल्याही राज्यात तेथलं स्थानिक नेतृत्व बळकट होऊ न देण्याची, वरचढ होऊ न देण्याची काळजी त्या घेतात. इंदिरा कॉंग्रेसमधल्या गटबाजीला त्या पक्षाच्या अध्यक्षाच प्रोत्साहन देतात. कारण इंदिरा कॉंग्रेस म्हणजे त्या स्वत: आहेत आणि ' कॉंग्रेस म्हणजे देश असं त्या स्वत:च सांगतात !

—कपिल पाटील

मुक्ताफळे

# मातांविलाप

**ग**जानन घरी आला. दारावर टक्‌टक्‌ झाली.

पार्वतीबाई वाटच पहात होत्या. त्यांनी दार उघडले. आत येणाऱ्या मुलाला म्हटले—

गजानन, अरे हे रे काय तुझे दरवर्षीचे ! चतुर्दशीला नक्की येतो सांगून पुण्याला जातोयस आणि अस्सा वाट पहायला लावतोस.'

'काय करणार आई ? दरवर्षी नवे नवे हिंदी चित्रपट निघतात. मोठमोठे नट नव्या नव्या पद्धतीने नाचतात. त्यांच्यासारखे अंगविक्षेप करणाऱ्या सर्व नाऱ्या भक्तांचे समाधान होईपर्यंत मला निघता येत नाही. काल रात्री मी यायचा तो आज सकाळी नऊ वाजता शेवटी माझी सुटका झाली !'

'आणि तुझ्या अंगावर हे चट्टे कसले ?'

'दहा—बारा दिवस दोन—तीन लाख कॅन्डलपॉवरच्या मखरात बसल्यावर अंग भाजून नाही निघणार तर काय ? त्याचे हे चट्टे आहेत !'

'अरे, पण विजेचा तुटवडा आहे. ऊर्जा समस्या आहे ना ? '

'आहे ना ! लाखो खेडी अंधारात आहेत. कारखान्यांना पुरेशी वीज नाही. जिथे आहे तिथे पुरेसा दाव नाही; पण भक्तांच्या इच्छेपुढे सरकार काय करणार—वीजबोर्ड तरी काय करणार ? मला वाटतं काही दिवसांनी मला अणुभट्टीत बसवतील, भट्ट्या स्वस्त झाल्यावर !'

'पण मी तर ऐकले होते की, यंदा पूर आले म्हणून लोक सजावट—रोषणाई यावर खर्च न करता ते पैसे पूरग्रस्तांना देणार होते म्हणून— '

'दिले ना ! हत्तीच्या गणपतीने खर्चवेच वजा जाता चोवीस रुपये आठ आणे दिले. अखिल मंडई मंडळाने दोन लाख रुपये सजावट—रोषणाईवर खर्च केले; पण पूरग्रस्तांना मदत मिळावी म्हणून माझ्यापुढे पेटी ठेवली होती, त्यात खूप सुटे पैसे जमा झाले !'

'यंदा हिंदी गाणी किती पाठ झाली ?'

'यंदाची सगळी डिस्को गाणी आहेत. 'आझाद', 'बे—आबरू', 'हम से है जमाना' 'एक जान है हम' या सिनेमातली. दाखवू म्हणून ?'

'नको रे बाबा—आता लगेच नको. हे घरी आले की त्यांना म्हणून दाखव. तांडवनृत्याला होईल यांना उपयोग ! पण हे सांग यंदा कुठे टिंगल—टिंगल ?'

'छे: छे: ! यंदा पोलीसआयुक्तांना मुळी पत्रकच वाटले होते 'अन्य धर्मीयांच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत याची काळजी घ्या !' आणि 'वृद्ध आणि आजारी यांचा विचार करून आवाजाचा गोंगाट करू नका' असं पत्रकात बजावलं होतं.'

'गणेशा, पण मी म्हणते जेव्हा अन्य धर्मीयांनी तुझ्या भक्तांच्या भावना दुखावल्या तेव्हाच मागे दंगल झाली. असं असून उपदेश अन्यधर्मीयांना का नाही ? हे काय उलटेच ! अन्यधर्मीयांच्या भावनाच सांभाळायच्या तर मूर्तिपूजाच रद्द करायला हव्यात म्हणावं आणि वृद्धांना वयपरत्वे ऐकू कुठे येतंय ? आजारी माणसाला इतका कंटाळा आलेला असतो की कसलाही आवाज त्याला हवासा वाटतो. या कमिशनरला म्हातारे झाल्याशिवाय किंवा आजारी पडल्याशिवाय हे कळायचं नाही. आवाजाचा त्रास होतो तो ज्याला काही उद्योग करायचाय, लिहायचं आहे, वाचायचं आहे—अशांना.'

'पण अशी माणसं आता आहेत कुठे ? हल्ली रात्री सर्वांना एकच उद्योग असतो टी. व्ही. पहाणे ! माझ्यापुढे जर कुणी व्याख्यान द्यायला आला किंवा गायला बसला तर कार्यकारी मंडळातली दोन—चार टाळकी वगळता असतं कोण ?'

'म्हणजे दहा—बारा दिवस रस्त्यावर नुसता धुडगुस घालायला का तुला बोलावतात ? मग मी सांगते असं करा— '

'काय बुवा ?'

'तो नेहरू स्टेडियम मोकळाच पडलाय ना सध्या, तिथे क्रिकेटचो मॅचदेखील आता व्हायची नाही आहे. तिथे प्रेक्षक बसतात त्या भागात सगळ्यांनी सजावटी करा. हजारो बल्ब लावा. डोळे मिचकावणारे रंगीबेरंगी दिवे लटकवा. डिस्को वाजवा आणि मैदानात सगळ्या भक्तांना सोडा सजावटी पहाण्यासासाठी ! लोकांना पायपीट नको, पोलिसांना फार त्रास नको आणि रस्त्यावर धुडगूस गोंगाट नको !'

—ग्यानबा



## ह्या ना त्या निमित्ताने

# व्यथाकारांच्या कथा

फिरोझ रानडे

**स**गळा चोरांचा बाजार आहे झालं. पहिल्या मजल्यावरचा तरुण कामत मोठ्या चिडचिडीने म्हणाला. त्या चिडीला शेजारच्या कर्व्यांनी मान डोलावून संमती दिली. त्यावरून ह्या चोरांच्या बाजाराबद्दल त्या दोघांचे आधी बोलणे झाले असावे असा श्यामने अंदाज केला.

कामत आणि कर्वे ही श्यामच्या सोसायटीतच नव्हे तर त्यांच्याच इमारतीत रहाणारी मंडळी; पण ती अशी एकत्र कधीच येत नसत. मुंबईतली सगळी मंडळी जशी नेहमी फार बिझी असतात व त्यांना एकमेकांकडे जायला जसा कधीही वेळ मिळत नाही तसाच श्यामच्या सोसायटीवाल्यांना मिळत नसे.

मुंबईतल्या लोकांचा बिझीपणा गणपतीचे आठ दिवस पुष्कळ प्रमाणात कमी होत असतो. ह्या दिवसांत त्यांना एकमेकांकडे जायला जमते थोडक्यात म्हणजे गणरायाचे काही गुण त्यांचे अंगी येतात.

वक्रतुंड तर काय आपण लोक नेहमीच असतो. घरी व शेजारी—पाजारी प्रसाद खाऊन खाऊन सगळे लंबोदर झालेले असतात व कर्कशपणे वाजणारी 'डिस्को गीते' ऐकून आपलेही कान गणरायासारखे सुपाएवढे झाले आहेत असे वाटायला लागते ह्या गणांच्या नायकामुळे आपणही गणातले एक आहोत ही भावना पण ह्या दिवसांत बळावते.

तशा त्या भावना बळावण्याच्या दिवसांतच

श्याम, कामत, कर्वे ही मंडळी गप्पा मारत बसली होती व त्या गप्पातच कामतने सगळा चोरांचा बाजार असल्याचा उल्लेख केला.

त्याचा भावार्थ कर्व्यांना समजला तरी श्यामला समजला नाही. हे लोक महंमदअली रोडच्या आसपासच्या चोरबाजाराबद्दल बोलत नाही आहेत हे श्यामने ओळखले. तो तर काय बोलून-चालून चोरबाजारच. कामत चोरांच्या बाजाराबद्दल बोलत होता. त्यामुळे मामला कठीण झाला होता

आता एक तऱ्हेचा का चोरांचा बाजार आहे ? राजकारण चोरांचा बाजार, निवडणुका चोरांचा बाजार, शिक्षणसंस्था चोरांचा बाजार, सरकारी खाती चोरांचा बाजार, रेल्वे, टेलिफोन, एस. टी. एक का दोन ?

श्यामच्या चेहऱ्यावर चोरांच्या बाजाराचे काहीच भाव दिसत नाहीत हे पाहून कर्वे आपल्या 'एकारान्त' वृत्तीला जागून म्हणाले. 'श्यामरावांना त्यातले काय कळणार ? त्या दृष्टीने ते फार सुखी आहेत.'

आता आपल्याला सुखी म्हटल्याबद्दल माणसाला राग न येता आनंद व्हावयाला हवा; पण कर्व्यांचे ते वाक्य खडूसपणाने भरलेले असल्यामुळे श्यामला फार संताप आला. 'हो, मी सुखी आहे खरा; पण तुम्ही दुःखी का आहात ? तुमच्या व्यथा काय आहेत ते तर कळू द्या !'

तुमच्या व्यथा काय आहेत ते तर कळू द्या म्हटल्यावर कामत व कर्व्यांचे चेहरे खुलले. नळ सोडल्यावर जसे दबदबा पाणी येते तसे श्यामच्या प्रश्नाने काम केले होते.

दादरच्या कोणा मान्यवर व उत्साही संस्थेने एक कार्यक्रम घडवून आणला होता. ही संस्था नवीन नवीन साहित्याचे प्रकाशन हा केवळ धंदा न मानता समाजसेवा मानणाऱ्या प्रवृत्तीची मंडळी त्यात काम करत असतात.

आता सगळ्यांना काही ना काही व्यथा असतातच; पण ह्या वेळी ह्या संस्थेने कथाकारांच्या व्यथा काय आहेत हे समजून घ्यावे, आपसात त्याची चर्चा व्हावी व ते समाजापुढे व प्रकाशकांपुढे ठेवावे ह्या दृष्टीने हा कार्यक्रम आयोजित केला होता

श्यामने त्याबद्दलचा वृत्तांत वाचला होता. सभेचा चालक मोठ्या साधूवृत्तीचा होता. त्याची व्यथा होती की मराठी कथेचा ऱ्हास होत आहे. त्यात म्हणावे तेवढे पाणी नसते. त्याच्याच शब्दात म्हणजे ते साधू गृहस्थ चर्चा अधिक 'सुजाण पातळी'वर नेण्याचा प्रयत्न करत होते.

पण कथाकारांच्या व्यथा अगदी वेगळ्या पातळीवरच्या होत्या. आज–काल कथासंग्रह छापून प्रसिद्ध होत नाहीत ह्याचीच त्यांना खंत होती. कथा जीवनसंघर्षापासून दूर पळणारी, पिवळसर, फिकुटलेली, अॅनेमिक वगैरे झाली आहे ह्याची काळजी नव्हती. त्यांना सभा–चालकाच्या व्यथेची पर्वा नव्हती, आपलीच व्यथा खरी व ती म्हणजे कथा–संग्रह निघत नाहीत ही !

कामतने आपल्या शैलीत त्या सभेचा वृत्तांत सांगितला. श्यामने पण त्याबद्दल वर्तमानपत्रात वाचले होते. ज्या दिवसापासून साध्या गोष्टींना कथा वगैरे म्हणायला सुरुवात झाली तेव्हापासूनच कथेचा दर्जा घसरला आहे हे श्यामचे मत; पण तो सर्वसामान्य वाचक. सर्वसामान्य वाचकाच्या व्यथेची पर्वा कोण करतो ?

कर्वे श्यामला 'श्यामराव ह्या बाबतीत फार सुखी आहेत' असे म्हणाले होते, ते एका अर्थी खरेच होते. श्याम कथा कादंबरीलेखक तर नव्हताच; पण अगदी साधा वाचक–पत्रलेखक पण नव्हता !

कामतचा सभा–वृत्तांत संपला व कर्वे बोलायला लागले.

'आज–काल ह्या लोकांना साध्या सरळ कथा चालत नाहीत. तरुण पिढीवर, स्त्रियांवर चांगला परिणाम होईल अशा मी किती तरी कथा लिहिल्या; पण त्या कोणी छापतच नाही !

'तुम्हाला म्हणून सांगतो श्यामराव, आजकाल लेखकांच्या आडनावांवरून कथेचे मूल्यमापन होत असते. त्यांच्याच कथांना प्रसिद्धी मिळते. बघा, आजकाल गोखले, गाडगीळ वगैरे आडनावांच्या लोकांच्या कथा दिसतात का ?'

खरं म्हणजे कर्वे ह्यापेक्षाही जहाल जहाल बोलणार होते; पण परजातीय कामत तेथे असल्यामुळे त्यांनी स्वतःला सावरले व 'सगळा चोरांचा बाजार' म्हणून आपल्या व्यथा–भाषणाचा समारोप केला.

'तसं काही म्हणता यावयाचे नाही हं.' कामत कर्व्यांचा मुद्दा खोडून काढत म्हणाला. 'चांगल्या दर्जाच्या कथा असतील तर त्यांना जरूर प्रसिद्धी मिळते.'

कामतने कर्व्यांचा मुद्दा खोडून काढण्यामागे बरीच कारणे होती. एक तर तो स्वतः कथा–लेखक होता, त्याच्या कथा छापून येत असत व त्याचे दोन का तीन कथा–संग्रहही प्रसिद्ध झाले होते. कर्व्यांच्या कथा अगदी बेकार असतात असे त्याचे प्रांजल मत होते. 'आता माझी नाही का दोन पुस्तके प्रसिद्ध झाली ?' असा उलटा त्याने कर्व्यांनाच प्रश्न केला.

'मग लेका, तुला व्यथा रे कसली ?' श्यामने आश्चर्यात्मक रागाने विचारले.

'अहो, हे दादरचे लोक दुसऱ्या भागातल्या लोकांना महत्त्व देत नाहीत. त्यांचा आपला असा एक ग्रुप आहे, त्याच ग्रुपच्या लोकांचे कौतुक चालते, तसे नसते तर मला त्याना कार्यक्रमाला बोलावले सते ?' कामतने आपली व्यथा सांगितली

एखाद्या बाईला मूलच होत नाही म्हणून ती दुःखी, दुसरी सगळ्या मुलीच होतात. म्हणून दुःखी, तिसरी मुलगे झाले पण चांगले निघाले नाहीत म्हणून दुःखी. तसेच झाले की हे. समाजाच्या व्यथा, जातिव्यवस्थेपुढे वा आर्थिक व्यवस्थेपुढे वा इतर कारणांमुळे निर्माण होणाऱ्या व्यथा ह्याबद्दल कथाकारांनी लिहावयाचे की स्वतःचेच तुणतुणे वाजवत रहावयाचे ?

श्यामच्या मनात कथाकारांबद्दल व स्त्रियांबद्दल वेगवेगळे विचार येत असतानाच त्याची स्त्री म्हणजेच राधा चहाचे तबक घेऊन येती झाली.

तिच्या चेहऱ्यावर नाही म्हटले तरी थोडा राग दिसतच होता. आता आपले सकाळपासून' काय चुकले असावे बुवा ? त्याचा श्याम विचार करू लागला.

राधाने चहाचे तबक स्टुलावर थोड्या दणक्यातच ठेवले. पाहुण्यांपुढे ह्यापेक्षा जहालपणे रागाचे प्रदर्शन करणे योग्य दिसले नसते.

'घ्या, चहा घ्या' असे कामत व कर्व्यांना म्हणत तिने स्वतःचा चहाचा कप घेतला व सोफ्यावर बसता बसता ती म्हणाली, 'तुम्हा पुरुषांची पुरुषीवृत्ती अगदी साध्या साध्या गोष्टीतही दिसते बघा !'

'अहो पुरुषीवृत्ती पुरुषांचीच दिसायची. ती बायकांची कशी दिसणार ?' कर्वे म्हणाले व स्वत:च मोठ्याने हसले.

'आता 'स्त्री–लेखिका' असे छापून येत नाही का ? आता लेखिकेचा अर्थच मुळी स्त्री मग परत स्त्री–लेखिका असे कशाला ?' श्यामने वातावरण आनंदी करण्याच्या दृष्टीने गोलंदाजी केली. कामत, कर्वे व तो स्वतः हसले तरी राधा मात्र भडकली.

'हेच, हेच म्हणतो आम्ही. चेष्टेचे वेळी स्त्री–लेखिकांची आठवण होते; पण त्या व्यथेच्या सभेला एका बाईला तरी बोलावले होतेत का ? आम्हाला काय काही व्यथा नाहीत ?'

म्हणजे तूही लिहायला लागली आहेस की काय ? ' श्यामने भीतिमय आश्चर्याने विचारले. त्या वेळी त्याच्या हातातली कप–बशी चांगलाच खळखळली.

'मी नाही, माझी मैत्रीण माया आहे ना ती सांगत होती. ती कथा लिहिते, तिचे संग्रह प्रसिद्ध झाले आहेत, ती दादरची अगदी त्यांच्या ग्रुपची आहे; पण स्त्री–लेखिका म्हणून तिला वाळीत टाकले आहे त्या लोकांनी.'

मैत्रिणीची व्यथा राधा सांगत होती.

त्या सगळ्यांना काही ना काही व्यथा आहेत; पण आपल्याला मात्र काहीच नाहीत हे बघून श्याम मोठा व्यथित झाला. □

# निलगिरी....निलगिरी....निलगिरी
# चार बिघेवाल्यापासून ते तीस-चाळीस एकरवाल्यापर्यंत

संजय संगवई

नाशिकला यंदाचा पावसाळा नेहमीसारखा नव्हता. गाव, रस्ते, खेडी, वावर, डोंगर या सर्वच ठिकाणी काही तरी वेगळं घडत असल्याचं जाणवत होतं. जिल्ह्यातल्या दीडशे गावातल्या जमिनींवर वेगळीच हालचाल सुरू आहे. रोज 'फारिष्ट' खात्यातर्फे ट्रक भरभरून 'ती' रोपं आणली जातात. दररोज पाच-सहा हजार रोपांची लागवड होते आहे. सरकारी खात्यांना कधी नाही ते एवढं काम मिळालंय !

चार बिघेवाल्या साहेबराव सूर्यवंशीपासून ते तीस-चाळीस एकरांपर्यंतच्या जमिनीवर हे नवं पीक लावलं जातंय ! ऊस काढून त्याच्या जागीसुद्धा ! प्रत्येकजण आपलं नशीब यावर घासून पहायला पाच-सात वर्षं थांबायला तयार आहे !

कुण्या विराण्या देशातनं आलेल्या नीलगिरीनं ही धूम मचवून दिली आहे. सालोसाल येणारं हमखास पीक सोडून बावीसशे एकरावरले शेतकरी न देखल्या नीलगिरीला हात घालायला धजावले. नाशिकमध्येच 'नाशिक जिल्हा निलगिरी उत्पादक सहकारी संस्था' स्थापूनही होऊन जाते, रोज आमच्या जमिनीवरही हे पीक लावा म्हणून लहान-मध्यम-श्रीमंत-अडाणी-काय वाटेल तो शेतकरी अर्ज घेऊन येतो ! कशामुळे एवढं संगळं ?

दादा म्हणतात म्हणून !

गेल्या पाच-सहा महिन्यापासून आमदार विनायकराव पाटील हा माणूस ही श्रीमंत होण्याची नवी योजना सांगत गावोगाव फिरत होता-गुजराथ, राजस्थान, मध्यप्रदेशमधला शेतकरी या पिकामुळे कसा बदलला ! एक वर्षं लावलेलं पीक पाच वर्षं तगवून धरलं. त्या पिकाला ना गुरांचा जोजार, ना वाऱ्या-पावसाचा आजार. पाणी-खत असले लाड नाहीत. काळ्याशार मातीपासून ते बरड-खार जमिनीपर्यंत कुठेही अगदी कोडग्यासारखं हे झाड फोफावतं. पाच वर्षं झाड वाढू देईपर्यंत वाट पहावी लागेल; पण नंतर मात्र लक्ष्मी स्वतः येऊन भरभरून देत जाईल !...

असं काय न् काय हा माणूस सांगत होता. स्वतः, आमदारकीच्या काँग्रेस (आय्) कार्यकारिणीच्या भानगडी सोडून हा माणूस भलत्याच प्रांतात शिरला होता. आणि पेरणी अगदी जवळ यटली असतानाही जमीनवाली मंडळी आमच्याकडं हे पीक लावा म्हणतात ! पुढच्या वर्षीच्या फेब्रुवारीपर्यंत एकट्या नाशिक जिल्ह्यात चाळीस लाखांवर नीलगिरी लावून तयार झालेली असेल.

नाशिक, निफाड, त्रिंबकच्या रस्त्यावर आज कुठेही जा- बस् नीलगिरीशिवाय बात नाही. हे नवं जितराब काय करतंय कायनू बा, अशीच उत्सुकतेची भावना आहे. काळीशार जमीन, पाण्याखालची बरड माळरान, पडीक, डोंगरउतारावरची, खार जमीन-सगळीकडे खड्डे खणलेले आहेत. आपल्याकडे सोसायटीचा ट्रक रोपं घेऊन केव्हा येतोय त्याची वाट पाहिली जाते. नवं पीक, म्हणून त्याच्याविषयी जास्तीत जास्त माहिती करवून घेण्याची उत्सुकता दिसते. रूट झोन, नायट्रोजन फिक्सिंग, आंतरमशागत, वॉटर टेबल हे शब्द ही मंडळी लीलया वागवीत आहेत.

हे 'निर्लज्ज' झाड कुठेही फोफावतं असं लक्षात आल्यावर अनेक वर्षं पडून असलेल्या जमिनी लागवडीखाली काढल्या गेल्या. मीठसाखरे या गावच्या एका शेतकऱ्याची तीस एकर खार जमीन आहे, आजपर्यंत त्याच्यावर कोणतेच पीक घेता येत नव्हते; परंतु नीलगिरी त्यावर वाढणार आहे. आणि त्यामुळे जमिनीचा खार कमी होण्याची शक्यता आहे असं कळताच तो अक्षरशः आनंदाने नाचत नाशिकला आला, न् सोसायटीत जाऊन म्हणाला- 'लावा माझ्या जमिनीवर !'

ज्यांची गावी थोडीफार शेती आहे, परंतु स्वतः मात्र रोजगारासाठी दुसऱ्या ठिकाणी आहेत, अशांना हे नवं झाड म्हणजे वरदान वाटतंय. आपण नसलो अन् पिकांना गुरांपासन, पक्ष्यांपास्नं आजार पोचला तर काय ? त्यासाठी कुंपण करा न् नाना वादावादी ! कोण करत बसणार एवढं सगळं ? या जमिनी तशाच पडीक राहिल्या. पण आता निलगिरी आली. झाड नुस्तं लावायचं न् आपण बिनघोर कामधंदा बघा. झाड पाच वर्षं वाढतच राहील. वेळेवर तोड केली नाही तरी काय नुकसान नाही, उलट त्याची जाडी वाढत जाऊन फायदाच होतो !

या विनायकराव पाटलांना तर 'काय वाणू गुण । नीलगिरीचे' असं सध्या झालं आहे. गुजरातच्या कालिदास पटेल या माणसानं एकशेऐंशी एकरावर नीलगिरी लावलाय्. अन् तो मजेत आहे. हा नवा प्रयोग बघण्यासाठी देश-परदेशची माणसं येतात. नवल करतात !

हा किडा विनायकरावांच्या डोक्यात शिरला. नाशकातली आणखी काही विचारी माणसं एकत्र आली.

दादासाहेब बीडकर हा चौऱ्याहत्तर वर्षांचा माणूस (म्हातारा म्हटलं तर त्याला राग येतो !) गेली अनेक वर्षं गावोगावी आश्रमशाळा स्थापन करीत हिंडत आहेत. 'पोरांनो, झाडं लावा रे' म्हणत फिरत आहेत. जंगलांची, झाडांची बारीक-सारीक माहिती आहे. नीलगिरी लावणार - एकरोगणती लावणार हे कळताच एखाद्या जवानासारखा हा वृद्धयुवा उसळून उठला- स्वतः पुढाकार घेऊन

नीलगिरी लावत आहे, पावसाची–चिखलाची पर्वा न करता अमूक एका शेतावरची नीलगिरी किती वाढली ते पहायला जाण्यास तयार !

'गावकरी– 'अमृतचे' मालक दादासाहेब पोतनीस. तीन एकरावरचा ऊस काढून त्यांनी नीलगिरी लावली. आपण काय करतो, ते तडीला जाईल अशी खात्रीच आहे त्यांना. पिंपळगाव बसवंतचे वकील (आडनावाचे) तर म्हणतात, नीलगिरीबरोबर पहिली तीन वर्षे बांबू घेता येतो ना ! तर द्या मला बांबूची रोपं. स्वतंत्र बांबूचं शेतही करण्याचा विचार त्यांनी बोलून दाखविला. बसल्या बैठकीत नवा भुंगा डोक्यात शिरला !

हेमंत टकले हे नाशिकचं बडं प्रस्थ. त्रिंबक रस्त्यावर २५–३० एकर जमीन पडून होती. त्या सगळ्या जमिनीवर आता नीलगिरी लागणार आहे–एव्हाना लागलीही असेल ! अशी किती तरी नावे न् गावे. अशोकराव मोगल. सोनवणे. साहेबराव सूर्यवंशी, यांच्यासारखी सगळीजणं या नीलगिरीच्या मागे लागलेत !

हेमंतरावांसारख्यांबरोबरच सुरगणा, पेठ भागातील आदिवासींच्या परंपरागत जमिनी आहेत. महारांच्या वतनी जमिनी आहेत. मात्र ही सर्व मंडळी दुसरीकडे मोलमजुरी करतात. या जमिनी कसणे त्यांना परवडत नाही. परंतु विनाखर्चाची लागवड, मशागतीची फारशी भानगड नाही, सरकारी कर्जाची शक्यता आणि बख्खळ पैसा यामुळे या माणसांनीसुद्धा दादांच्या सांगण्यावरून नीलगिरी लावायचं ठरवलंय् !

## सहकारी सोसायटीची स्थापना

अशा प्रयत्नातून 'नाशिक जिल्हा निलगिरी उत्पादक सहकारी संस्था' स्थापन झाली. वनखात्याकडे व सामाजिक वनीकरण-विभागाकडे रोपांची मागणी केली गेली. एकदम लाखांच्या भाषेतच! हपिसरांना विनायकरावांच्या तब्येतीविषयी काळजी वाटली. कुणी त्यांना विश्रांती घेण्याचा सल्ला दिला. निलगिरीची चाळीस लाख रोपं ? कधी शक्य आहे काय ? वेडबीड तर लागलं नाही ? आम्ही एवढे महोत्सव साजरे करुनही फारसा उपयोग होत नाही, न् हा माणूस एकटा चाळीस लाखाच्या गोष्टी बोलतो !

परंतु हे खरंच होतं. एकट्या निफाड तालुक्यातील ७३ गावांतील १ हजार २२३ एकरातल्या शेतकऱ्यांनी हे वेगळं पीक घेण्याची तयारी दर्शविली. चांदवड (३८४ एकर), इगतपुरी (१९४), नाशिक (१९३) अशी तालुकावार स्थिती आहे. पूर्ण जिल्हाभर हे लोण पोचलं आहे. सटाणा तालुक्यानेही अगदीच दृष्ट लागायला नको म्हणून आतापर्यंत एक एकरावर निलगिरी लावण्याचे ठरविले आहे.

या सहकारी संस्थेतर्फे शेतकऱ्यांच्या शेतांवर ट्रकने रोपे नेण्यात येतात. वनखाते व सामाजिक वनीकरणखात्यातर्फे लागवडीविषयी, त्यानंतर घ्यावयाच्या काळजीविषयी आणि इतर बाबींविषयी माहिती पुरविली जाते. पुढे काही घोटाळा व्हायला नको. तसे तोड केव्हा करायची ते समजण्यासाठी लागणतारखेची नोंद ठेवली जात आहे. पश्चिम विभागाचे विभागीय वनअधिकारी श्री. महाले, सामाजिक वनीकरणाचे संचालक मीरचंदानी हे दोघे उत्साहाने, स्वतः पुढाकार घेऊन या 'कार्यात' सहकार्य करत आहेत.

मीरचंदानी तर म्हणाले, 'एवढी झाडं–निलगिरीची लागताहेत. मग ती खाजगी जमिनीवर किंवा सार्वजनिक जमिनीवर असोत. हीच मोठी आनंदाची गोष्ट आहे !'

बैठकीत बसल्यावर विनायकराव म्हणतात–' खाजगी जमिनीवरच निलगिरी लागणार आहे न् वाढणारही. शेतकऱ्यांना देशाच्या, पर्यावरणाच्या विकासासाठी वगैरे निलगिरी लावायची नाही. त्याच्या जमिनीवर लावली तरच त्याला या गोष्टीत उत्साह वाटेल. सामाजिक वनीकरण, वगैरे गोष्टी त्याच्यातून येणाऱ्या दुय्यम गोष्टी आहेत. खाजगी मालकीतून, फायद्याच्या जाणिवेतून हे वनीकरण होईल.'

दादासाहेब बीडकर परत परत सांगत होते– 'हे झाड फायदेशीर आहे एवढं फक्त लोकांच्या ध्यानी येऊ द्या, मग आपोआप याची लागवड वाढत जाईल !'

त्यातही या सगळ्या मंडळींना उत्साह आहे तो नाशिक जिल्ह्यात हे वेड पसरलंय म्हणून. तेही सहकारी तत्त्वावर. आता दररोज कोणत्या ना कोणत्या जमिनीवर निलगिरी लागत जाणार ! या वर्षी लागवडीला उशीर झाला. नीट नियोजन नव्हतं. घाईघाईत लागवड झाली. वनखात्यावरही अचानक एवढा भार आला. पुढच्या वर्षी मात्र सगळं नियोजनबद्ध होणार आहे. १९८४ च्या जानेवारीअखेर ४० लाख निलगिरी लावून तयार झाली की, त्याच वेळी पुढच्या लागवडीसाठी रोपं तयार असतील.

रोज निलगिरी लावण्यासाठी सोसायटीकडे शेतकरी येताहेत. ऊस काढतो, ज्वारी काढतो, कांदा नको–आता निलगिरी लावतोय असा लाकयाच सुरू झाला आहे !

## सहकाराची तिसरी दिशा

निलगिरी इकडच्या माणसांना नवी नाही; पण तिनं फक्त हपिसरांच्या बंगल्यांच्या कंपाउंडची शोभा वाढवावी, कारखान्यांभोवती आरास करावी एवढ्यापुरतंच तिचं स्थान.

या झाडापासून पैसा मिळतो हे उमगलं गुजरात–राजस्थानच्या काही शेतकऱ्यांना. बागायती व जिरायती दोन्ही पद्धतींनी घेता येणाऱ्या या पिकातून एकरी १ हजार (बागायत) व ४०० (जिरायत) घनफूट लाकडाचे बल्ले मिळतात. नव्वद रुपये घनफूट या भावाने हे लाकूड विकले जाते. याचा रेयॉन पल्पसाठी कागदाच्या कारखान्यात उपयोग होतो, हेसुद्धा हळूहळू आकळायला लागलं.

गुजरातमध्ये कालिदास पटेल या बागायतदारानं १८० एकरात निलगिरी लावली. कर्नाटकात कोलार इथेही याची लागवड झाली. राजस्थान–मध्यप्रदेशच्या सरकारांनी तर जागतिक बँकेच्या साह्याने निलगिरीची शेती वाढविण्यासाठी दरएकरी दरसाल २५० रुपये कर्जाऊ देण्याची तरतूद केली.

एवढं होतं न होतं तोच निलगिरीच्या चांगुलपणाविषयी प्रवाद उठले. निसर्गतज्ज्ञ, पर्यावरणतज्ज्ञांपासून ते शेतकीतज्ज्ञ, भूगर्भशास्त्र-

तज्ज, समाजशास्त्रज्ञ सगळेच चिंतित झाले. खरं तर भारत सरकारने सामाजिक वनीकरणाच्या योजनेखाली निलगिरीचा समावेश केला होता; परंतु निलगिरीविरुद्धचे आक्षेपही एवढे जबरदस्त होते की, सरकारी अधिकारी व ज्यांचा या क्षेत्राशी सुतराम संबंध नाही ते सर्वच बिचकले !

## आक्षेप : निरसन

बंगलोरच्या इंडियन इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट या संस्थेने कोलार भागातील निलगिरी लागवडीचा अभ्यास केला. या पिकामुळे ग्रामीण भागात फक्त मोठया शेतकऱ्यांना व शहरातल्या उद्योगांना फायदा होतो. निलगिरीपासून खेडयांमध्ये रोजगार व समृद्धी येणार नाही. कोलार भागात या पिकामुळे २० कोटी मनुष्यदिवसांचा रोजगार बुडाला, असं या संस्थेचं म्हणणं आहे.

त्याहीपेक्षा वेगळे आरोप झाले. हे झाड जमिनीतलं पाणी ओढून घेतं, त्यामुळे भूगर्भांतर्गत पाण्याची पातळी (वॉटरटेबल) कमी होते. हे झाड दुसऱ्या झाडांना जगू देत नाही. माती खराब करतं असं म्हटलं गेलं.

असल्या झाडांच्या लागवडीमुळे ग्रामीण भागातील विषमता वाढेल. कारण झाड कटाईच्या अवस्थेला येईपर्यंत सात–आठ वर्षं थांबावं लागतं. तेवढी थांबण्याची ताकद दोन एकरवाल्याची असेल काय ? निलगिरीला नाही म्हटलं तरी आंतरमशागत, कीडनाशके, खते, मजुरीचीसुद्धा गरज असते.

'तेवढा एक फार मोठा दोष सोडला तर साहेब, हे झाड फार गुणी आहे. त्याच्यावरचे इतर आरोप तर सिद्ध झालेलेच नाहीत' असं म्हणून विनायकरावांनी हे आरोप खोडून काढायला सुरुवात केली. कोणत्याही साधारण माहिती असलेल्या माणसाला या आरोपांमधली अपूर्णता सहज कळते.

## पाण्याची पातळी

निलगिरी जमिनीतील पाण्याचे प्रमाण कमी करते असे म्हणतात. तसे तर मग प्रत्येक पीक आपापल्या मगदुराप्रमाणे पाणी घेते. पिकांमधला सेल्युलोज व जीवनद्रव्य वाढण्यासाठी पाणी मदत करते. प्रत्येक झाडाचा आकार, वाढ, भरीवपणा यानुसार त्याची पाणी घेण्याची क्षमता ठरत असते. निलगिरी हे झपाटयानं वाढणारं झाड आहे. पाच वर्षात ७० फुटांपर्यंत वाढते. त्याचा आकार, भरीवपणासुद्धा इतर पिकांपेक्षा किती तरी पटींनी जास्त आहे.

कोणत्या प्रकारच्या पिकाऐवजी निलगिरीची लागवड केली जात आहे यावरच त्या जमिनीतील पाण्याच्या पातळीचा प्रश्न अवलंबून आहे. पडीक–खडकाळ जमिनीतील पाणी निलगिरीमुळे कमी होईल; परंतु तांदळासारख्या फार मोठया पाण्याच्या पिकाऐवजी निलगिरी घेतल्यास पाण्याची पातळी वाढेलच. अहमदाबादजवळ आदर्श फार्म येथे गेली तेरा वर्षे २ लाख निलगिरी जगून आहेत. त्यामुळे पाण्याची पातळी कमी झालेली नाही. हायब्रीड कपाशीमुळे या परिसरातील पाण्याची पातळी सारखी कमी होत होती. निलगिरीची लागवड झाल्यावर मात्र ही घट थांबली असा अनुभव. उत्तर प्रदेशातील तराई प्रदेशात नैनिताल व बिकानेर भागात गेली वीस वर्षे निलगिरीची लागवड चालू आहे; पण पाण्याच्या पातळीवर काहीच परिणाम झाला नाही. इतर वृक्ष व झाडांच्या मानाने निलगिरीच्या प्रत्येक ग्रामभागाला लागणारे पाण्याचे प्रमाण फारच कमी आहे.

दुसरे असे की, निलगिरीची मुळे पाणी शोधण्यासाठी माती फोडून खोलवर जातात, त्यामुळे पाऊस पडल्यानंतर अधिक पाणी जमिनीत मुरते. पर्यायाने ज्या जमिनीत पाणी मुरत नसेल तिथे ते मुरते.

मातीच्या बाबतीतील भीतीही अनाठायी असते असे दिसून आले. आंध्र प्रदेशातील काही प्रयोगांवरून तर ज्या जमिनीभोवती निलगिरी लावली तिथला कस वाढीला लागून पिकांचं प्रमाणही वाढलंय असा अनुभव आला. निलगिरीच्या पानांच्या विशिष्ट प्रकारामुळे वाऱ्याचा वेग ४५ टक्क्यांनी कमी होतो. त्यामुळे हवेतील दमटपणा २३ ते २४ टक्क्यांनी वाढतो.

निलगिरीच्या पानांसंबंधी फारसे संशोधन झालेले नाही. तरी पण ही पाने अॅसिडिक (आम्लयुक्त) असल्याने आपल्याकडील बहुधा अल्कलीयुक्त जमिनीची घट वाढवितात असा अंदाज आहे. पाने व फांद्या यांचा गळाठा जमिनीवर पडून सात वर्षांत एक हेक्टर जमिनीला ७३ कि. ग्रॅ. कॅल्शिअम, ५९ कि. ग्रॅ. नायट्रोजन, ९ कि. ग्रॅ. मॅग्नेशियम, ३.९ कि. ग्रॅ. फॉस्फरस, ३१ कि. ग्रॅ. पोटॅशियम पुरविला जातो.

## पर्यावरण आणि शेतकरी

मग येतो पर्यावरणाचा प्रश्न. एकाच प्रकारची झाडे लावणे म्हणजे जंगल नव्हे. फक्त निलगिरीच लावली तर तो भाग 'मोनोकल्चर' प्रकारचा होईल असा पर्यावरण–तज्ज्ञांचा आक्षेप आहे. हे झाड, त्याची पाने गुरे खाऊ शकत नाहीत, त्यावर पक्षी राहू शकत नाहीत.

यावर विनायकराव उसळून म्हणतात–

शेतकरी स्वतःची शेती काढून निलगिरी लावतो, ते त्याला फायदा होण्यासाठी. देशासाठी किंवा इकॉलॉजीवाल्यांसाठी नाही. गुरं या झाडाचा पाला खात नाहीत–हेच तर आम्हाला हवं. पक्षी वगैरे बसत नाहीत. शेतकऱ्याला पक्ष्यांकडून नुकसान होण्याची भीती असते. तुम्ही जे जे म्हणून या झाडाचे अवगुण सांगाल ते आमच्यासाठी गुण आहेत. आम्हाला या पिकातनं फायदा होतो ना ? पुरे. त्याचबरोबर इकॉलॉजीवाल्यांचे सामाजिक वनीकरणही होते !

आजपर्यंत सामाजिक वनीकरण करा म्हणून तुम्ही उत्सव, दिंडया हे प्रकार केले. निलगिरीचं एक रोप पुरवायला तुम्ही जीप घेऊन तयार होता. तुम्हाला सामाजिक वनीकरण वगैरेच हवं ना–मी लावतो की, चाळीस लाख झाडं एका फटक्यात ! असं म्हटल्यावर तुम्ही बावचळता अन् मग 'मोनोकल्चर', 'इकॉलॉजी'च्या गोष्टी सांगता.

'साहेब, शेतकरी काही 'इकॉलॉजीसाठी', 'देशासाठी' त्याच्या जमिनीवर झाडं लावणार नाही. हे झाड मला श्रीमंत बनविणार आहे ना, एवढंच तो पाहतो. त्याचा फायदा तो पाहणार. त्याचबरोबर आजपर्यंत प्रयत्न करकरूनही जे जमलं नाही ती झाडं लागणार ना ?'

विनायकरावांना प्रथम पाहिलं ते पुण्यात १९७९मध्ये झालेल्या शाहीर परिषदेच्या वेळी. त्या वेळी ते श्री. शरद पवार यांच्या पुलोद मंत्रिमंडळामध्ये सांस्कृतिक खात्याचे मंत्री होते. आता कोणतीही परिषद म्हटली की, आणि उद्घाटनाला मंत्री आला की, त्याच्यापुढे आपल्या मागण्या मांडायच्या हा परिषदवाल्यांचा खाक्या ठरलेला. त्याप्रमाणे याही ठिकाणी परिषदेच्या संयोजकांनी महाराष्ट्रातल्या शाहिरांच्या सध्याच्या हलाखीच्या परिस्थितीचं चित्र उभं केलं. आता यावर विनायकराव काय बोलतात, याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं.

विनायकराव बोलायला उभे राहिले आणि त्यांनी महाराष्ट्राच्या शाहिरांच्या देदिप्यमान परंपरेचं, त्यांच्या काव्यकौशल्याचं श्रोत्यांची हृदयं पेटवून सोडणाऱ्या शैलीचं रसपूर्ण वर्णन केलं. सबंध सभेचा नूरच पालटून गेला. दहा मिनिटांपूर्वी आपल्या दुर्दशेने अस्वस्थ झालेली शाहीरमंडळी टाळ्यांचा कडकडाट करत विनायकरावांच्या भाषणाला दाद देत होती. आमच्यासारखी कडेला बसलेली पत्रकारमंडळी एकमेकाला म्हणत होती– ‘ याला म्हणायचं राजकीय नेता ! सगळं कसं व्यवस्थित फिरवलं बघा ! ’

यानंतर विनायकरावांशी अनेकदा मुलाखती झडल्या, गप्पांच्या बैठकी रंगल्या आणि त्या प्रत्येक भेटीतून एक गोष्ट सतत जाणवत राहिली की, हा माणूस केवळ राजकीय पुढारी नाही. इतरही अनेक गोष्टींचा आस्वाद घेण्याची क्षमता या माणसामध्ये आहे.



**रसिकता आणि राजकारण**
**आणि आता निलगिरीचे अर्थकारण**

¤

पेशवाईची मिसळ विनायकराव जितक्या चवीने खातात तितक्याच चोखंदळपणाने साहित्य आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचाही ते आस्वाद घेत असतात. पुण्यात आल्यावर ‘ इंटरनॅशनल ’ किंवा ‘ मॅजेस्टिक ’मध्ये त्यांचा फेरा सहसा चुकत नाही.

‘ घाशीराम ’च्या प्रयोगासाठी मुद्दाम नाशिकहून येऊन हजेरी लावणारा विनायकरावांसारखा रसिक विरळाच असेल. राजकारण्यांइतकेच साहित्यिकांच्या बैठकीत रंगणारे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राला माहीत आहेत; पण विनायकराव हे त्यांचंच लहानसं रूप आहे, असं म्हटलं तर त्यात फारसे वावगं ठरणार नाही.

साहित्यिकांविषयी राजकारण्यांना आस्था किंवा आपुलकी क्वचितच असते.

विनायकराव अशा अपवादांपैकी एक आहेत. म्हणूनच मंत्री झाल्यावरही कै. दि. बा. मोकाशींच्या सदाशिव पेठेतील लहानशा बिऱ्हाडात जाऊन ऐसपैस गप्पांची मैफिल ते रंगवू शकत होते.

उर्दू शेरो-शायरी, गजला आणि बेगम अख्तर हा विनायकरावांचा आणखी एक वीक पॉईंट. म्हणून तर नाशिकच्या त्यांच्या निवासस्थानाच्या दिवाणखान्यात भिंतीवर लटकणारं बेगम अख्तरचं कलात्मक छायाचित्र विनायकरावांच्या संवेदनाशील मनाचंच प्रतिबिंब वाटलं.

मराठीतील ज्येष्ठ साहित्यिक कुसुमाग्रज यांच्यासाठीही विनायकरावांच्या रसिक मनामध्ये खास जागा आहेच. नाशिकच्या परिसरातलं निलगिरीचं विश्व पाहून आम्ही विनायकरावांच्या घरी गेलो आणि त्यांनी कपाटातून ‘ छंदोमयी कुसुमाग्रज ’ बाहेर काढला. त्या काव्यसंग्रहातील अनेक कविता विनायकरावांनी एकापाठोपाठ एक पेश केल्या. ‘ प्रेम कोणावर करावं ? प्रेम कोणावरही करावं ’ ही त्या संग्रहातली कविता त्यांना विशेष भावली होती. त्यांनी ती पुन्हा पुन्हा वाचून दाखवली; पण आम्हाला हे सतत जाणवत होतं की, हा कविमनाचा राजकारणी सध्या केवळ निलगिरी वृक्षाच्याच प्रेमात पडला आहे. म्हणूनच कुसुमाग्रजांच्या कवितेच्या ओळी काहीही असल्या तरी विनायकरावांचं अंतर्मन मात्र म्हणत असावं–

‘ प्रेम कोणावर करावं? कोणावरही करावं!
प्रेम इवल्याशा रोपावर करावं–
रोपातून फुटणाऱ्या फांद्यांवर करावं–
फांद्यांवरच्या पानांवर प्रेम करावं–
त्यातून डवरणाऱ्या वृक्षावर करावं–
प्रेम निलगिरीवर करावं ! ’

–सतीश कामत

---

मग ते थोडं गमतीनं म्हणतात– ‘ एवढंसं काही केलं तर वृक्षमित्र वगैरे मिळणाऱ्या पदव्या आपोआप चालत माझ्याकडे याव्या– शंभर वेळा ! ’

इथपर्यंत सर्व ठीक. मात्र या झाडापासून फायदा मिळण्यासाठी पाच ते आठ वर्षं थांबावं लागतं. पाच वर्षं जमिनीतनं काही न घेता तगून राहायचं कसं ? मग हा केवळ पैसेवाल्यांचा खेळ राहतो. लहान शेतकरी यातनं काहीच मिळवू शकणार नाही.

राजस्थान, गुजरात सरकारने जागतिक बँकेच्या मार्फत आलेला पैसा निलगिरी–उत्पादकांना त्यांचा खर्च भागविण्यासाठी म्हणून दिला आहे. महाराष्ट्रातही या सहकारी संस्थेचे तसले कर्ज मिळविण्याचा प्रयत्न चालू आहे.

या निलगिरीच्या प्रयोगासाठी राष्ट्रीय कृषि व ग्रामविकास बँकेकडून (नाबार्ड) कर्ज मिळविण्याचा प्रयत्न संस्थेच्या वतीने चालू आहे. जागतिक बँकेचे अधिकारी इथे येऊन म्हणतात, ‘ सामाजिक वनीकरणासाठी आम्ही पैसा द्यायला तयार आहोत; पण घेणारेच कोणी नाही ! ’

आता नाशिक जिल्हा तयारच आहे !

नीलगिरी लागवडीमुळे रोजगाराच्या संधी कमी होतात. एकद

लागवड झाली की पाच वर्षांनी एकदा तोड असते. हे झाड पंचवीस वर्षं भरपूर उत्पादन देते. एक गोष्ट खरी की खड्डे खणण्यासाठी, आंतरमशागतीसाठी, इतर कामांसाठी मजूर लागतील. दुसरं असं की एखाद्या शेतकऱ्याच्या किंवा त्या गावाच्या सर्वच जमिनीवर एकदम ही लागवड होत नाही. कटाईचासुद्धा तोच प्रकार. रोटेशन पद्धतीने लागवड होत असते. त्यामुळे मर्यादित जणांना का होईना परंतु वर्षभर रोजगार उपलब्ध होणार आहे.

त्याहीपेक्षा, निलगिरीच्या कटाईनंतर जे व्यवसाय, (वाहतूक) कारखाने उभे राहतात त्यातही रोजगाराची शक्यता आहे. एकंदर ऊसाच्या शेतीप्रमाणेच निलगिरीची अवस्था होणार आहे.

## कारखाना कसा व कोणता

या एवढ्या निलगिरीच्या झाडांचं पाच वर्षांनंतर काय करायचं ? या निलगिरीच्या खरेदीची हमी सहकारी सोसायटीने दिली आहे. निलगिरीचे बल्ले तयार होतात. कागदाच्या लगद्यासाठी (पेपरपल्प) त्याची अत्यंत आवश्यकता असते. खोपोलीच्या पारखे पेपर पल्प कन्वर्शन्सने हा लगदा विकत घ्यायची तयारी दाखविली आहे. टनाला सातशे रुपये असा या पल्पसाठी भाव आहे. याबरोबर रस्त्यावरचा कागद-कचरा यांच्यापासून तयार झालेला लगदा ते वापरतात (उसाच्या मळीच्याऐवजी). त्या लगद्याला टनामागे २४०० रुपये दिले जातात.

दुसरा उपयोग म्हणजे रेयॉन धाग्यासाठी लागणारा पल्प या पासून होतो. सध्या भारतातले रेयॉन कारखाने परदेशातून हा पल्प आयात करतात. इथे जर हा पल्प तयार झाला तर ते विकत घ्यायला तयार आहेत, पण ते देतील त्या किमतीवर !

विनायकराव पाटील यावर म्हणतात—'ही एवढी मोठी निलगिरी आम्ही लावली. परदेशातल्या निलगिरीसाठी हे २१०० रुपयांपर्यंत भाव देतील. आम्हाला मात्र कमीच !

एक ५० टनी कागदकारखाना काढण्यासाठी १० कोटी रुपये लागतात. त्याला ६०० एकराचा निलगिरी लागतो. १० टनी रेयॉन पल्पचा कारखाना काढण्यासाठी साडेसोळाशे एकर निलगिरी, ४० कोटी रुपये पाहिजेत. कार्डबोर्ड हार्डबोर्ड यांच्या कारखान्यासाठी २ हजार एकराचा निलगिरी व ६ कोटी रुपये पाहिजेत. आम्हाला हे सहज शक्य आहे. सहकारी तत्त्वावर आम्ही हे कारखाने उभारू शकतो— आणि आमच्या शेतकऱ्याला आम्ही भाव देऊ टनामागे २४०० रुपयांचा.त्यामुळे दुसऱ्या खाजगी कारखानदारांनासुद्धा इथल्या निलगिरी उत्पादकांना भाव वाढवून द्यावा लागेल.

पेपर पल्प, रेयॉन पल्प, हार्डबोर्ड पैकी कोणता कारखाना उभारायचा हे येत्या एक-दोन महिन्यात निश्चित होणार आहे. त्यासंबंधी टाटा कन्सल्टन्सी सर्विसेसशी पत्रव्यवहार सुरू आहे.'

## आमचा पिंडच सहकाराचा

हे सर्व प्रयत्न सहकारी तत्त्वावर चालविले जात आहेत ही लक्षणीय बाब आहे. सहकारी चळवळ ही मराठी माणसाची वृत्तीच आहे. धंदेवाईक चित्रपटवाला जसा कोणत्याही कथेला आपल्या विशिष्ट साच्यात बसवितो, तसं इथे कोणतीही नवी गोष्ट येवो, तिचे सहकारीकरणच होते.

विनायकराव सांगत होते, 'अहो सहकारी सोसायटीमुळे पूर्ण संदर्भच बदलतो. वैयक्तिकरीत्या कुठे प्रयत्न करण्यापेक्षा सहकारी सोसायटीमार्फत गेले तर कुठेही लवकर मान्यता मिळते, मदत, सल्ला ही लगेच मिळते. वनविभाग, वनीकरण विभागाची मदत सहकारी संस्थेलाच मिळाली आहे. महाराष्ट्रातले मन सहकारी चष्म्यातूनच सगळीकडे बघते.

**'भारतातल्या ग्रामीण विकासात आतापर्यंत कै. विखे पाटलांच्या सहकारी साखरकारखान्यांची व आनंद येथील दूध-सहकारी संस्थेची अशा दोन दिशा आहेत. माझी ही तिसरी दिशा आहे.**

**'सहकारी तत्त्वावर वनशेती, उद्योगधंद्यावर आधारलली वनशेती आणि वनशेतीवर आधारलेले उद्योग या प्रेरणा भारतात प्रथम महाराष्ट्रात सुरू होत आहेत. आमचा नाशिक जिल्हा त्याचा अग्रदूत आहे, ही काय लहानसहान गोष्ट आहे ?' विनायकराव मोठ्या अभिमानाने परत-परत हे सांगतात.**

---

### निलगिरी : सर्पणसुद्धा

निलगिरी (युकॅलिप्टस) हे मूळचे ऑस्ट्रेलियातील झाड. त्याच्या पाचशे जाती आहेत. भारतात म्हैसूरचा नबाब टिपू सुलतानने १७८२ ते १७९०, नंदी डोंगरावर निलगिरीची लागवड करविली. १८३२ मध्ये कॅ. डन याने मद्रास इलाख्यातील निलगिरी पहाडीत याची लागवड केली. तेथून उत्तरप्रदेशात लखनऊ, सहारनपूर वगैरे भागात हे झाड आले.

भारतात निलगिरीच्या तीन जाती आहेत. (१) युकॅलिप्टस टेरीटोकार्निस (२) युकॅलिप्टस कॅमलड्युलेन्सीस (३) युकॅलिप्टस हायब्रीड. अर्थात कोणतीही जात शुद्ध नाही. लाकूड देणारी, तेल देणारी, पल्पसाठी उपयोगी पडणारी असे निलगिरीचे अनेक प्रकार आहेत.

निलगिरी झपाट्याने वाढणारे झाड आहे. तराईमधील एका नमुना प्लॉटमध्ये एका हेक्टरात निलगिरीपासून १४.८ सें. मि. व्यासाचे १८०.७ घनमिटर बल्ले मिळते. साडेआठ वर्षात त्याची वाढ १८ मिटर (अंदाजे ७५ फूट) झाली. सुबाभळीपेक्षा ही वाढ जास्त आहे. हे चांगले जळाऊ लाकूडसुद्धा आहे. सुमारे १५ मिटर (४५ फूट) सरळ रेषेत हे वाढते. बांधकामासाठी तसेच रेयॉन पल्प व कागदाचा लगदा यापासून तयार होतो.

निलगिरी हे चांगले जळाऊ लाकूड होऊ शकते. १९८२ च्या अंदाजानुसार भारताला दरवर्षी १ कोटी टन कोरडे सरपण लागते. पाटाखालील जमिनीत एका हेक्टराला निलगिरीचे किमान तीस टन सरपण उपलब्ध होऊ शकते. (साली, छिलके, इतर गळाठा) ३ लाख ५० हजार हेक्टर जमिनीवर जर निलगिरी लावली तर देशातील सर्व सरपणाची गरज भागू शकते. इतर झाडांकडून अधिक सरपण मिळेल. २० लाख हेक्टरवर निलगिरी लावल्यास अडचण येणार नाही. या शतकाअखेर जरी सरपणाची गरज दुपटीने वाढली असे धरल्यास भारतातील पाटाखालील एकंदर जमिनीपैकी फक्त ७ टक्के जमिनीवर निलगिरीची लागवड करावी लागेल. ■

## निष्कर्षाची घाई नको

हा प्रयोग, लाट कितपत यशस्वी होईल, त्यातून काय बाहेर पडेल, लहान शेतकऱ्याचा खरंच फायदा होईल की नाही, कारखाने, त्यानुसार येणारी सत्तेची रचना, (पॉवर स्ट्रक्चर) शेती व उद्योगधंद्यातले संबंध याविषयीच्या निष्कर्षांना अजून पाच–सात वर्षे तरी थांबावे लागेल. जागतिक अन्न व कृषिसंघटनेच्या माहितीनुसार औद्योगिक वनशेतीतील टिकणाऱ्या झाडांचे प्रमाण ७० टक्के आहे. इंधनाच्या वनशेतीत हेच प्रमाण ६० टक्के आहे. (१९५१–१९८० भारतासाठी) ही गोष्ट लक्षात घेता एकरात १४५० निलगिरीची झाडे लावणे व त्यापासून भरीव नफा मिळण्याची अपेक्षा करणे घाईचे होईल.

वनशेतीमुळे अन्नधान्याखालील शेतीचे प्रमाण कमी होईल. याचा एकंदर अर्थव्यवस्थेवर, शेतीमालाच्या भावावर काही परिणाम होईल का ? उसाच्या शेतीऐवजी निलगिरी पुढे येईल, का तसे न होता अन्नधान्याखालील जमीनच त्याच्याखाली येईल हे सर्व प्रश्न पाच वर्षे तरी अनुत्तरित राहतील. त्यातून मिळणाऱ्या फायद्यावरच ही शेती बागायतीच राहील किंवा कसे हेसुद्धा ठरेल.

सामाजिक विषमतेच्या प्रश्नालाही कमी लेखून चालणार नाही. ग्रामीण भागात पैसा खेळण्याऐवजी वनशेती करणारे व कागद–रेयॉन उद्योजक यांच्यात हातमिळवणी झालेली उत्तरप्रदेशातील गढवाल भागात दिसते. 'कर्नाटकात तर कारखानदार उत्पादकांना निलगिरी लावण्यासाठी आगाऊ रक्कम देतात व एका एकरासाठी ४० हजार रुपयांपर्यंत रक्कम देतात. परंतु रोजगार, इंधन, चारा याबाबत निलगिरीपासून काहीच मिळत नाही.

नाशिकमधला प्रयोग सहकारी तत्त्वावर आहे. तसेच दुसऱ्या कारखान्याला उत्पादन देण्याऐवजी या सहकारी संस्थेनेच कारखाना काढायचा संकल्प सोडला असल्याने इथला पैसा ग्रामीण भागातच राहील असा अंदाज आहे.

## वनशेती व जंगल : दोन भिन्न मुद्दे

पर्यावरणतज्ज्ञ व वनप्रेमींच्या आक्षेपाविषयी थोडेसे.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी एकाच प्रकारच्या वृक्षाची लागवड नको, वैविध्य हवे, निलगिरी ही जंगल म्हणून लावण्यास अयोग्य आहे, हेसुद्धा खरेच; परंतु या वनशेतीतील एका महत्त्वाच्या मुद्द्याकडे दुर्लक्ष होते. यामध्ये एका पिकाखालची (ज्वारी, ऊस इ.) जमीन जाऊन तिथे दुसऱ्या प्रकारच्या पिकाखाली जमीन येते. (निलगिरी) त्यामुळे ज्वारी–उसाचे 'मोनोकल्चर' जाऊन निलगिरीचे 'मोनोकल्चर' येते. याचा जंगलाशी काही संबंध नाही. ज्या वेळी नैसर्गिक जंगल तोडून, ( उदा. : गढवाल भागात ) त्या ठिकाणी व्यापारी वनशेती केली जाते, ती बाब जरूर आक्षेपार्ह आहे. गुजरात सोडता इतर राज्यांत असलीनसली नैसर्गिक जंगले साफ करून तिथे व्यापारी वनीकरण करण्यात येते– तेसुद्धा खाजगी कंत्राटदाराच्या ताब्यात. महाराष्ट्राच्या सामाजिक वनीकरणखात्याने व वनविभागाने अतीव उत्साहाच्या भरात, खाजगी वनशेतीचा सार्वजनिक सरकारी जमिनीवरही प्रयोग करण्याच्या भरीस पडू नये. त्यामुळे एक तर अशा जमिनींवरील हे उत्पादन गावातल्या काही जणांच्याच हातात जाण्याचा जास्त संभव असतो

तात्पर्य, खाजगी जमिनीवर वनशेती केली म्हणून सरकारी जमिनीवरही ती करावीच असे नाही. वस्तुत: वनशेती व सामाजिक वनीकरण ही भिन्न अंगे आहेत. वनशेती केल्यामुळे असलेली पिके काढून पर्यावरण, नैसर्गिक समतोलास जसा तडा जात नाही, त्याचप्रमाणे अशा प्रकारच्या 'मोनोकल्चर'मुळे नैसर्गिक जंगलांमुळे मिळणारे फायदे मिळतात असे नाही. वनशेती करणाऱ्यांना वैयक्तिक लाभापेक्षा इतर गोष्टी बघण्यात रस नाही. तो एक व्यापार आहे त्याने त्यांचा लाभ होणार आहे, यात वावगे काहीच नाही.

परंतु सरकारचे कर्तव्य हे एका गटापुरते मर्यादित नसते. नैसर्गिक जंगलांचा पुरस्कार करणाऱ्यांची खिल्ली उडविणे सोपेच असते.

'क्या है जंगल के उपकार–मिट्टी, पानी और बयार'(शुद्ध हवा) असे म्हणणाऱ्यांच्या डोळ्यांसमोर जमिनीची धूप, महापूर, दुष्काळ, कुटीरोद्योग, आदिवासींचे जीवन हे प्रश्न असतात. रुद पानाची,

### मदत : कर्ज

निलगिरीबाबत शेतकऱ्यांना पाच वर्षे तगवून ठेवण्यासाठी बँकांकडून कर्ज घेण्याची योजना आहे. बँक ऑफ बडोदा, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, भूविकास बँक यांनी अशा कर्जासंबंधीच्या तपशीलवार योजना सादर केल्या आहेत.

बागायत व जिरायत असे दोन भाग पाडले गेले. एकरी झाडे लावण्यावर कर्ज नसून त्यांच्या युनिटवर (संख्येवर) ते दिले जाईल. बागायतीचे १५० झाडांचे एक युनिट, तर जिरायतीचे ३०० झाडांचे एक युनिट अशी कल्पना आहे. बागायती लावगडीला ८५० रुपये व जिरायतीला ७५० रुपये खर्च येईल. एकंदर १२ हजार युनिट्ससाठी कर्ज मंजूर करवून घ्यायचे आहे. १९८३–८४ मध्ये एकंदर पाच हजार युनिट्सला कर्ज मिळण्याची शिफारस आहे. मजुरी, फवारणी, आंतरमशागत, खते हा वर्षभराचा खर्च लक्षात घेता बागायती युनिटला वार्षिक रु. २०५० तर जिरायती युनिटला १३०० रुपयांपर्यंत कर्ज मिळावे. दरवर्षीचे उत्पन्नही वाढत जाणार आहे. पहिल्या वर्षी एका युनिटमागे साठ रुपये उत्पन्न मिळेल तर पाचव्या वर्षी ते ७१०० रुपयांपर्यंत जाईल. हा अंदाज बागायतीचा आहे.

राज्यातल्या प्रत्येक जिल्ह्यात सामाजिक वनीकरणाचे खाते आहे. गेल्या वर्षीपासून सुरू झालेल्या राष्ट्रीय ग्रामीण विकासयोजनाअंतर्गत दरडोई आठ रुपये सामाजिक वनीकरणासाठी वापरले जातील. या हिशोबाने नाशिक जिल्ह्याच्या सामाजिक वनीकरणासाठी दरसाल साडेअठरा लाख रुपये मिळतात. यातून निलगिरी लागवडीवर काही रक्कम खर्च होणार आहे.

दर पाच वर्षांनंतर युनिटमागे उत्पादन किती मिळेल याचाही हिशेब झाला आहे. बागायती युनिटमध्ये दोनशे वल्ले मिळतील. दहा रुपये प्रत्येकाची किंमत. वीस टन सरपण ( रु. २४० ) मिळेल. तर जिरायतीतील २०० खांबांचे १६०० रुपये, १५ टन जळण व पाने इतर गळाठा १० पैसे किलोप्रमाणे विकला जाईल असा अंदाज आहे. ◘

झुडुपांपासून महावृक्षांपर्यंत विविध प्रकारची, खाद्यपदार्थ, चारा-सरपण, औषधी देणारी, पाणी धरून ठेवणारी, पाऊस आणणारी, धूप होऊ न देणारी जंगले ही मोठी गरज आहे.

खाजगी जमीनधारकांकडून अशा दीर्घ मुदतीच्या व सामाजिक, दृष्टया महत्त्वाच्या प्रश्नाची दखल घेण्याची अपेक्षा करणे गैर आहे. वनखात्याने व सामाजिक वनीकरणविभागाने वनशेतीला उत्तेजन देताना, दुसरीकडे आपल्यावरील दीर्घ मुदतीच्या व सार्वत्रिक महत्त्वाच्या जबाबदारीचे भान विसरू नये. पर्यावरणप्रेमी व तज्ज्ञ यांचा उपहास तर नेहमीच होत असतो. त्याचे त्यांना विशेष काही वाटू नये.

एक निलगिरीचा प्लॉट पाहून आल्यावर दादासाहेब बीडकर निलगिरी संयोजकांना म्हणाले, 'तुम्ही कमर्शिअल माइंडेड (व्यापारी वृत्तीचे) आहात, फॉरेस्ट माइंडेड (वन-वृत्तीचे) नाही.' इथे ही मर्यादा स्पष्ट होते. वनशेती व जंगल (पर्यावरण) या दोन्ही बाबी एकमेकात न मिसळता, त्यांचा स्वतंत्रपणे विचार करणे जरुरीचे आहे.

सहज एक संदर्भ दिसला म्हणून उल्लेख– उत्तर प्रदेशातील ए. एन चतुर्वेदी या अधिकाऱ्याने लिहिलेल्या निलगिरीवरील पत्रकात म्हटले आहे–

'निलगिरी फक्त निवडक जागांवरच लावावी. कोरडवाहू जमिनींसाठी ही जात योग्य नाही.'

निलगिरीच्या वनशेतीच्या अशा उलटसुलट गुणांविषयी आता या लागवडीमुळे चर्चा होईल, अनेक पर्याय पडताळून पाहिले जातील, प्रयोग होतील. वर्षानुवर्षे एकमार्गी असलेली आपली शेती वेगळ्या वळणावर येईल. एवढे जरी साधले तरी फार झाले!

आज विनायकराव पाटील मात्र पार बुडाले या निलगिरीत. 'ही हॅंज गॉन मॅड'च्या चालीवर, 'विनायकराव हॅंज गॉन निलगिरी' म्हणत' येईल. वनखात्याच्या नर्सरीमधली उंच निलगिरीची रांग पाहून आपली लाखोनी असलेली निलगिरी कशी दिसेल या कल्पनेत ते आहेत. दोनच महिन्यांपूर्वी लावलेले आपल्या शेतातले हे नवे पाहुणे दीड-दोन फूट वाढले त्याचे कौतुक त्यांच्या बोलण्यातून ओसंडत असतं. ते म्हणतात की, मी निलगिरीचा वकील नाही; परंतु सर्वात कमी अवगुण असलेलं तेवढंच झाड मला मिळालं. हे जर फायदेशीर वाटलं नाही तर ते फेकून दुसरं लावू.'

निलगिरीसंबंधीचं काम आता लागी लावलं. रोज हजारो रोपं लावली जातात. इतके दिवस राजकारणाकडे पार दुर्लक्ष होतं– आता थोडं तिकडेही बघावं असं विनायकरावांना वाटते. सहज एक शेर अर्ज होतो–

'इस निलगिरीने हमें निकम्मा कर दिया है गालिब
वरना हम भी आदमी थे कामके ॥ □


# एक किफायतशीर खरेदी

कोणतीही वस्तू खरेदी केली की काही दिवसांनी परत विकताना तिची किंमत कमी झालेली असते; पण एक खरेदी मात्र अशी आहे की, ठराविक मुदतीनंतर तिच्या किंमतीत दुपटी-तिपटीने वाढ झालेली असते ... अशी फायदेशीर खरेदी म्हणजेच ... महाबँकेची ...

## 'कॅश सर्टिफिकेटस्'

या सर्टिफिकेटांची दर्शनी किंमत जरी जास्त असली तरी मिळतात मात्र स्वस्त !

उदाहरणार्थः–रु. १०००/– किंमतीचं सर्टिफिकेट आज मिळतं
केवळ– रु. ३३७·९० ला आणि १२० महिन्यांनी मात्र
त्याचे रु. १०००/– मोजून घ्यायचे !


**ठराविक मुदतीनंतर तुमचे पैसे तिप्पट करणारी लाभदायी बचत ... आणि बचतीसाठी ..**

## बँक ऑफ महाराष्ट्र

( भारत सरकारचा उपक्रम )

**मुख्य कचेरी : लोकमंगल, १५०१, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५**

# कुंपण आणि आकाश



मंगला गोडबोले

'तुमचे ते मोर्चे, घोषणा आपल्याला थोडंच जमणार आहे?'–तिचा अखेरचा युक्तिवाद.
पण मी तरी त्यातली कुठं आहे?
नेतृत्वाची ऊर्मी उसनी थोडीच आणता येते?
आणि तशी अपेक्षा तरी कुठं असते?

'गेली होतीस त्या केंद्राच्या उद्घाटनाला?' रस्त्यात भेटल्यावर मी तिला उत्साहानं विचारलं तेव्हा तिनं नुसतीच निरुत्साहानं मान हलवली. अर्थात नकारार्थी. मागल्याच आठवड्यात आमचं दोघींचं त्या केंद्राबद्दल बोलणं झालं होतं, त्या वेळी तिच्यात हा निरुत्साह नव्हता. स्त्रीअत्याचारनिवारण, स्त्रीसंघटन या हेतूनं गावात एका नव्या केन्द्राची स्थापना होत होती. वृत्तपत्रांतली प्रसिद्धी, उद्घाटनासाठी एक अग्रणी स्त्रीमंत्री, कार्यकर्त्यांचं मोहोळ हा सगळा सरंजाम होताच. जिज्ञासेपोटी, तेवढाच संख्याबळाला हातभार म्हणून आम्ही दोघींनीही जायचं ठरवलं होतं. मला ऐनवेळी परगावी जावं लागल्यामुळं जाता आलं नाही आणि ती गावात असूनही गेली नाही; रिकामी असूनही गेली नाही. असं काय कारण झालं असेल? मी दोन-तीनदा खोदूनखोदून विचारलं तेव्हा ती त्राग्यानं म्हणाली,

'दुपारपासून जायचं जायचं म्हणत होते. दहा कामांची जुळवाजुळव करून ठेवली होती. कुठे कोणाची मिजास बिघडायला नको म्हणून धाव धाव धावले होते; पण ऐनवेळी... जाऊ देत म्हणा! आमचा जन्म असाच जायचा. कुरकुरण्यात, चडफडण्यात, कुढण्यात! आणि मेली ही केन्द्रं तरी करून करणार आहेत काय? दोन मुलाखती, चार फोटो, साताठ तीच ती टाळकी! शेवटी आपण आपल्या घरात! आणि केन्द्र नियम, पोटनियम, सभा, सभासद यांच्या विळख्यात! मग अशी छप्पन्न केन्द्रं का निघेनात!'

मी लक्षपूर्वक ऐकत होते. तिचं बोलणं मनापासूनचं होतं, कळकळीचं होतं; पण त्यात भावनेचा भर जास्त आणि तर्काचा आधार कमी होता. इच्छा असून, तिच्यादृष्टीनं पूर्वतयारी जय्यत केलेली असूनही तिला समारंभाला जाता आलं नव्हतं. त्यातली चीड, असहाय्यता समजण्यासारखी होती. प्रश्न नुसता या एका समारंभाचा नव्हता. मनात असलेली गोष्ट करू न शकण्याचे प्रसंग पुष्कळ बायकांवर पुष्कळ वेळा येतात. त्यामुळे होणारी कुचंबणा अशा प्रकारे उद्रेक होऊन बाहेर पडते आणि एकूणच आपल्या प्रश्नांबाबत कोणतीही व्यक्ती, संस्था काहीही करू शकणार नाही अशा ठाम नकारात्मक भूमिकेला बायका येऊन ठेपतात.

बायका दुखणी अंगावर काढतात, अगदीच नाइलाज होईपर्यंत डॉक्टरकडे जात नाहीत, देह बंड पुकारीपर्यंत अंथरूण धरत नाहीत हे जगजाहीर आहे. मनाची दुखणी मात्र बायका किती अबोलपणं, किती दीर्घकाळ सोसतात हे चटकन इतरांना कळत नाही. दुर्दैवानं हे मानसिक ताण, संघर्ष, कुचंबणा मूकपणे सोसलीच पाहिजे असं स्वतः बायकांनाही वाटतं आणि समाजालाही वाटतं. त्यामुळं याबाबत कुठेही मनमोकळ्या संवादांचा, विचारांच्या देवाण-घेवाणींचा प्रयत्न होत नाही. निदान अजूनपर्यंत होत नव्हता. या संवादाला आता कुठे किंचितशी सुरुवात होत आहे तर त्याला खुद्द बायकाच असा खो घालत सुटल्या तर कसं होणार? माझ्या या मैत्रिणीसारखं?

'जाऊन तर बघायचं होतंस, तेवढंच दहा बायकांत मिसळता आलं असतं. त्यांच्या मनांचा, मतांचा कानोसा घेता आला असता. पटलं नसतं तर पुढं सोडून द्यायचं होतंस.' मी सामोपचाराच्या स्वरात सुचवून पाहिलं; पण त्यावर ती उसळलीच–'दहा काय, शंभर बायकांमध्ये मिसळतेच की मी नेहमी. सहज रस्त्यानं कुठेही येता-जाताना, सणासमारंभामध्ये, उत्सव – संमेलनांमध्ये काय थोड्या बायका भेटतात आपल्याला?'

ती उसळली होती म्हणून मी गप्प राहिले; पण शक्य असतं तर मी तिच्या विधानात एक किरकोळ दुरुस्ती सुचवली असती. बायका खरंच 'भेटतात' का? का नुसत्याच दिसतात? एकमेकींकडे नुसतेच कटाक्ष टाकतात आणि ज्या प्रयत्नपूर्वक भेटतात त्या तरी 'व्यक्ती' म्हणून किती भेटतात आणि कोणाच्या तरी कोणी तरी म्हणून किती भेटतात? उदाहरणार्थ, ही माझी मैत्रीणच बघा ना. मुलांना शाळेत पोचवायला, आणायला जाते तेव्हा असंख्य तरुण आयांच्या घोळक्यात ती मिसळते. माफक, जुजबी गप्पाही मारते; पण ते असतं तिच्या मुलांच्या मित्रमैत्रिणींच्या आयांचं संमेलन. नवऱ्याच्या ऑफिसच्या किंवा क्लबच्या कार्यक्रमांना ती हजर राहते तेव्हाही हॅलो, हायची देवाणघेवाण ती तरुण, समवयस्क बायकांमध्ये करतेच; पण तो असतो तिच्या नवऱ्याच्या मित्रांच्या किंवा सहकाऱ्यांच्या बायकांचा मेळावा. या सगळ्याच संबंधांना वेळेकाळाच्या, त्या त्या तात्पुरत्या संदर्भाच्या, व्यावहारिक उपचारांच्या अनेक मर्यादा असतात. त्यामुळं खरोखरच मनातलं, मनापासूनचं बोलणं यात किती होत असेल याची शंकाच आहे. यापलीकडे जाऊन प्रत्यक्ष एखाद्या नोकरी–व्यवसायाच्या निमित्तानं आजकाल पुष्कळ बायका एकत्र येताना दिसतात; पण तेही खरं एकत्र येणं नसतंच. कामाच्या वेळेनंतरचा एखादा जादा क्षणही एकमेकींबरोबर घालवण्याची चैन त्यांच्यातल्या कित्येकींना परवडत नाही इतक्या त्या नोकरी–संसाराच्या घाण्याला जुंपलेल्या असतात. त्यामुळं कामानिमित्त, कामापुरतं असंच त्यांच्यातल्या नात्याचं स्वरूपही राहातं.

म्हणजेच आजच्या बहुसंख्य स्त्रिया मोकळ्या वैचारिक देवाणघेवाणीला पारख्या झालेल्या आहेत. एक काळ होता जेव्हा पाणवठ्यावर जमलेल्या कोवळ्या सासुरवाशिणी सुख-दुःखांची ओझी हलकी करीत. एक काळ होता जेव्हा जात्यावरच्या ओव्यांमधून, प्रासंगिक स्त्रीगीतांमधून त्यांच्या मनातली दुःखं उत्स्फूर्तपणे बाहेर पडत. आज यातली भाबडी उत्स्फूर्तताही राहिली नाही आणि सह–अनुभूतीही राहिली नाही की काय असा संशय यावा इतकी परिस्थिती बदललेली आहे. एकीकडे अर्थार्जनाची सक्ती, दुसरीकडे सुशिक्षितपणाचं ओझं, संसारातली बदललेली भूमिका, वाढतं वय, वाढत्या अपेक्षा, त्यांना गाठण्यासाठी करण्याची उरस्फोड या सगळ्या दुष्टचक्रात आज बहुसंख्य बायकांची पार बेटं होऊन गेलेली आहेत. या बेटांपलीकडे बायका बायकांनाच भेटू शकत नाहीत तर स्त्री-पुरुषांच्या मनमोकळ्या संवादाची अपेक्षा आपण करायची कशाच्या बळावर ?


राहता राहिली कुटुंबं. त्यात वेगवेगळ्या नात्यांनी वेगवेगळ्या स्त्रिया हयातभर एकमेकींना सामोऱ्या जात असतात; पण त्यात स्वेच्छेपेक्षा सक्तीचा भागच जास्त असतो. भरीत भर म्हणजे त्या नात्यांच्या श्रेणी, मानपानाचे दुराग्रह, सासरमाहेरा-संबंधीचे ते पारंपरिक पूर्वग्रह ! सासू, नणंद, जाऊ ही नाती निकोप दृष्टीनं बघितली जाण्याची शक्यतासुद्धा कमी. मग खेळी-मेळीचं, जवळिकीचं वातावरण त्यात येणार तरी कुठून ?' कितीही शिकल्या तरी बायकांची बुद्धी नात्यांच्या हेव्यादाव्यातच जायची असा हमखास शेरा यावर काही माणसं मारतात; पण त्यात सर्वस्वी बायकांचा दोष नसतो. एकीकडे मानवी नातेसंबंधांचं सनातन स्वरूप याला कारणीभूत आहे तर दुसरीकडे स्त्रियांच्या विश्वाचं संकुचितपण त्यांनाच कसं मारक ठरतं याचंही हे द्योतक आहे.

निष्कर्ष इतकाच की, नात्यात असो की नात्यापलीकडे असो, वेगवेगळ्या वयाच्या सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक स्तरांतल्या स्त्रिया एकत्र येण्याच्या शक्यता आजवर फार कमी होत्या. आजही परिस्थिती त्यांना पोषक नाही. म्हणून जाणीवपूर्वक असे प्रयत्न होत असतील तर त्यांची जोपासना व्हायला हवी. निदान स्त्रियांना तरी त्याबाबत स्वागतशील व्हायला हवं !

'स्वागत करायचं म्हणजे काय ? नसतं घोळक्यात जाऊन बसायचं ? तुमचे ते मोर्चे, घोषणा आपल्याला थोडंच जमणार आहे ?' तिनं अखेरचा युक्तिवाद केला तेव्हा मात्र मला हसू आलं. मोर्चे, घोषणा तिनं माझ्या पदरात टाकलं असलं तरी मी तरी खरी त्यातली कुठे आहे ? पुढारीपणाचा एक पिंड असतो, नेतृत्वाची एक ऊर्मी असते. ती उसनी आणता येत नाही. आणली तर फार काळ टिकत नाही. श्रेय देण्यापेक्षा हसंच करून जाते; पण प्रत्येकीनं घोषणा द्याव्यात, झेंडे धरावेत अशी अपेक्षा तरी कुठे आहे ? प्रश्न समजावून घ्यावेत, प्रश्न पडलेल्यांना धीर द्यावा, पाठीशी मोठ्या संख्येनं उभं राहावं, आपल्याला शक्य असेल त्या माध्यमातून आपली नाराजी नोंदवावी आणि मुख्य म्हणजे दूर कुठे तरी जळणाऱ्या कुणा तरी स्त्रीच्या देहामनाशी आपणही काही तरी देणं लागतो याचं भान ठेवावं हे तरी करणं शक्य आहे ना आज आम्हाला ?


ठरलं. त्या केंद्राच्या पुढल्या सभेला मी जाणार आहे तिला घेऊन. माझी खात्री आहे, हळूहळू तिलाही त्याचं महत्त्व पटायला लागेल आणि न जाणो, एखाद्या दिवशी एखाद्या सभेत किंवा घोषणेत तिचाही आवाज उमटेल. मी त्या दिवसाची वाट बघेन !

□



# आपली मुलं

पालकत्व म्हणून मुलांबद्दल वाटणारं प्रेम, जबाबदारी फक्त आपल्याच एक–दोन मुलांपुरती मर्यादित असावी हे चुकीचं नाही का ? स्वीकारणं अवघड आहे पण पहा विचार करून...



## ही पण आपलीच मुले.

**शोभा भागवत**

'अरेऽऽ, लोकांच्या पोरांना खायला मिळत नाही आणि तुम्हाला मिळतंय तर गिळत नाही होय रे !' खाण्याचे नखरे केले, हे नको, ते नको केलं की तळतळून आई म्हणायची. ही लोकांची पोरं कधी दारावर भीक मागायला यायची, कधी बूटपॉलिश करताना दिसायची, कधी हॉटेलात, उसाच्या गुऱ्हाळात कामं करताना दिसायची. प्रवासात गाडीत काय काय विकायला यायची, रस्त्यावर उकिरड्यात काहीबाही शोधताना दिसायची. आयुष्यातली फार वर्षं ही 'लोकांची पोरंच' राहिली. झोपडपट्टीतल्या कामाच्या निमित्तानं ही मुलं जवळ आली, कळली–बोलली तेव्हा वाटलं इतके दिवस

का दूर राहिलो यांच्यापासून आपण? मुलांना शिकवण्यासाठी झोपडपट्टीत गेलं की प्रथम दिसायचं लोकांच्या आणि मुलांच्याही डोळ्यातले अविश्वास, तिरस्कार आणि कुतूहल यांचं मिश्रण. कधी त्यात कुचेष्टेचीही छटा असायची. समाजसेवेच्या निमित्तानं, संशोधनाच्या निमित्तानं, अभ्यासाच्या निमित्तानं, कुटुंबनियोजन, आरोग्य–कार्यक्रमांच्या प्रचाराच्या निमित्तानं शिकलेल्या माणसांनी झोपडपट्टीत येणं याची या मंडळींना सवय होती. आम्ही शिकवायला आलो आहोत असं म्हटलं की, मुलांच्या आया म्हणायच्या 'चला बाई उद्यापासून सुरू करा. पोरांचंबी शिकणं चालू व्हईल तुमचाबी पगार चालू व्हईल!' आपल्याला मिळणाऱ्या पैशा–पगारापायीच झोपडपट्टीतल्या लोकांबद्दलचं प्रेम उफाळून येतं हेही त्यांना माहीत होतं.



मुलांना शिकवायला लागलं की मुलांमधला हा अविश्वास त्यामानाने लवकर दूर होतो. मोठ्या माणसांच्या मते आपण पास व्हायला मात्र वर्षभर सहज लागतं.

आमच्याकडे शिकायला यायची ती मुलं चारपासून चौदा–पंधरापर्यंतच्या वयांची असायची. त्यात आपल्या पाच-सहा वर्षांच्या बहिणींच्या कडेवरून आलेल्या वर्ष–दोन वर्षांच्या मुलांचाही समावेश असायचा.

लहान वयाच्या मुली बहुधा आईबरोबर धुण्याभांड्याला जायच्या. कुणी कागद वेचायला जायच्या. कुणी आईबरोबर वीटभट्टीवर कामाला जायच्या. जरा मोठ्या मुली स्वतंत्रपणे धुण्याभांड्यांची कामं, घरकामं करायच्या. मुलं बहुतेक हॉटेलमध्ये कामं करायची.

लहान भावंडांना सांभाळणं, स्वैपाक करणं, घर सारवणं, दळण आणणं, दुकानातून वस्तू आणणं, गावातून हिंडून कुठे झाड पडलं असेल तर लाकडं गोळा करून आणणं ही लहान मुलामुलींचीच कामं.

सात–आठ वर्षांच्या मुलीसुद्धा कागद वेचून रोज साठ–सत्तर पैसे मिळवायच्या. पैसे साठवायच्या. एकदा पंचफुला नावाची एक चुणचुणीत मुलगी आनंदानं सांगत होती– 'बाई, म्या कागद वेचून पाच रुपये साचवलं होतं. मग माजी आज्जी गावाकडनं आली. तिला दीड रुपयाच्या बांगड्या भरल्या आणि दीड रुपया आईला वशाट (मटन) आणायला दिला. आता नागपंचमीला मला बांगड्या भरायच्या म्हणून आणखी पैसं साठवणार!' स्वतःच्या पायावर उभं राहून घरच्याही खर्चाला हातभार लावणाऱ्या त्या गुड्याएवढ्या मुलीकडे मी पहातच राहिले.

रोजच्या कामांमध्ये वडलांना दारू आणून देणं हेही कुणा आठ वर्षांच्या मुलीचं काम असू शकतं याची मला कल्पना नव्हती. त्या मुलीची आई मुलीचं कौतुक करून सांगत होती, 'तशी लई हुशार आहे बघा बाई आलकी. (अलका) एकदा बापासाठी दारू घेऊन येत होती तर पोलीस हिच्या पाठी लागले तर ओढ्यात टाकली बाटली हिनो आणि तिथंच परसाकडला बसली. पोलीस आल्यावर म्हणाली, 'कुठं काय? मी याच्यासाठी आले हिकडं' मग पोलीस गेल्यावर ओढ्यात उतरून बाटली घेऊन आली घरला!' आई कौतुक करते आहे ते बघून अलकालापण जोर आला. मग ती सांगायला लागली. 'बाई, गुत्त्याजवळ हाय ना आळूची वडी मिळती. नरड्यात लई खवखवती बघा खाल्ल्यावर!'

अशी ही हुशार अलका! तिला आम्ही आमच्याकडे शिकायला आल्यावर 'सुखी सगळ्यांना ठेव देवराया!' ही प्रार्थना शिकवत होतो, बुद्धिमापन कसोट्यांमधील कोडी सोडवायला शिकवत होतो.

शिकलेल्या, ब्लॉकमध्ये राहणाऱ्या. चांगले कपडे घालणाऱ्या लोकांबद्दल त्या मुलामुलींना खूपच समज होती. घरकामं करणाऱ्या मुली रंगात आल्या की, आपल्या मालकिणींच्या नकला करायच्या. म्हणायच्या, 'आपल्या घरी कुणीबी आलं तरी त्याला भाकरी खाल्ल्याबिगर सोडनार न्हाई आपुन आणि या बाया कुणीबी आलं तरी चहाच शिजवून घालत्याल आणि आम्ही काम करताना तर आमच्याकडे पाठ करून जेवून घेत्यात!'

झोपडपट्टी बघायला म्हणून एकदा आमच्याबरोबर एक लिपस्टिक वगैरे लावणाऱ्या बाई आल्या होत्या. त्यांना मुलींनी विचारलं, 'बाई, तुम्ही पण आता रोज येणार इकडे?' त्यावर त्या म्हणाल्या, 'मला रोज कामं असतात.' लगेच मुलींचा प्रश्न 'कसली कामं करता तुम्ही? धुण्याभांड्याची?' त्या बाई खूप कृत्रिम मजूळ बोलत होत्या, तर छबूनं त्यांना विचारलं, 'बाई, तुम्ही हळू का बोलता? जरा ओरडून बोलावं!'


चार-पाच वर्षांचा सुरेश एकदा शिकायला आला नाही तेव्हा चौकशी केली तर कळलं की, त्याची आई त्याला आज घर राखायला ठेवून गेलीय. त्याच्या घरी जाऊन पाहिलं तर सुरेश दारातच खेळत बसला होता. झोपडीला बंद करायला दार नव्हतंच म्हणून एकानं कुणी तरी कायम घरात रहावं लागायचं. बोलता बोलता सुरेश म्हणाला,

'बाई, तुमचा पोरगा पण घर राखतो का ? मी म्हटलं, 'हो. राखतो ना !' 'पण बाई तुमच्या घराला दार आहे का ?' त्यावर एका मोठ्या मुलानं म्हटलं, 'येड्या, बाईचा तर बंगला असेल. दाराचं काय इच्चारतोस ?'

मोठी घरं, सुंदर घरं, सजवलेली घरं, म्युझियमसारखी दुर्मिळ. महाग वस्तूंनी नटवलेली घरं पाहिली की, दार नसलेल्या झोपडीच्या दारात खेळणारा सुरेश हमखास आठवतो.

एकदा रंजू साडी नेसून आली होती. मी म्हटलं, 'वा ! छान दिसतेय साडी!' ती पटकन म्हणाली, 'आमची कसली गरिबाची साडी बाई. तुमच्या साड्या जोडाच्या नसतात. ह्या मुलीची आई एकदा मुलाच्या शाळेत भांडून आली होती ते सांगत होती. 'मास्तर मला हाकलून द्यायला लागले तर मी म्हटलं, 'दोन रंगांची साडी नेसून आले म्हणून मला कमी मानू नका मास्तर. मी पण आठवी पास आहे !' जोडाच्या साड्या, फाटक्या साड्या यांच्याबद्दल असं अनेक संदर्भात बोलणं निघायचं. शिक्षणक्षेत्रातल्या लोकांना Surprise Visits देण्याची फार आवड. अशी अचानक पाहुणेमंडळी वस्तीत आली की, बाया फार संकोचायच्या. मग म्हणायच्या. 'बाई, आम्हाला आधी सांगायचं तरी म्हणजे आम्ही चांगल्या साड्या नेसून आलो असतो. तुम्ही एवढ्या मोठ्या लोकांना आणता आणि आमच्या अंगावर फाटक्या साड्या, बरं दिसतं का ?' मी मनात म्हणायची, 'बायांनो, याची लाज येणाऱ्यांना वाटली पाहिजे. तुम्हाला नाही. अविश्वासावरच उभारलेल्या आपल्या पद्धतींमध्ये बऱ्या न दिसणाऱ्या इतक्या लाजिरवाण्या गोष्टी आहेत की, तुम्ही लाज कसली बाळगायची?'

आठ-नऊ वर्षांची छाया आठवडाभर शिकायला आली नाही. ती एकदम साड्याच नेसायला लागली. मला वाटलं आईचाच आग्रह असणार तिच्या. म्हटलं, 'छायाच्या आई, लहान आहे ती अजून. एवढ्यात कशाला साड्या नेसायला लावता तिला ?' तर छायाच्या आईनं काय म्हणावं- 'बाई, कामावर दोन साड्या मिळाल्या. मग छायाला म्हटलं आता साड्याच नेस. कपडे करायला काय लवकर जमणार नाही.'



हे सगळं अनुभवलं की, बाजारात येणाऱ्या नवीन फॅशनच्या भारी साड्या, त्याहून भारी साड्या, मॅचिंग, घराघरातले साड्यांचे संग्रह सारं अस्वस्थ करत राहतं.

बाईच्या साडीला हात लावून पहाणं, पदर धरून बसणं हा पण लहान मुलामुलींचा रोजचा उद्योग असायचा. बाई, तुमची साडी किती मऊ आहे असं एखादी मुलगी म्हणायची. एक मंगल नावाची तरतरीत चेहऱ्याची, चार-पाच वर्षांची मुलगी नेहमी चिकटून बसायची. बाकीची मुलं खेळत असली तरी ही मला सोडायची नाही. खूप दिवसांनी कळलं की, वस्तीत त्यांच्या घराला जवळ जवळ वाळीतच टाकलंय. मंगलच्या आजोबांना महारोग होता आणि अलीकडे तिच्या आईलाही झाला होता. मंगलला कुणाच्याही घरात प्रवेश नव्हता.

अशी स्पर्शाची भूक खूप मुलांना असायची. पोतराज म्हणून देवाला सोडलेली दोन मुलं होती. त्यांचे केस कापलेले नसायचे. ही मुलं मोठेपणी कडकलक्ष्मी होणार हे देवाच्या नावानं ठरलेलं होतं. नऊ-दहा वर्षांचा पोतराज बाळू कधी कुणात नीट मिसळायचा नाही. शाळेत जात नव्हताच. आला की मारामाऱ्या करायचा. पुस्तकं-वह्या पळवायचा. नेहमी अस्वस्थ असायचा. एकदा गमतीत कागदाचे छोटे छोटे फ्रॉक, परकर, पोलकी करण्याचा खेळ चालू होता. बाळूला हा प्रकार फार आवडला. कधी नाही तो जवळ आला आणि गुर्मीतच म्हणाला, 'बाई, मला एक बनियन करून द्या !'

त्याला छोटा बनियन कापून दिला. तो त्याला इतका आवडला की, किती वेळ तो हातात धरून माझ्यामागेच बसून राहिला. इतर मुलांना शिकवणं चालू होतं तिकडे बाळूचं लक्षच नव्हतं. तेवढ्यात वारा आला. रस्त्यावरची बरीचशी धूळ-कचरा माझ्या अंगावर उडाला तर बाळू प्रेमाने माझ्या साडीवरचा कचरा हलक्या हातांनी झाडत होता.

स्पर्शाची, प्रेमाची भूक ही मुलं अनेकदा वेगवेगळ्या युक्त्या करून पुरी करून घ्यायची. मुलांना घरोघर बोलवायला गेलं की, एखादी म्हणायची, बाई, आज माझी वेणी तुम्ही घालून द्यायला पाहिजे. मग 'आज मी वेणी घालीन; पण उद्या तू उवांचं औषध लावलं पाहिजेस !' अशा अटीवर भोवती जमलेल्या आठ-दहा मुलींच्या साक्षीनं वेणी घालण्याचा कार्यक्रम व्हायचा. त्या दिवशी वेणी घालून दिलेली मुलगी फारच समंजसपणे वागायची.

शिकवणं संपलं की, मुलं घरी जायला तयारच नसायची. बसस्टॉपपर्यंत पोचवायला यायची. बस येईपर्यंत थांबायची. तिथे बसस्टॉपवरच्या दांड्यांवरून उड्या मारणं, लोंबकळणं चालू असायचं, गप्पा रंगायच्या. बस आल्यावर बाईंना ढकलून बसमध्ये चढवलं की खरी शाळा सुटायची !

माझी मुलंपण बऱ्याच वेळा माझ्याबरोबर यायची. मग मुलीच्यामागे त्या सगळ्या मुली असायच्या. 'माझी हरणी ग' म्हणून तिला उचलून घ्यायच्या. एखादी स्वतःच्या गळ्यातली नवी मोत्यांची माळ तिच्या गळ्यात घालायची आणि निघताना माळ काढून दिली तर म्हणायची, 'बाई, घेऊन जा की, तुमच्या पोरीला ही माळ. ती माझ्या बहिणीसारखीच आहे !'

अशा ह्या प्रेमळ मुली आपसात भांडायला लागल्या की, मात्र मला अजिबात ऐकायच्या नाहीत. एकदा सगळ्या मुलांची नखं कापली; पण आक्का तयार होईना नखं कापायला. 'का ग कापून घेत नाहीस ?' विचारलं तर म्हणाली, 'आम्हाला लागतात नखं भांडणात ओरबाडायला !' मलाही एकदा तिच्या नखांचा प्रसाद मिळाला होता.

एकदा मी येण्यापूर्वी जोरदार चालू असलेलं भांडण थांबलं; पण धुसफूस चालू होती. त्यावर 'बाई आहेत म्हणून नाही तर मी बोलले असते,' असं आशा म्हणाली. मी म्हटलं, 'काय बोलली असतीस ?' तर म्हणाली, 'आमच्या लई घान शिव्या असत्यात' मी म्हटलं, 'मला माहिती आहेत त्या' मग सगळ्यांना फारच रस वाटला.

सांगा बरं ही शिवी माहीत आहे का, ती माहीत आहे का, याचा अर्थ काय वगैरे गप्पा सुरू झाल्या. रस्त्यात कुणाचा धक्का लागला की, कसा शिव्यांचा पाऊस पाडायचा, त्याचं प्रात्यक्षिक झालं. सगळं झाल्यावर १४–१५ वर्षांचा सतीश म्हणाला, 'अन बाईंना काहीपण शिव्या माहीत नसतील, या बायका नुसतं हलकट, नालायक म्हणतात !

हा सतीश हॉटेलात काम करायचा. हॉटेलमालक ग्लास फुटला की, कसा रागावतो, मारतो याची नक्कल करून दाखवायचा. रोज एका कागदावर काही तरी लिहून घ्यायचा. म्हणायचा, 'मी हॉटेलात घेऊन जातो कागद आणि मध्ये वेळ मिळाला की वाचतो.'

कधी शाळेत न गेलेल्या या मुलांना साक्षरतेचा सगळा प्रांत अपरिचितच होता. माझ्याकडे अक्षरांचे, शब्दांचे पत्ते असायचे, ते बघून लिहायचा प्रयत्न चालायचा. चुकून एखादा पत्ता उलट दिला तर मुलं अक्षरं उलटी काढायची. रेघेच्या खाली अक्षर असतं हे कुणाला माहीत ? एखादी मुलगी उत्साहानं चार पाच ओळी भरून वेगवेगळे आकार काढून दाखवायची आणि म्हणायची, 'पुस्तकात असेच किडे किडे काढलेले असतात न बाई ?' भेंड्या खेळायला लागलं की क पासून सुरू होणारं गाणं, म पासून सुरू होणारा शब्द म्हणजे काय हे लक्षात यायचं नाही. कारण आजवर बोलण्याचे वाक्यं, शब्द, अक्षरं असे तुकडे असतात हे माहीत नसायचं. एकदा तर गंमतच झाली. एक शिक्षक मुलांना गोष्ट सांगायला आले होते. त्यांनी शाळेतल्या सवयीप्रमाणे विचारलं, 'मी आता म्हणतो ते वाक्य कुणी म्हटलंय ते सांगा बरं का– स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' सगळी मुलं गप्प. 'सांगा सांगा लवकर ! सांगा, कुणी म्हटलं हे वाक्य ?'

त्यात कुंताबाईचं डोकं चाललं. तिनं ते वाक्य स्वतःशी म्हणून पाहिलं आणि जोरात ओरडली,

'म्या म्हनलं !'

त्या मुलांना स्वतंत्रपणे सारं करायची इतकी सवय होती की दोन तास बाईंनी ठरवलेला कार्यक्रम बाई घेतायत हे त्यांना खपायचं नाही. मग कधी मुलं म्हणायची, आता आम्ही रामलीला करतो. मग पार्ट वाटले जायचे. कोण राम, कोण लक्ष्मण, कोण सीता, कोण रावण. तुमने मेरे भाईको मारा. मैं तुमको नहीं छोडूंगा । असे डायलॉग असायचे हिंदी पुरेसं वाटलं नाही की मराठीला खेचून आणलं जायचं. मधेच राम–सीतेसमोर 'नजरोंके तीर मारे कस कस कस' हे गाणं म्हणत त्यावर नाच व्हायचा. हिंदी चालीवरची मराठी गाणी असायची.

'सजणे तुझा रागही असा
चावतो मला नागही जसा'

यावर नाच व्हायचा.

एकूण सर्वांगसुंदर रामलीलेतला उत्साह अफाट असायचा. त्यापुढे आमची गोष्टींची 'नाटयीकरणं' फिकी पडायची.

गोष्टींची नाटकं करतानासुद्धा इतक्या छोटया छोटया गोष्टींनी मुलांना आनंद व्हायचा. एकदा कॉलेजला जाणारी एक मुलगी बसस्टॉपवर उभी असते असं नाटकात होतं. मग त्या मुलीच्या हातावर पेननं घडयाळ काढून दिलं तर नंतर तोच मुख्य कार्यक्रम झाला. सर्वांच्या हातावर घडयाळं काढणं.

सागरगोटे खेळताना किती डाव झाले हे




लक्षात ठेवायची मुलींची मजेशीर पद्धत होती. हातात खूप बांगड्या असायच्या. एकेक डाव झाला की मनगटातली एकेक बांगडी त्या वर कोपराकडे सरकवून ठेवायच्या. भातुकलीला भांडीकुडी खेळतोय म्हणायच्या. ही भांडी चिखलाची केलेली असायची.

एकेका हातात डझनभर बांगड्या भरायच्या आणि त्या पिचू नयेत म्हणून त्यांना शिवण घालायची आणि एकत्र बांधून ठेवायच्या हा प्रकार बघायला मिळायचा.

मुली फार मजेमजेशीर गाणी, उखाणे म्हणून दाखवायच्या त्यातलं एक गाणं—

कोंबडा कोकऽऽतो
पैसा मागऽऽतो
पैसा कशाऽऽला
बायको करायला
बायको कशाला
लेकरंबाळं व्हयाला
लेकरं कशाला
खड वेचायला
खडं कशाला
माडी बांधायला
माडी कशाला
पाटील बसायला
पाटील कशाला
कागद लिवायला
कागद कशाला
कोंबडीचा ×× पुसायला

हे गाणं म्हणून सगळ्यांनी हसायचं हा ठरलेला विनोद. मग गाणे म्हणणारी म्हणायची ' हसल त्याचं दात दिसंल मढं बसंल ' ही मुलं मोकळेपणानं बोलायला लागली की काय काय बोलायची ! त्यात नांगरधारी शेतकऱ्याला मत दिलंत तर तुमच्या घरावरून नांगर फिरंल हा मला इशारा असायचा. ' मी मोठेपणी सगळा स्वैपाक करून आपणच खाणार. नवऱ्याला दगड देणार ! आपलं खाऊन आपल्यालाच मारणाऱ्या नवऱ्याला कशाला काय द्यायचं ?' हे मनोगत असायचं.

' तुमी ज्याला हाडफेल झाला म्हनता ना बाई. त्याला आम्ही बाधा झाली म्हणतो.' हे समजावून सांगणं असायचं.

' काही झालं की लगेच डॉक्टरकडे कशाला जायचं ? चार दिवस लोळून–घोळून आपोआप बरं होतं.' हे शिक्षण पण असायचं. आठ वर्षांच्या मुलीचं लग्न होऊन तिला नवऱ्याने सोडलेलं असायचं. ती सांगायची –

' बाई, माझं नशीब चांगलं नाही म्हणून नवऱ्यानं मला सवत आणलीय, आता मी जाणती झाल्यावर मला सवतीवर नांदायला पाठवायचं.'

अशी ही मुलं ! आपल्या मुलांचं बालपण आपण जपतो त्यांना आनंदाचे अनुभव देतो, त्यांना समजून घेतो, त्यांचं भविष्य घडवण्याबाबत जागरूक असतो.

या मुलांचं काय ?

आपण काहीच देणं लागत नाही यांचं ?

झोपडपट्टी म्हटली की आपल्याला त्यातली माणसं दिसतच नाहीत. दिसते फक्त घाण !

यांना स्वच्छता शिकवली पाहिजे असं कुणी म्हटलं की वाटतं आधी माणसं आहेत हे आपण शिकलं पाहिजे, मग त्यांना काही शिकवणं ! ह्या मुलांशी–माणसांशी ओळख वाढवली पाहिजे, बोललं पाहिजे म्हणजे मग भांडी घासणारी मोलकरीण ही फक्त मोलकरीण वाटत नाही तो कुणा बाळू, मीरा, छबू, छायाची आई असते हे लक्षात राहतं. रस्त्यावर भंगार घ्यायला येणारा गाडीवाला परका वाटत नाही. कदाचित ते आपल्या आक्काचे वडील असतील असं मनात येतं.

याबद्दल एक ठरलेला वाद असतो. किती केलं तरी ही माणसं सुधारायची नाहीत. तुम्ही त्यांचं भलं करायला जा ती तुम्हाला फसवून जातील. मान्य आहे. असेही अनुभव येतात; पण तेही आपण मान्य करायला हवेत. एखाद्यानं फसवलं म्हणून ह्या सगळ्या माणसांना कायमचं निकालात काढणं हा शहाणपणा नव्हे. त्यांना अनेक गोष्टी मिळत नाहीत, नाही, नाही त्यांच्या बाबतीत आपण इतकं हिशेबी रहावं ? पैशाचा हिशेब करावा ? नीतिमूल्यं त्यांच्याच माथी मारावीत ? सगळ्यांना झोपडपट्टीत जाऊन काम करणं नाही जमणार. कबूल; पण प्रत्येक कामाच्या इतरही काही सोप्या पायऱ्या असतात. सहज जमणाऱ्या. त्या हळूहळू चढता येतात. गाडगेबाबा म्हणायचे, 'तुमच्या मुलाला चांदीची ताटवाटी करा; पण गरिबाच्या मुलाला एखादी पितळेची तर द्याल ? तुमच्या मुलाला जरीचं अंगडं शिवा; पण गरिबाच्या लेकराला एखादं सुताचं द्याल ?'

एका जरीच्या आंगड्याऐवजी दहा सुताची शिवता येतात, दहा लेकरांना देता येतात, हा हिशेब कधी तरी ध्यानी येईल ?'

आपल्यातलं आणि त्यांच्यातलं अंतर वाढवणाऱ्या असंख्य गोष्टी घडत आहेत. अंतर कमी करणारी एखादी गोष्ट आपण करू शकू ?

□



# काही वेगळी मुलं

मुलं वाढवणं हा आनंदाचा अनुभव कधीकधी दुःखाचं ओझं बरोबर घेऊन येतो. काही आजारानं विकलांग बनलेली मुलं, मनोरुग्ण मुलं, मतिमंद मुलं, मूक-बधिर मुलं अशा मुलांचं पालकपणही जिद्दीनं पेलता येतं.

मुलांमधलं हे वेगळेपण वेळेवर ओळखणं, नशिबाला दोष न देता शास्त्रीय दृष्टीनं त्याकडे पाहणं, शक्य ते सर्व प्रयत्न करणं आवश्यक असतं.

याबद्दल पुढच्या लेखात...

मर्यादित अनुभवविश्वाचीच ही भावपरक कविता चिंतनाच्या डोहातून उमलली असती तर तिला नवे परिमाण लाभले असते.

आजचे कवी

¤

लेखांक तीन
अविनाश सहस्रबुद्धे

¤

# रूप-रस-गंधांची रसरसती शैली

'काळोखकमळ' हा वृंदा लिमये यांचा काव्यसंग्रह. आजच्या समकालीन मराठी कवितेत अनेक कवयित्रींचे काव्यलेखन प्रकाशित होताना दिसत असले तरी लक्षात रहाणारी आश्वासक नावे एकूण कमीच. वृंदा लिमये हे असे एक नाव. 'काळोखकमळ' या त्यांच्या पहिल्यावहिल्या कवितासंग्रहातून त्यांचे अनुभवविश्व, तसेच अभिव्यक्तीचे सामर्थ्य व मर्यादा यांचे दर्शन आपल्याला घडते. वृंदावाईंच्या कवितेला अंतर्मनातील वेदनेचा अनोखा सूर आहे. त्या अर्थाने काव्यसंग्रहाचे नाव 'काळोखकमळ' औचित्यपूर्णच आहे.

केशवसुतांनी व नंतर मर्ढेकरांनी मराठी कवितेत जी परिवर्तने घडवून आणली त्यांचे पडसाद स्त्रियांच्या काव्यलेखनात फारसे उमटलेच नाहीत. स्वातंत्र्यप्राप्तीच्या आधी व नंतरही हेच चित्र आपल्याला दिसते. केशवसुतांनी व मर्ढेकरांनी काव्यक्षेत्रात आणलेली नवी जीवनदृष्टी जाणून नव्या प्रवाहाशी आपल्या कवितेचे नाते प्रस्थापित करण्याचा प्रयत्न इंदिरा संतांसारखा एखाद–दुसरा अपवाद वगळता कवयित्रींनी केलेला दिसत नाही. १९६० च्या आसपास मराठी कवितेत जी स्थित्यंतरे झाली त्यातही कवयित्रींचा सहभाग जवळपास नव्हताच. वृंदा लिमये यांच्या 'काळोखकमळ' संग्रहात समाविष्ट झालेल्या कविता या १९५५ ते १९८० या पंचवीस वर्षाच्या काळातीलच आहेत; परंतु या कवितांचे नातेही १९६० नंतरच्या मराठी कवितेतील स्थित्यंतरांशी, नव्या जाणिवांशी मिळते जुळते नाही. तसेच त्यांच्या कवितेतून त्यांचे वेगळे, स्वतंत्र व्यक्तिमत्त्वही उभे राहिलेले दिसत नाही. स्त्रियांच्या काव्यलेखनातील आजपर्यंतचे पारंपारिक अनुभवविश्वच वृंदा लिमयेंच्या कवितांतून दिसते. मग लिमये यांच्या कवितेचे वेगळेपण कोणते ?

या कवितेचे वेगळेपण असलेच तर ते तिच्या रसरसत्या काव्यशैलीत आहे.

स्त्रियांचे मनोव्यापार व मनोविकार यांचे दर्शन खरे तर स्त्रियांच्या काव्यातून घडायला हवे; परंतु तेच नेमके मराठी कवयित्रींच्या कवितेत दिसत नाही, ही वस्तुस्थिती आहे. वृंदा लिमयेही याला अपवाद नाहीत. प्रेम व निसर्गप्रीती यांच्या हिंदोळ्यांवर झोके घेणारीच ही कविता आहे व हे विषय स्त्रियांच्या काव्यलेखनास नवे नाहीत. किंबहुना या दोन विषयांभोवतीच घुटमळणारी त्यांची आजपर्यंतची कविता आहे. वृंदा लिमये यांची कविता ही त्यांच्या मनाने स्वतःशीच केलेला संवाद आहे व हा संवादच त्यातील अनेक भावछटांसह वाचकांना आपलेसे करतो. जेव्हा जेव्हा त्यांचे मन कंपित होते तेव्हा त्यांच्या मनातील भावनांचे हिरवे कोंब लवलवू लागतात. ते डवलाले कोंब न्याहाळणे मात्र नक्कीच लोभसवाणे असते.

'काळोखकमळ'मधील भावपरक कवितेतून आत्मनिष्ठा, उदासीनता, हुरहूर यांचे दर्शन घडते. या कवितेतील प्रेमानुभव बराचसा सांकेतिकच आहे त्यामुळे तो निःसंकोचपणे त्यातील विविध आंदोलनांसह, उतार-चढावांसह व्यक्त झालेला नाही. तो काही वेळा श्रद्धाविषय होऊन येतो तर काही वेळा विरहाचे दुःख घेऊन येतो. यापलीकडचे कुठलेही भिन्न अनुभव त्यातून पहायला मिळत नाहीत. वृंदा लिमये यांचे मन श्रद्धाळू असल्यामुळेच श्रद्धाविरोधी वैचारिक संघर्षही त्यांच्या कवितेत आढळत नाही.

'बुजल्या या जखमा तरी, 'गुंता', 'मन पारोसे' इत्यादि प्रेमकवितांवर उदासपणाची विषण्णतेची छाया आहे. खरे तर 'आज मन आहे जागे' सारखी एखादी कविता वगळल्यास त्यांच्या सर्वच कवितांवर उदासपणाची विषण्णपणाची ही छाया आहे. याचा प्रत्यय जिला वृंदा लिमयेंची मध्यवर्ती कविता म्हणता येईल, अशा संग्रहातील शेवटच्या 'काळोखकमळ' कवितेत येतो—

एक काळोखकमळ माझ्या आत
पाकळीपाकळीने उमलणारे
त्याचा सूक्ष्म अपार्थिव गंध
सारे कळत-नकळत जाणवणारे
घटिका भरेल, ऋणानुबंध सरेल
काळोखकमळ संपूर्ण फुलेल
माझे मन त्या सुगंधलाटांवर
हलकेच विरघळून गेलेले असेल.

संग्रहातील पहिल्या 'झळझळीत सोनेरी उन्हे' या कवितेतूनही हीच भावना व्यक्त होते. संग्रहाच्या प्रारंभापासून अंतापर्यंत याच व्यथेचा, वेदनेचा प्रवासच जणू कवयित्रीने इथे सूचित केला आहे.

'तुझ्या माझ्यातली', 'तुझ्या असण्याचे सूर', सहवास' या कविता प्रियकराला संबोधूनच लिहिलेल्या आहेत.

'श्रावण' या कवितेत श्रावणऋतु उत्कट प्रीतीचा अनुभव कसा घेऊन येतो याचे वर्णन आहे. अंगात वीज खेळवणारी 'नटरंगी' अशी ही प्रीत आहे. 'सारे जीवन जहाले एक प्रणयाची लाट' असा जीवनानुभव देणारी ही प्रीत आहे. सांकेतिक स्वरूपात जाणवलेला प्रीतीचा हा अनुभव सांकेतिक उपमांच्या



## वृंदा लिमये

मुंबई येथे १४–२–१९३० रोजी जन्म. अर्थशास्त्र विषय घेऊन बी. ए. (ऑनर्स). सत्यकथा, स्त्री, दिपावली, मराठवाडा इत्यादि नियतकालिकांमधून कवितांना प्रसिद्धी. ' जंतरमंतर ', ' लॉलिपॉप ' व ' कमाल आणि धमाल ' या तीन बालकविता–संग्रहांनंतर १९८१ साली ' काळोखकमळ ' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. ' कमाल आणि धमाल ' ला महाराष्ट्र राज्य कवी केशवसुत–पुरस्कार. डब्ल्यू. ई. वुडवर्ड–लिखित पुस्तकाचा ' अशी होती अमेरिका ' हा अनुवाद प्रकाशित. श्रीमती लता मंगेशकरांच्या कलाविषयक कर्तृत्वाचे समालोचन करणाऱ्या ' लता ' या ग्रंथाचे संयुक्त संपादन. त्याशिवाय वृत्तपत्रांतून इंग्रजी ग्रंथांवर परिचयलेख, परीक्षणे इत्यादींना प्रसिद्धी.
श्री. आर. व्ही. जाधव, फिरोज दस्तूर, हिराबाई बडोदेकर व हिरादेवी मिश्र यांच्याकडे रागदारी संगीताचे पद्धतशीर शिक्षण. सवाईगंधर्व संगीतोत्सवसारख्या अनेक संगीतोत्सवांमधून गायन. पत्ता : आशिस, २५३ सायन रोड, सायन पश्चिम, मुंबई ४०००२२.

---

द्वारेच प्रगट होतो. ' वावटळ ' या कवितेत मात्र प्रीतीची ही आवर्तने निसर्गाशी एकरूप होऊनच कशी येतात याचे उत्कट चित्र कवयित्रीने रेखाटले आहे. तुझ्या माझ्यातली या कवितेतही निसर्गाशी झालेली एकरूपताच दिसते.

दाटले आभाळ
बरसल्याविण
पुढे गेला मेघ
कोरडा हुंदका
गिळून मातीत
खोल एक भेग

या ओळींमधून दिसणारे निसर्गाचे रूप कवयित्रीच्या मनातील व्यथेचाच साक्षात्कार घडवते.

कधी ही व्यथाच कवयित्रीला हवीहवीशी वाटते व ती सहजपणे म्हणून जाते की–

नसानसातून वाहणारी अस्वस्थता
हीच तर माझ्या जिवंतपणाची खूण
वेदनांचे त्यावर कधी न फिटणारे ऋण

या वेदनेच्या अस्तित्वातच तिला स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव होते. इथे ' ऋण ' हा शब्द इतक्या नेमकेपणाने व अचूक आला आहे की, त्या वेदनेची कक्षा अधिकच व्यापक झाली आहे.

'गिळून धुक्याचा एक अवंढा' अथवा 'सोसताना कळ त्यातूनच बळ ' सारख्या सुंदर व अत्यंत भावपूर्ण ओळी जरी या प्रेमकवितांमधून आपल्याला भेटत असल्या तरी या प्रेमानुभवाचा एकात्म असा जो परिणाम व्हायला हवा किंवा त्यातून घडविलेल्या भाववृत्तीचा संश्लेषणात्मक प्रत्यय यायला हवा तो येत नाही. याचे कारण हे अनुभव कुठल्याच सूत्राने बांधलेले नसल्यामुळे ते एकेकटे व विस्कळितच रहातात. ही वंचना, हे दुःख जे वाट्याला आले ते का आले ? हे भोगणे, हे सोसणे क्रमप्राप्त आहे का ? असे प्रश्न कवयित्रीच्या मनात उठले असते व त्यांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न तिने केला असता तर ही कविता वेगळी ठरली असती. प्रेमानुभवातील सांकेतिकताही टाळता आली असती.

वृंदा लिमयेंना निसर्ग जवळचा वाटतो कारण त्यांचे संवेदनाविश्व व भाववृत्तीच त्याच्या असंख्य रूपांमधून साकार झाल्याचा प्रत्यय त्यांना येतो म्हणून आणि ज्या वेळेला त्या निसर्गाचे रूप प्रतिमा म्हणून वापरतात त्या वेळीही त्यांचा प्रयत्न त्या निसर्गरूपातून जाणवणाऱ्या संवेदनाविश्व आणि निसर्ग अशा वेळेला एकात्म होतात. उदाहरण म्हणून पुढील ओळी पहाण्यासारख्या आहेत.

संथ निळ्या पाण्याचा डोह
जीव झाला थेंब थेंब
साठविता हृदयात
आभाळाचे प्रतिबिंब
पिंपळाच्या फांदीवर
निळा पक्षी ओठंगून
विसावली आहे एक
फुलपंखी आठवण

निसर्गाचे असे एखादे रूप पाहिले की, कवयित्रीला ' तुला साठवून घेता पटे मला माझी खूण ' असेही वाटून जाते. कधी हा निसर्ग ' या अथांग विस्तारी मुग्ध मीच एकटी ' अशी जाणीवही करून देतो. कधी ' वैराण रुक्ष हा माळ झुरतसे चित्ती ' अशी विषण्ण मनाची जाणीव होते तर एखाद्या आनंदाच्या क्षणी आपल्या मनीचेच स्वप्न झाडाला पडल्याचा भास होतो आणि कवयित्री म्हणून जाते की,

गर्द पोपटी गोजिरवाणे
डहाळीस का स्वप्न पडे

जेव्हा निसर्ग असा कवयित्रीच्या भाववृत्तीशी एकरूप होऊन येतो तेव्हा निसर्ग आणि मानवाचे अतूट नाते त्यातून उभे राहिलेले आपल्याला दिसते. निसर्गाचे चिरंतनत्व व माणसाच्या क्षणभंगुरत्वाची जाणीवही त्यातून व्यक्त झाली असती तर तिला चिंतनाचा स्पर्श लाभला असता व ही कविता एका वेगळ्याच पातळीवर वावरताना दिसली असती. हे मात्र खरे की, निसर्गाचे रूप न्याहाळताना त्यांची कविता त्या निसर्गाशी समरसून जाण्याची ही वृत्तीही आजच्या मराठी कवितेत क्वचितच पहायला मिळते.

बहिर्मुख नजरेने समाजवास्तव न्याहाळणेही या कवयित्रीची वृत्तीच नाही. त्यामुळे जेव्हा त्या काही कवितांमधून आपल्या अवतीभोवतीच्या समाजवास्तवाचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न करतात तेव्हा ते चित्रण अत्यंत ढोबळ व कृत्रिम होते. राजकारणातील, सत्तास्पर्धेतील भ्रष्टाचाराचे चित्र ' पुढारी ', ' नेतृत्व ' व ' सत्ताकारण ' या कवितांमधून त्या दाखवितात परंतु हे चित्रण बटबटीत अभिव्यक्तीचे उदाहरणच ठरते. त्यांचे कवितापण हरवून

उरते ते फक्त रुक्ष निवेदन !

'सगळयाच झाडांच्या फळांवर' या कवितेतून मानवाचे अपुरेपण, त्याच्या मर्यादा यांचा शोध वृंदा लिमये घेताना दिसतात. त्या शेवटी म्हणतात.

'आपल्याच कुवतीप्रमाणे स्वत:पुरते शोधत रहावे उत्तर.

आपल्याच अर्ध्यामुर्ध्या पाकळीतून मिळ–

---

### मन मावळताना

मन मावळताना
निराकार होत जाणाऱ्या
गतस्मृतींच्या सावल्या.
आहे–नाहीच्या सीमारेषेवर
मिणमिणते श्वास नि आभास.
निद्रेहून गाढ, मौनाहून खोल,
काळोखाहून गडद
अशी संज्ञाशून्यता :
हळूहळू पसरत जाणारी,
देहव्यापी,
अस्तित्वाचे प्रवाहीपण गोठविणारी
एक निनावी निर्णायक अनुभूती
अनुभविल्यासह नामशेष होणारी
आणि कालनदीच्या तीरावर
आयुष्यभर पोसलेल्या देहगुणविशिष्ट
अहंतेचे अंतिम विसर्जन.

### तुझ्यामाझ्यातली

तुझ्यामाझ्यातली
दगडावरची
किरंकाळी रेघ
आतल्या आतच
घुसमटलेला
अबोल आवेग
दाटले आभाळ
बरसल्याविण
पुढे गेला मेघ
कोरडा हुंदका
गिळून मातीत
खोल एक भेग.

---

वावे निदान थेंबभर अत्तर.

या ओळींमधून त्यांनी त्यांची काव्यदृष्टीही नकळत स्पष्ट केली आहे.

कवितेविषयीची त्यांची दृष्टी पुढील कडव्यातूनही व्यक्त होते.

अव्यक्त भावना चिरवंचित हृदयाची
उचमळून आली गंगोत्रीच व्यथेची
जे दुःखामधले दिव्य, तयाचा मजला
हा सहज मोकळा आविष्कारच गमला

हीच त्यांची काव्यदृष्टी त्यांच्या कवितेतही सर्वत्र दिसते.

'तसा मृत्यू म्हणजे' व 'संदर्भ' या कवितांमधून कवयित्रीने मृत्यूविषयक जाणीव व्यक्त केली आहे तर 'ती मैफल', 'देणे देवाचे' व 'दरबारी' या तीन कवितांमधून ईश्वराच्या अस्तित्वाबिषयीची जाणीव आहे. 'सर्व सोसण्या सामर्थ्य दे' अशी विनवणीही 'फक्त इतुके' या कवितेत ती करताना दिसते वृंदा लिमये यांचे मन किती श्रद्धाळू आहे याचे प्रत्यंतरच त्यातून येते. 'ही माती' या कवितेतही ईश्वराच्या भव्यदिव्य अस्तित्वाचे वर्णन आहे.

वृंदा लिमये यांचे अनुभवविश्व मर्यादित आहे व तसे ते आहे म्हणूनही फारसे बिघडले नसते परंतु या मर्यादित अनुभवविश्वाचेही सर्वस्पर्शी, चिंतनगर्भ दर्शन त्यांच्या कवितेतून घडत नाही. कारण ही कविता नुसती आत्मनिष्ठच नाही तर आत्ममग्नही आहे. कविता इतकी आत्ममग्न व आत्मतुष्ट का असावी ? असा प्रश्न त्यांची कविता वाचताना पडतो. तिला समाजातील भयाण वास्तवता तर दूरच राहिली, परंतु स्वतःच्या अंतर्विश्वातील सूक्ष्म भावभावनांचे पापुद्रेही का उलगडून दाखवता येत नाहीत ? स्त्रीच्या अंतर्विश्वात व बाह्यविश्वात जी गुंतागुंत, ताण–तणाव निर्माण झाले आहेत त्यांना ही कविता का भिडत नाही ? याचे एकच उत्तर संभवते व ते म्हणजे जीवनविषयक व काव्यविषयक जाणिवेच्या कक्षाच इथे रुंदावलेल्या नाहीत.

वृंदा लिमये यांच्या कवितेतील प्रतिमाविश्वही अतिशय मर्यादित आहे. व ते त्यांच्या स्थायिभावाच्या जाणिवेनेच मर्यादित केले आहे. अशा मर्यादित प्रतिमाक्षेत्राचे उदाहरण द्यायचे तर काळोख या प्रतिमेचे देता येईल. ही प्रतिमा त्यांच्या कवितेत वारंवार येताना दिसते. सुरुवातीला वृंदा लिमये हे नाव आजच्या कवयित्रींमध्ये आश्वासक आहे म्हटले ते याच अर्थाने की त्यांच्या स्थायिभावाचा संवाद ज्या काही विशिष्ट रूप–रस गंधांशीच होऊ शकतो तो मात्र नक्कीच आकर्षक व सुंदर आहे. वृंदाबाईंची काव्य शैलीही रसरसती व या रूप–रस–गंधांचे सौंदर्य वाचकांपर्यंत सरळ घेऊन जाणारी आहे. मर्यादित अनुभवविश्वाचीच ही भावपरक कविता चिंतनाच्या डोहातून उमलली असती तर तिला एक नवे परिमाण लाभले असते. वृंदाबाईंच्या भविष्यातील काव्यप्रवासात कुणी सांगावे हे घडेलही, □

---

## पुस्तके

### महाराष्ट्राच्या कालमुद्रा

**श्री.** म. वि. सोवनी हे पुण्यातील एक छांदिष्ट चित्रकला शिक्षक. शाळेतील फळ्याचा त्यांनी दोन प्रकारे उपयोग केला. आखलेल्या अभ्यासक्रमानुसार शिकविणे आणि त्यातील विषयांना पूरक असणारे नवे ज्ञान छात्रांच्या पदरी टाकणे. किमान अठ्ठावीस वर्षे फलकलेखनावर काही ना काही नव्या माहितीचा तपशील देण्याचा त्यांनी छंद चालू ठेवला आणि या छंदातूनच 'महाराष्ट्राच्या कालमुद्रा' हा त्यांचा संदर्भग्रंथ तयार झाला.

'महाराष्ट्राच्या समाजजीवनावर परिणाम करणाऱ्या' महत्त्वाच्या घटनांची त्यांनी या ग्रंथात तपशीलवार नोंद केली आहे. इंग्रजी कालगणनेनुसार दर महिन्यात कोणकोणत्या महत्त्वाच्या घटना घडल्या त्यांचा मागचा–पुढचा तपशील देऊन त्यांनी सामान्यतः पाना–दीड पानात प्रत्येक घटना वर्णिली

आहे. ती वर्णन करताना अनेकदा त्यांनी मतप्रदर्शनही केले आहे. दर महिन्यातील घटनांची संख्या पुरेसे नियोजन न केल्यामुळे अर्थात विषम आहे.

या ग्रंथाच्या शेवटी 'कालक्रमानुसारी सूची' आणि वर्णनुक्रमी सूची' अशा दोन सूची दिल्यामुळे जिज्ञासूंची मोठी सोय झालेली आहे व त्यामुळे ग्रंथकाराच्या भूमिकेशी ग्रंथातील शेकडो घटना कितपत संवादी–विसंवादी आहेत हेही ताडून पाहता येते. प्रस्तुत ग्रंथाची मूळ प्रेरणा डॉ. प्र. न. जोशी यांच्या 'दिनविशेष' या ग्रंथाची आहे. त्यातला अपुरेपणा श्री. सोहनींना जाणवला व त्यांनी आपला ग्रंथ शेकडो घटनांच्या वर्णनात्मक नोंदींनी संकलित करून तो सामान्य वाचकांपुढे ठेवला. शिक्षक आणि विद्यार्थीवर्गास त्यांचा हा ग्रंथ बहुश्रुत होण्याच्या दृष्टीने उपयुक्त होईल यात शंका नाही.

तथापि शास्त्रीय दृष्टीचे जे अभ्यासू वाचक आहेत त्यांना हा ग्रंथ विस्कळित, भाऊगर्दीचा, सर्वांना संतुष्ट ठेवावे म्हणून लिहिलेला आणि घाईने प्रकाशित केलेला वाटेल. कै. प्रा. नरहर कुरुंदकर यांनी ग्रंथाला प्रस्तावना लिहिण्याचे मान्य केले होते. तशी प्रस्तावना त्यांनी खरोखरीच लिहिली असती तर श्री. सोहनी यांची बहुधा निराशा झाली असती.

पहिला प्रश्न असा येतो की, श्री. सोहनी यांना कोणता महाराष्ट्र अभिप्रेत आहे? प्राचीन, मध्ययुगीन, अर्वाचीन की अगदी अलीकडचा संयुक्त महाराष्ट्र? कालमुद्रेविषयी त्यांच्या कल्पना तरी काय आहेत? 'दिनांकांच्या नोंदीं'ऐवजी 'घटनांच्या नोंदीं'वर भर देण्याची प्रवृत्ती आहे. तिची काटेकोर अंमलबजावणी ते करू शकले आहेत का? 'महाराष्ट्राच्या क्षेत्रमर्यादेतल्या आणि त्याही समाजजीवनावर परिणाम करणाऱ्या' घटनांच्या नोंदी या ग्रंथात एकुणात किती? या साऱ्या प्रश्नांच्या उत्तरावर या ग्रंथाचा ज्ञानात्मक दर्जा तपासून पाहिला असता निराशा पदरी येते. माहिती आणि ज्ञान (Information and knowledge) यातला फरक सोहनी यांनी जाणून घेऊन ग्रंथाची उभारणी केली असती तर या ग्रंथाला बांधेसूद आकार येऊन ज्ञानकोशात्मक वजन प्राप्त झाले असते; पण असे दुर्दैवाने झाले नाही व परीक्षेच्या गाईडसारखे स्वरूप त्याला आले आहे. तपशिलाने या ग्रंथाची चिकित्सा पुष्कळ करता येईल. डॉ. प्र. नंच्या ग्रंथात निदान काहीएक सांस्कृतिक सूत्र आहे; पण सोहनींच्या डेमी ६६७ पृष्ठात अस्ताव्यस्त (आणि स्वस्तसुद्धा) सोयिस्कर माहिती खच्चून भरली आहे.

मोजकी उदाहरणे देतो–सोळाव्या शतकापर्यंतच्या ११, शिवकालीन सतराव्यामधील २१, पेशवाईच्या अठराव्यामधील ३९, गेल्या एकोणिसाव्यातील १०९ आणि चालू विसाव्या शतकातील सुमारे ३०० अशा महाराष्ट्रव्यापी दोन हजार वर्षांतील घटनांची नोंद या ग्रंथात आहे. याचा अर्थ सुलभपणे जी साधने हाती लागली व जेणेकरून बहुतजण राजी राखले जातील अशा घटनांनी ग्रंथाची बहुतांश पृष्ठे व्यापली आहेत. त्यामुळे सतराव्या शतकापर्यंतच्या महाराष्ट्रेतिहासाला गौणत्व येत नाही काय? पण महाराष्ट्राच्या समाजजीवनावर खरोखरी परिणाम करणाऱ्या घटना या ग्रंथात किती? जेमतेम शंभर! तसेच हैद्राबाद सत्याग्रह, नामांतराची चळवळ किंवा दत्ता सामंतांचा गिरणीकामगारसंप या अलीकडच्या घटना महत्त्वाच्या नाहीत काय? सारांश, एकूण संकलन सर्व जातीजमाती, धर्मपंथ, राजकीय पक्ष इत्यादींच्या समाराधनार्थ झालेले दिसते. 'कालमुद्रा' या संज्ञेला पात्र होतील अशा ज्या घटना प्रस्तुत ग्रंथात नोंदवल्या आहेत त्यांच्या परिणामांसह साधकबाधक विवेचनासह त्या नोंदवायला हव्या होत्या. बरे, निर्लेपपणे संकलित माहितीपर नोंदींची अपेक्षा करावी तर अनेक नोंदीत लेखक आपली मते चातुर्याने नोंदवितो. एका मोठ्या ओंडक्याच्या अनेक धलप्या काढण्याचा प्रकार या ग्रंथात विपुलतेने आढळतो. त्यामुळे मर्यादित महत्त्व असलेल्या घटनांची खिचडी फार झाली आहे.

श्री. सोहनी यांनी तळमळपूर्वक परिश्रम केले आहेत व आहे त्या स्वरूपात त्यांच्या ग्रंथाची छात्रोपयोगी उपयुक्तता आहे यात वाद नाही. तथापि ज्ञानकोशकार केतकर, विज्ञानबोधकार माटे अशा ज्येष्ठांना नमन करून ग्रंथाची उभारणी करताना, त्यांनी ज्ञानोपासकाची गंभीर भूमिका धारण करायला हवी होती. निदान ग्रंथाचे हस्तलिखित त्यांनी आधी वाईकर विद्वानास किंवा पुण्याच्या शनिवारपेठेतील शास्त्रीबुवांना दाखवायला हवे होते. शेकडो संकलित घटनांच्या वर्णनात्मक नोंदीला त्यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण इतिहासाची वाटचाल दाखवणारी एखादी स्थूल प्रस्तावना दिली असती तर ते युक्त झाले असते. ग्रंथाच्या नावाला शोभेल असे संकलन श्री. सोहनी करते तर त्यांच्या ग्रंथाला लोकप्रियतेबरोबर विद्वन्मान्यताही लाभली असती! असो. त्यांच्या हौसेला नि परिश्रमाला अर्थातच मुजरा करावासा वाटतो.

–म. श्री. दीक्षित

महाराष्ट्राच्या कालमुद्रा
संपादक – लेखक म. वि. सोवनी
नितीन प्रकाशन, पुणे ३०
मूल्य – ८५ रुपये.

---

मांडणी, विचार व देखणेपणा या साऱ्यातच 'उत्तम' असे म्हणता येईल असे हे पुस्तक आहे.

–प्र. बा. भोसले
संपादक, बळीराजा मासिक

# योद्धा शेतकरी

ले. विजय परुळकर
राजहंस प्रकाशन, पुणे ३०
मूल्य : ३६ रुपये

---

भारत–पाकिस्तान क्रिकेट मालिका

# भारत जिंकेल ! पावसाची कृपा हवी

अभय गोखले

पाकिस्तान–भारत यांच्या दरम्यान सध्या चालू असलेल्या तीन कसोटींच्या मालिकेत पहिली कसोटी अनिर्णित म्हणून इतिहासजमा झालेली आहे. पर्जन्यराजाच्या अवकृपेने सामन्याचा अर्धा वेळ फुकट गेल्याने सामन्यातील इंटरेस्टच नाहीसा झाला होता. भारतातर्फे बिन्नीच्या ८३ धावा व मदनची त्याला दमदार साथ (१५५ धावांची भागीदारी) आणि पाकिस्तानच्या ताहिर नकाशने मिळवलेले ७७ धावातील ५ बळी ही काही वैशिष्ट्ये सोडली तर जावेद मियाँदादच्या हुकलेल्या दमदार शतकाचा (९९ धावा) अपवाद वगळता या सामन्यामध्ये सांगण्यासारखे व लक्षात ठेवण्यासारखे काही घडलेच नाही. पाकिस्तानच्या कमकुवत गोलंदाजांसमोर मजबूत भारतीय फलंदाजी तीनशेच्या आत कोसळली हेही एक वैशिष्ट्यच ! अर्थात सप्टेंबरमध्ये भर पावसाळ्यात भारतात सामने आयोजित करणे हा एक हास्यास्पद प्रकार आहे; पण त्यामुळे क्रिकेटर्संना भरपूर पैसा मिळत असेल आणि पाकिस्तानमधील भारताच्या दारुण पराभवाचा बदला घेण्याची घाई झालेली असेल तर त्याला क्रिकेटशौकीनांचा नाइलाज आहे. क्रिकेटर्संनाही मिळणारा मोबदला त्यांच्या यशापयशावर अवलंबून नसल्याने त्यांनी मन लावून खेळ करण्याची आवश्यकताच काय ? आणि त्यांच्याकडून आपण तशी अपेक्षा करणे मूर्खपणाचे नव्हे का ? धंदेवाईकपणाचे हे सर्व दुर्गुण आज क्रिकेटला ग्रासत आहेत त्याला आपण काय करणार ?

इम्रान, सर्फराज, कादर यांच्याशिवाय भारतात येणाऱ्या पाकिस्तानी संघाचा दर्जा कसा आहे ? या तिघांनी मागे भारताविरुद्ध जवळजवळ सर्वांच्या सर्व विकेटस् स्वस्तात मिळवल्या होत्या. इम्रान न सर्फराज यांनी भारतीय फलंदाजांची झोप उडवली होती. भारतीय फलंदाजीची आघाडीची फळी इम्रान एखाद्या निर्दय खाटिकाप्रमाण सहजगत्या कापत होता. कपिलशिवाय भारतीय संघाची कल्पना करता येईल का ? पाकिस्तानी संघाने मध्यमगती गोलंदाज बरोबर आणलेत त्यातील ताहिर नकाश हाच बऱ्यापैकी गोलंदाज आहे. हाफीज प्रयत्नवादी असेलही; परंतु त्याचे टप्प्यावर नियंत्रण नाही. जलालउद्दीन तर इंग्लिश काउंटीजमधील वलवकडूनही खेळण्याच्या योग्यतेचा नाही. मात्र अशा ह्या दुर्बळ माऱ्याने विश्वविख्यात (?) भारतीय फलंदाजांना तीनशेच्या आत गुंडाळले याबद्दल पाकिस्तानी गोलंदाजांचे कौतुक करावे की भारतीय फलंदाजांच्या बेजबाबदार फटकेबाजीबद्दल मान खाली घालावी हेच समजनासे झालंय आणि झहीर अब्बासने त्यांच्या संघातील सध्याच्या उत्कृष्ट गोलंदाजाला, इकबाल कासीमला कमी गोलंदाजी का दिली हेही एक कोडेच आहे. त्यामानाने गुणवान मुदस्सरवर त्याने इम्रानपेक्षा जास्त विश्वास टाकला व सुरुवातीचे फलंदाज झटपट बाद करून मुदस्सरने तो विश्वास सार्थ केला. संदीप पाटील, कपिल, वेंकट यांचे फटके कसोटीदर्जाच्या फलंदाजाच्या योग्यतेचे होते का हा अभ्यासाचा विषय होऊ शकेल आणि पाकिस्तानला भारतात हरवण्याची घाई झालेल्या भारतीय संघाला पाकिस्तानी फलंदाजी त्यांच्यापेक्षा मजबूत आहे ही वस्तुस्थिती मान्य आहे का? मोहसिन, मुदस्सर, अब्बास, मियाँदाद यांच्यामुळे पाकिस्तानी फलंदाजी नक्कीच मजबूत आहे रवि शास्त्री, संधू, श्रीकांत, वेंगसरकर यांना वगळून निवडसमितीने कोणावर सूड उगवलाय ? धड एक चेंडूही खेळू न शकणारा, जगातील सर्वांत वाईट क्षेत्ररक्षक असलेला व गोलंदाजीतील भेदकता नष्ट झालेला दोशी हा वेस्टइंडीज, पाकिस्तानमध्ये शतक मारणाऱ्या व वेस्टइंडीजच्या फलंदाजांना सतावणाऱ्या रवि शास्त्रीपेक्षा निवडसमितीला चांगला वाटतो हे अजब तर्कशास्त्र आहे ! शिवलाल यादव, रघुराम भट्ट यांच्यासारखे (मनिंदर व शिवरामकृष्णनही त्यात आलेच) तरुण होतकरू गोलंदाज उपलब्ध असताना वेंकटसारख्या म्हाताऱ्या व गोलंदाजीतील जादू निघून गेलेल्या स्पीनरला निवडणे हीही एक थट्टाच म्हणावयास हवी. वयोमानामुळे वेंकट हल्ली क्षेत्ररक्षण व फलंदाजीही चांगली करत नाही. मला वाटते की, वेंकट व दोशी यांना टेस्टमागे मिळणाऱ्या दहा हजार रुपयांचा फायदा मिळवून देण्यासाठी बहुधा संघात निवडले असावे. तेव्हा त्यांची ही शेवटची बेनेफिट मॅच व्हावी एवढीच आशा करणे आपल्या हातात आहे. मुळात गायकवाड, दोशी, वेंकट राघवन यांना आपली निवड झाल्याचा धक्का बसावा एवढी ही निवडसमितीची अनपेक्षित निवड होती ! गायकवाडच्याऐवजी रवि शास्त्रीला आघाडीत खेळवलं असतं तर शास्त्रीनं गायकवाड व दोशी किंवा वेंकट या म्हाताऱ्यांचीही कामगिरी केली असती व गायकवाड आणि दोशी, वेंकट यांच्यापैकी दोघांना वगळून श्रीकांत, वेंगसरकर, संधू यांच्यापैकी एकाची वर्णी लावता आली असती.

## बाजू भक्कम कोणाची ?

पर्जन्यराजाची कृपा नसेल तर ह्या मालिकेतील कोणत्याही सामन्याचा निकाल लागणार नाही हे कटुसत्य आहे आणि इम्रान, सर्फराज, कादर हे पाकिस्तानचे आघाडीचे गोलंदाज असले तरी त्यांची अनुपस्थिती नकाश, हाफीज, मुदस्सर यांनी निदान पहिल्या कसोटी सामन्यात तरी जाणवू दिली नाही. अर्थात हीच परिस्थिती उरलेल्या दोन कसोटीत कायम राहील असा निष्कर्ष काढता येणार नाही. मात्र मोहसिन, मुदस्सर, अब्बास, मियाँदाद, राजा यांची कसोटी कारकीर्द पाहिली तरी ते गायकवाड, पाटील, यशपाल, मोहिंदर, गावस्कर यांच्या तोडीचे किंवा काकणभर सरस वाटतात. तांत्रिकदृष्ट्या दोन्ही संघात मियाँदाद सरस वाटतो. मागे पाकिस्तानमधील तिसऱ्या कसोटीत जावेदच्या २८० धावा झाल्यावर आपा-

पसातील वैमनस्याने जर इम्रानने डाव सोडला नसता तर जावेद त्या वेळेस ज्या पद्धतीने खेळत होता ते पाहून त्याने सोबर्सचा बरेच वर्षे अबाधित असलेला सर्वोच्च धावांचा (३६५ धावा, नाबाद) विक्रम भारताविरुद्ध नक्कीच मोडला असता याबद्दल अजूनही मला शंका वाटत नाही. ५२ कसोटीत ३९९२ धावा (त्याने नुकत्याच चार हजार धावा पूर्ण केल्या.) ५७.८५ च्या उत्कृष्ट सरासरीने काढणाऱ्या जावेदचा क्रमांक सरासरीच्या बाबतीत गावस्करच्या वर आणि रीचर्डस्‌च्या किंचित खाली लागतो. शिवाय त्याने दोन द्विशतकांसह दहा शतके आणि २१ अर्धशतके मारली आहेतच आणि चपळ क्षेत्ररक्षणाच्याबाबतीत (४८ झेल) तो यशपाल व श्रीकांतपेक्षाही सरस आहे.आघाडीचा फलंदाज मोहसीन हाही एक गुणी खेळाडू. २२ कसोटीत १५१६ धावा ४८.९० च्या चांगल्या सरासरीने काढणाऱ्या मोहसीनने एका द्विशतकासकासह चार शतके व ५ अर्धशतके ठोकली आहेत. फलंदाजीच्या सरासरीत तो मोहिंदर, यशपाल, पाटील, वेंगसरकर यांच्यापेक्षा बराच वर आहे. मुख्य म्हणजे अब्बासप्रमाणे तोही इंग्लिश खेळपट्ट्यांवर नेहमी यशस्वी झाला आहे. कंटाळवाण्या खेळामुळे प्रसिद्ध असलेल्या मुदस्सरने यापूर्वी खेळवल्या गेलेल्या भारत–पाकिस्तान मालिकेत हात धुऊन घेतले व ४ शतकांसह (त्यातील एक द्विशतक) त्याने सातशेच्यावर धावा जमवल्या व आपले करियर अॅव्हरेज सुधारले. ३५ कसोटीत २१३८ धावा काढणाऱ्या मुदस्सरची सरासरी आहे ४३.६३ तर त्याने सहा शतके ठोकली असून त्यातील पाच तर भारताविरुद्धच आहेत. भारतात सतत अपयशी ठरलेला व पाकिस्तानात शतकांवर शतके ठोकून भारतीय गोलंदाजांचा कर्दनकाळ बनलेला झहीर अब्बास हा एक उत्कृष्ट फटकेबाज फलंदाज आहे. इंग्लंडमध्ये त्याने दोन द्विशतके ठोकली व प्रथम दर्जाच्या सामन्यात शतकांचे शतक पुरे केलेय यापेक्षा त्याचे मोठेपण सांगण्याकरिता निराळे दाखले नकोत. मात्र तंत्राच्या बाबतीत त्याचा नंबर गावस्कर, मियाँदाद, मोहिंदर यांच्या खालोच लागेल. ५८ कसोटीत ४०७३ धावा काढणाऱ्या झहीरची सरासरी आहे ४६.८१. त्याने पाच द्विशतकांसह अकरा शतके व १४ अर्धशतके ठोकली आहेत. अर्थात झहीरची ही ४५ वरील सरासरी दिसते ती भारतीय व इंग्लीश गोलंदाजांच्या कृपेनेच. वेस्टइंडीजच्या समोर व ऑस्ट्रेलियाच्या लिली व थॉमसनसमोर झहीरची कामगिरी नेहमीच वाईट झालेली आहे. पाकिस्तानी संघात नेहमी आत बाहेर करणाऱ्या डावखुऱ्या वासीमराजाने ४५ कसोटीत २३२१ धावा ३७.४३ च्या सरासरीने काढल्या आहेत.

गोलंदाजीत, नकाश २३ बळी ३९.५६च्या सरासरीने (४० धावात ५ बळी सर्वोत्तम कामगिरी), मुदस्सर, ८३९ धावांत ५ बळी ३३.५६ च्या सरासरीने (३२ धावांत ६ बळी सर्वोत्तम कामगिरी) इक्बाल कासीम ११५ बळी २९.७९ च्या सरासरीने (४९ धावांत ७ बळी सर्वोत्तम कामगिरी) यांचा अपवाद वगळता जलालुद्दीन, नझीर यांचा गंभीर विचार करण्याचे कारण नाही.

## फलंदाजांवर जबाबदारी

भारतीय फलंदाजीच्या बाबतीत गावस्करने ९० कसोटीत ७६२५ धावा ५५.२२ च्या सरासरीने काढल्या आहेत त्या २७ शतकांसह. त्यात तीन द्विशतके आहेत. शिवाय त्याने ३३ अर्धशतके मारली आहेत. कागदावर तरी तो सर्वोत्कृष्ट वाटत आहे. जरी सध्या तो विशेष फॉर्ममध्ये नसला तरी एखादे शतक मारून तो ब्रॅडमनच्या २९ शतकांच्या विक्रमा जवळ पोचला तर आश्चर्य वाटायला नको. पाकिस्तानच्या दुबळ्या गोलंदाजीचा फायदा गावस्करने उठवावयास हवा. गेल्या दोन मालिकांत विशेष फॉर्ममध्ये आलेल्या व जगात वेगवान गोलंदाजीविरुद्ध उत्कृष्ट फलंदाज मानल्या जाणाऱ्या मोहिंदर अमरनाथने ३७ कसोटीत २६४८ धावा ४४.८८ च्या सरासरीने काढल्या आहेत त्या सात शतकांसह त्यातील पाच तर त्याने मागे खेळल्या गेलेल्या पाकिस्तान–वेस्टइंडीजच्या दौऱ्यावरच काढली आहेत. मुदस्सरप्रमाणे मोहिंदरनेही आपली सरासरी या दौऱ्यातच सुधारली. मोहिंदरने शिवाय १६ अर्धशतकेही मारली आहेत. पूर्वी तिसऱ्या क्रमांकावर खेळणाऱ्या दिलीप वेंगसरकरने ६३ कसोटीत ३४८४ धावा ३७.४६ च्या सरासरीने काढल्यात. त्यात त्याची ६ शतके व वीस अर्धशतके आहेत. गावस्करच्या खालोखाल तांत्रिकदृष्टया उत्कृष्ट समजला जाणारा वेंगसरकर सतत अपयशी झाल्याने त्याला पहिल्या कसोटीत बसवण्यात आले. जबरदस्त फटकेबाजीबद्दल प्रसिद्ध असलेल्या व लिली, विलीस यांना फोडून काढणाऱ्या संदीप पाटीलने २० कसोटीत १२५५ धावा काढल्यात त्या ४३.२७ च्या सरासरीने तीन शतके व सात अर्धशतकांसह. डिफेन्सिव्ह खेळ करणाऱ्या यशपालने ३३ कसोटीत १५५० धावा ३६.९० च्या सरासरीने केल्यात. त्यात २ शतके व ९ अर्धशतके आहेत. अष्टपैलू कर्णधार कपिलदेवने ५० कसोटीत २२५३ धावा काढल्या आहेत त्या३२.६५ च्या सरासरीने. त्यात त्याची तीन शतके व १२ अर्धशतके आहेत. म्हणजे पाकिस्तानी फलंदाजांच्या तुलनेत (सरासरीच्या बाबतीत) जरी भारतीय फलंदाज कमकुवत वाटत असले तरी पाकिस्तानी फलंदाज परदेशात खेळत आहेत हे लक्षात घेतले पाहिजे.

मात्र इम्रानखान (२३२ बळी) सर्फराज नवाझ (दिडशे बळी) यांच्या अनुपस्थितीत भारतीय गोलंदाजी मजबूत वाटते. कपिलदेव २११ बळी २९.५२ च्या सरासरीने, डावात ५ बळी १६ वेळा (पहिल्या कसोटीतील ६८ धावातील ५ बळी धरून) व सामन्यात दहा बळी एकदा घेणाऱ्या कपिलची सर्वोत्कृष्ट कामगिरी पाकविरुद्ध ८५ धावांत ८ बळी अशी आहे. धावरीनंतर कपिलला योग्य साथ देणाऱ्या मदनलालने ६४ बळी घेतलेत ते ३६.९५ च्या महागडया सरासरीने. मात्र पूर्वीपेक्षा मदनने आता स्विंग व टप्प्यावर बरेच नियंत्रण मिळवले आहे. पहिल्या कसोटीत मोहसीन, अब्बास, मियाँदाद या चांगल्या विकेटस् मदननेच घेतल्या. वेंकट १५५ बळी ३५.६७ च्या सरासरीने व दोशी ११३ बळी ३०.५३ च्या सरासरीने. ही या दोघा म्हाताऱ्यांची सरासरी बरी वाटत असली तरी आता त्यांच्यात पूर्वीचा जोश उरलेला नाही. मोहिंदर, बिन्नी, पाटील यांनी कसोटीत काही बळी मिळवले असले तरी त्यांची गोलंदाजीतील भूमिका मदतनिसाचीच आहे. तेव्हा वेंकट व दोशीच्याऐवजी शास्त्री व संधू यांना घेतल्यास फलंदाजी बळकट होईलच शिवाय या दोन होतकरूंना गोलंदाजीतील आपले कसब दाखविण्याची संधी मिळेल.

पावसाची कृपा नसेल तर सामना निकाली होणार नाहीच. शिवाय पाकिस्तानची मजबूत

फलंदाजी दोनदा गुंडाळण्याची (झटपट) किमया भारतीय गोलंदाजांना करावी लागेल पाकिस्तानच्या कमकुमत गोलंदाजीचा फायदा उठवून भारतीय फलंदाजांनी भराभर मोठी धावसंख्या उभारली तर पाकिस्तानचे फलंदाज आपल्या मोठ्या धावसंख्येच्या दडपणाखाली वाकतील व त्यांना लवकर बाद करणे आपल्या गोलंदाजांना शक्य होईल. तेव्हा पाकविरुद्ध विजय मिळवायचा असेल तर महत्त्वाची कामगिरी भारतीय फलंदाजांना करावयाची आहे. गोलंदाजांना नव्हे. त्याकरिता गावस्कर, मोहिंदर, पाटील, यशपाल यांनी शर्थीचे प्रयत्न करावयास हवेत. म्हणजे कपिल आणि मदन कंपनीचे काम सोपे होईल. □

## काळिमा फासणारी घटना !

अखेर गावस्करने आपले २८ वे शतक लावले. मात्र हे शतक फडकवताना जो नाट्यपूर्ण प्रसंग घडला तो मात्र नुसताच निषेधार्ह नव्हता तर क्रिकेटच्या इतिहासाला काळिमा फासणारा होता ! ऑस्ट्रेलियातील लिली–मियांदाद लाथालाथी, न्यूझिलंडमधील वेस्टइंडीजच्या क्रॉफ्टने स्टंप रागाने लाथेने उडवण्याचा प्रकार किंवा स्नोने गावस्करला धक्का मारून खाली पाडण्याचा प्रकार या सर्वांवर वरताण करणारा प्रकार बंगलोर कसोटीत पाकिस्तानी संघाने केला. शेवटच्या दिवशी पाकिस्तानचा डाव लवकर संपल्याने गावस्करला आपले २८ वे शतक झळकवण्याची चांगली संधी चालून आली व त्याचा पुरेपूर फायदा त्याने उठवलाही; परंतु काही नाट्यपूर्ण प्रकार घडल्यावरच !

सुरुवातीला गावस्कर ज्या तऱ्हेने हळू खेळत होता त्यावरून तो शतक मारू शकणार नाही असेच वाटत होते. मात्र त्याच्या पन्नास धावा झाल्यावर त्याने भराभर खेळावयास सुरुवात केली. त्याच्या ८६ धावा झाल्या असताना व अनिवार्य षटकांपैकी ४ षटके शिल्लक असताना अचानक पाकिस्तान संघ पॅव्हेलियनमध्ये पळून गेला. शेवटच्या तासात जी वीस अनिवार्य षटके टाकली जातात त्यासंबंधी आय. सी. सी.चा असा नियम आहे की, दोन्ही प्रतिस्पर्धी कर्णधारांना खेळात काही इंटरेस्ट उरला नाही असे वाटले व त्यांनी तडजोड केली तर खेळ थांबवता येतो. मात्र अशी तडजोड कपिल व अब्बास यांच्यात झालेली नव्हती. त्यामुळे आय. सी. सी.चा नियम धाब्यावर बसवून पाकिस्तान संघ पॅव्हेलियनमध्ये परतला तेव्हा आय. सी. सी.ने त्यांना समज द्यायला हवी होती. मागे पाकिस्तानमध्ये शेवटच्या वीस षटकात, मोहिंदर अमरनाथ शतकाजवळ आला असताना पाकिस्तान संघाने सामना पुढे चालू ठेवायच्या बाबतीत अशीच खळबळ केली होती; परंतु प्रकरण इतके ताणले गेले नव्हते. पाकिस्तान संघ पॅव्हेलियनमध्ये गेल्यावर मग गावस्कर व गायकवाड यांनी काही झाले तरी विकेटवरून हलायचे नाही असा ठाम निर्णय घेतला व आपल्या मराठमोळ्या धीरोदात्त वृत्तीचे दर्शन घडवले आणि पाकिस्तान संघाचा हा सर्व फार्स कशामाठी होता तर गावस्करला शतक मारता येऊ नये या उद्देशानेच ! भारताने वर्ल्डकप जिंकल्यावर वर्ल्डकप आशियात आला असे म्हणून भारताच्या विजयाचे श्रेय लाटायचे आणि डॉन ब्रॅडमनचा कित्येक वर्षे अबाधित असलेला २९ शतकांचा जागतिक विक्रम मोडू पहाणाऱ्या आशियायी गावस्करच्या मार्गात मात्र अडथळे आणायचे हा झाला पाकिस्तानचा धोरणातला विरोधाभास. दोन्ही अंपायरही खमके होते. तेही गावस्कर व गायकवाडला सोबत करण्यासाठी विकेटवर पाय रोवन उभे होते. नंतर पाकिस्तान संघ व कर्णधार झहीर अब्बास यांना समजावण्याचा अनेकांनी प्रयत्न केला. स्वतः कपिलदेव पाकिस्तान्यांच्या खिलाडूवृत्तीने भयंकर चिडलेला दिसला. त्याने गावस्करला विकेटवर येऊन सांगितले की, काही झाले तरी विकेट सोडू नको ! कोणत्याही परिस्थितीत त्यांना मैदानात उतरवतोच ! या सर्व प्रकारात बंगलोरचे प्रेक्षक कमालीच्या संयमाने व शांततेने वागले. हाच प्रकार मुंबई किंवा कलकत्त्यास घडता तर प्रेक्षकांनी काय अनर्थ व दंगल घडवली असती याची कल्पनाही करवत नाही आणि मोठ्या मिनतवारीने शेवटी पाकिस्तानचा संघ मैदानात उतरला. बहुधा संभाव्य परिणामांची कल्पना त्यांना आली असावी. झहीर अब्बासच्या खिलाडूवृत्तीबद्दल त्याचा उदोउदो केला जातो; परंतु शेवटी त्याने आपले दात दाखवलेच ! पाकिस्तानचा कोणताही खेळाडू हा खिलाडूवृत्तीचा असू शकत नाही याचा प्रत्यय मागे इम्रान, मुश्ताक, सर्फराज, मियांदाद, माजिदखान यांनी आणून दिला होताच. फक्त आसिफ इक्बालचा सन्माननीय अपवाद. मग उरलेल्या षटकात गावस्करने शतक मारून सर्वांच्या अपेक्षा पूर्ण केल्या. झाला हा प्रकार अत्यंत लज्जास्पद होता हे पाकिस्तानी खेळाडूंच्या चेहऱ्यांवरून स्पष्टच दिसत होते. काही पाकिस्तानी खेळाडूंनी गावस्करजवळ व्यक्तिशः दिलगिरीही व्यक्त केली.

आणि आता गावस्करच्या शतकाविषयी थोडेसे. या संपूर्ण डावात गावस्कर स्वतःकरिता खेळताना वाटत होता. संघाशी आपले कोणतेच देणे–घेणे नाही अशा थाटात तो खेळत होता. नेहमी गावस्कर सावकाश खेळतो त्यामुळे बऱ्याच मॅचेस भारताला गमवाव्या लागल्या किंवा अनिर्णित राहिल्या. शेवटच्या दिवशी गावस्कर सुरुवातीला नेहमीप्रमाणे संथच खेळत होता. मात्र आता शतक आपल्या आवाक्यात आहे याची कल्पना आल्यावर त्याने जो वेगवान खेळ केला तसा खेळ कित्येक दिवसांत बघावयास मिळाला नाही. असा वेगवान खेळ त्याने नेहमीच केला तर भारतीय संघ अजिंक्य होईल; परंतु असा खेळ शतकाकरिता नव्हे तर संघाकरिता करण्यास गावस्कर तयार आहे का ? गायकवाड बिचारा निःस्वार्थीपणे जिवाचे रान करून गावस्करला मदत करत होता. २८ व्या शतकाबद्दल गावस्करचे त्रिवार अभिनंदन ! उत्तरेकडील पत्रकार गावस्करवर आकसाने टीका करतात, मी त्यांच्या टीकेला फारशी किंमत देत नाही. रुसी मोदी व इतर गावस्करविरोधी पत्रकारांना गावस्करने शतक मारल्याने वाईट वाटले असेल; परंतु आता गावस्करवर, तो स्वार्थी खेळी खेळला अशी टीका ते नक्की करणार. गावस्करने तशी संधी त्यांना देता कामा नये. □

# सागर तळावरील संपत्तीचे खजिने

डॉ. सुभाषचंद्र सारंग

भारताच्या 'गवेषणी' या सागरसंशोधक जहाजाने इ. स. १९८१ च्या प्रजासत्ताकदिनी सहा दिवसांच्या अखंड प्रयत्नानंतर हिंदी महासागरामधील ३.६ कि. मी. खोल सागरतळावरील धातूंच्या गोटयांचा नमुना मिळविण्यात यश प्राप्त केले. त्याबरोबरच सागरतळावरील मौल्यवान खजिना हस्तगत करण्याचा प्रयत्न करणाऱ्या मोजक्या राष्ट्रांच्या मालिकेत भारताला स्थान मिळाले. शतकापूर्वी सागरसंशोधन मोहिमेसाठी बाहेर पडलेल्या चॅलेंजर या पहिल्या ब्रिटिश जहाजाने सर्वप्रथम सागरतळावरून धातूंचे गोटे मिळविले होते. चॅलेंजरवरील सर जॉन मरे या शास्त्रज्ञाने त्या गोटयांचे 'पॉलिमेटॅलिक नोडयूल्स' असे नामकरण केले तेव्हा, आणखी १०० वर्षांनी साऱ्या जगाचे डोळे या गोटयांकडे लागतील असे 'चॅलेंजर'वरील कुणाही संशोधकाला वाटले नसेल! सागरतळावर सापडणाऱ्या या धातूंच्या गोटयांमध्ये विविध धातूंचे प्रमाण इतके जास्त आहे की, आज सागरतळावर असलेल्या धातूंच्या गोटयांच्या केवळ १० टक्के गोटयांमुळे जगाची अनेक धातूंची गरज पूर्ण होईल. असा हा सागरतळावरील खजिना हस्तगत करण्यासाठी विकसित राष्ट्रांत चढाओढ लागली नाही तरच नवल; परंतु या क्षेत्रात पदार्पण करणारा भारत हा पहिलाच विकसनशील देश आहे.

तीनही महासागरांच्या तळावर अक्षरशः कोटयवधी टन इतका या गोटयांचा प्रचंड साठा आढळून आला आहे. दरवर्षी त्यामध्ये १ कोटी टन नव्या गोटयांची भर पडते आहे. दरवर्षी नव्याने निर्माण होणाऱ्या गोटयांमध्ये आढळणारे मँगेनीज हे त्या धातूच्या सध्याच्या जगातील वार्षिक वापराच्या तिप्पट असते. या गोटयांना सागरफळे असे म्हणतात, ते सार्थच आहे. कितीही गोळा करा, नवी निर्माण होतातच.


हे धातूंचे गोटे मातीच्या गोळयांसारखे दिसतात. आकार बटाटयासारखा, (३ ते १० सें. मी. रुंद) गडद तपकिरी ते काळा रंग, सच्छिद्र आणि छेद घेतल्यास त्यामध्ये कांद्याच्या छेदासारखे अनेक थर अशी त्यांची रचना असते. मध्यभागी एक अथवा दोन केंद्रे असून त्या ठिकाणी रेतीचा कण, चिखलाचा ठिपका, माशाचा दात अथवा खवला असतो. म्हणजेच हे गोटे एखाद्या केंद्राभोवती तयार होतात. गोटयामध्ये मॅंगेनीज व लोह हे धातू जास्त प्रमाणात व त्याबरोबरच शिसे, बेरियम, मॉलिब्डेनम, व्हॅनाडियम, क्रोमियम व टिटॅनियमसारखे दुर्मिळ व अत्यंत महत्त्वाचे धातू असतात.

पॅसिफिक महासागराच्या तळावर सर्वांत जास्त गोटे आहेत. तसेच त्यात दुर्मिळ खनिजांचे प्रमाण जास्त आहे. हिंदीमहासागरात सुद्धा विस्तृत क्षेत्रात गोटे आढळतात, भारतीय 'गवेषणी' जहाजाने गोळा केलेल्या गोटयांच्या संशोधनातून ते सुद्धा पॅसिफिक महासागरातील गोटयांच्या तोडीचे आहेत असे आढळून आले आहे. हे गोटे सागरतळावर अंथरल्यागत पसरलेले असतात. ते सागरात सतत होत असलेल्या गाळाच्या संचयनाखाली गाडले जात नाहीत. [सागरतळावर त्यांची छायाचित्रे घेण्यात आली आहेत. सामान्यपणे २००० ते ६००० मीटर्स खोलीवर हे गोटे आढळत असल्याने ते भूखंडापासून तसे दूरच असतात. गोटयांचे समूह काही ठिकाणी एक चौ. कि. मी. क्षेत्रात २० किलो तर काही ठिकाणी केवळ ५ किलो इतके आढळतात. जिथे ते दाट व जास्त असतात तिथे त्यातील उपयुक्त धातूंचे प्रमाण थोडेसे कमी असते. चौ. कि. मी. ला २½ ते १० किलोपर्यंत त्यांचे प्रमाण असेल तरच ते गोळा करणे किफायतशीर असते.


सागरतळावरील हा खजिना सहजासहजी लुटता येत नाही त्यासाठी प्रचंड प्रमाणात खर्च व नियोजनाची आवश्यकता असते. सर्वप्रथम सागरतळाचे सर्वेक्षण केले जाते. नंतर त्यावरील गोटयांचे प्रमाण जास्त असलेले भाग निश्चित केले जातात व सागरतळाची नेमकी जागा ठरविली जाते. शेवटी प्रत्यक्ष हे गोटे गोळा केले जातात. हे काम करणाऱ्या जहाजाला किमान ४ वर्षे इतका दीर्घकाळ सागरामध्ये राहावे लागते. ही जहाजेसुद्धा १५ लक्ष टन इतकी प्रचंड असतात. सामान्यपणे आपल्याला ज्ञात असलेल्या तेलसंशोधक जहाज व फलाटाचे वजन केवळ १५ हजार टन असते. अशा जहाजाने दर वर्षी ३० ते ४० लक्ष टन गोटे गोळा केले तरच हे सागरमंथन फायद्याचे ठरेल. या सागरमंथनाला आस्थापना, भांडवली खर्च, यंत्रसामुग्री सागरतळावरून गोटे गोळा करणे, जहाजातून ते किनाऱ्यावर आणणे आणि त्यावर प्रक्रिया करणे इ. साठी प्रचंड खर्च करावा लागतो. सामान्यपणे दरवर्षी १०लक्ष टन गोटे गोळा करण्याचा खर्च ३०० ते ८०० कोटी रु. असेल. अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी आत्तापर्यंत किमान तीन हजार कोटी रु. या व्यवहारात गुंतवले आहेत. अर्थात हा खर्च अविकसित राष्ट्रांच्या आवाक्याबाहेरचा आहे. विकसित राष्ट्रे सध्या अविकसित राष्ट्रांकडून धातुयुक्त खनिजे घेतात. त्यांसाठी त्यांना मोजाव्या लागणाऱ्या रकमेच्या तुलनेने वरील खर्च कमीच आहे; परंतु त्यांच्या या मोहिमेच्या यशाचे दुष्परिणाम अविकसित राष्ट्रांना भोगावे लागणार आहेत.

## धातूंच्या गोटयांची निर्मिती

सागरतळावर हे धातूंचे गोटे कसे निर्माण होतात हे एक मोठे कोडेच आहे. त्याची उकल करण्याच्या दृष्टीने गोटयांची काही वैशिष्टये लक्षात घेणे आवश्यक आहे. सागरतळावर गोटयांची पखरण फक्त एकेरी असते. म्हणजेच हे गोटे ढिगासारखे एकावर एक नसतात. सागरामध्ये प्रचंड वेगाने गाळाचे संचय होत असले तरीही हे गोटे गाळाखाली झाकले जात नाहीत. अगदी



१. हिंदी महासागरातील धातूंच्या गोळ्यांची क्षेत्रे (रेषांकित केलेली)



२. 'गवेषणी 'वरील प्रमुख यंत्रणा

नुकतेच ठेवल्यासारखे दिसतात. सागरतळावर १० लक्ष वर्षात गोट्यांची केवळ ३ मी. मी. इतकीच वाढ होते. गाळाचे संचयन याच्या हजार पटींनी जास्त असूनसुद्धा गोटे गाडले जात नाहीत हे मोठेच आश्चर्य.

प्रत्यक्ष गोटे निर्माण होण्याची प्रक्रिया लाखो वर्षांपूर्वी शार्कचा एखादा खवला किंवा दात अथवा अन्य कोणत्या तरी तशाच प्रकारच्या पदार्थाने सुरू झाली. समुद्राच्या पाण्यातील मॅंगेनीज क्षारांच्या साक्याची त्या पदार्थावर पुटे चढत गेली. त्यातच सागरीय ज्वालामुखीच्या उद्रेकाच्या वेळी बाहेर पडणाऱ्या धातूंचे व सागरजलातील धातूंचे अनेक थर गोट्यांवर घट्ट बसत गेले व असे गोटे निर्माण झाले असावेत. सागरतळावर प्रवाह आणि सागरी-जीव यामुळे ते सतत घरंगळत राहतात. त्यांची जागच्या जागीच उलथापालथ होत राहते आणि म्हणूनच ते गाळाखाली गाडले जात नाहीत. याबाबतीत समाधान होईल असा सिद्धांत पुढे येईपर्यंत आपल्याला वरील निष्कर्षावर विश्वास ठेवावा लागेल.

इ. स. १९८१ च्या जानेवारीमध्ये हिंदी महासागरामध्ये भारताने प्रथमच सागरी गोटे गोळा केले. त्यासाठी वापरलेले 'गवेषणी' हे जहाज कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रियल रिसर्च या संस्थेच्या मालकीचे होते. प्रत्यक्ष संशोधनकार्य पणजीच्या राष्ट्रीय सागर विज्ञान संस्थेने पार पाडले. १७ जानेवारीला गोव्याहून निघालेले हे जहाज मॉरिशसपर्यंत जाऊन ४८ दिवसांच्या सागरमंथनानंतर परत आले तेव्हा त्याचा १० हजार कि. मी. प्रवास पूर्ण झाला होता. १९०० टन वजनाचे हे जहाज ६८ मीटर्स लांब व १२ मीटर्स रुंद होते. वेगवेगळ्या ४ प्रयोगशाळा व १९ शास्त्रज्ञांची सोय त्यावर होती. ४८ दिवसांच्या मोहिमेमध्ये या जहाजाने हिंदीमहासागराच्या तळाची पाहणी केली. धातूंच्या गोट्यांचे नमुने गोळा केले आणि रसायन, भौतिकी व जीवशास्त्रविषयक संशोधन पार पाडले. गोळा केलेल्या गोट्यांवर देशातील १५ प्रयोगशाळांमध्ये संशोधन चालू आहे.


सागरतळावरील गोटे गोळा करण्यासाठी 'गवेषणी' जहाजावर आवश्यक त्या संशोधनासाठी अनेक सुविधा होत्या. अशा जहाजाला सागरामध्ये उपग्रहाच्या सहाय्याने स्थाननिश्चिती करावी लागते. तसेच भू-दळणवळणकेंद्राशी संपर्क प्रस्थापित करावा लागतो सागरी लाटा व प्रवाह यांचे मापन, खोल सागरतळावरील तपमानाचे आलेख, सागराची खोली इत्यादींचे मापन करण्याच्या यंत्रणा सज्ज असाव्या लागतात. सागरतळाची रचना समजून घेण्यासाठीसुद्धा स्वतंत्र यंत्रणा असते. गोटे गोळा करण्यापूर्वी सागरतळावरील चुंबकीय क्षेत्राची दिशा ठरविली जाते. प्रत्यक्ष गोटे गोळा करण्याचे काम तीन प्रकारांनी केले जाते. एका पद्धतीमध्ये सागरतळावर सोडलेले उपकरण तळाशी पोहोचताच हाताच्या मुठीसारखे बंद होते व ते काही गोटे उचलून

आणते. दुसरे एक यंत्र गाळ काढण्याच्या यंत्रासारखे असते. जहाजाबरोबर ते सागरतळावरून घासत जाते व अशा पद्धतीने गोटे गोळा केले जातात. तिसरे एक यंत्र बुमरँगसारखे असते. त्याला बुमरँग असेच नाव आहे. जहाजातून सागरामध्ये सोडलेले हे यंत्र वेगाने सागरतळाशी जाते. सागरतळाचा धक्का जाणवताच त्याच्या खालच्या बाजूस असलेल्या पाकळ्या मिटतात व त्यामुळे गोटे गोळा केले जातात. त्याच वेळी त्यामधील कॅमेऱ्याने सागरतळाचे छायाचित्र घेतले जाते. गोटे गोळा होत असतानाच या बुमरँगच्या वरच्या भागातील वजन बाहेर फेकले जाते व हलके झालेले बुमरँग उलट दिशेने सागरपृष्ठावर येते. जहाजापासून १५ कि. मी. परिसरात अशा बुमरँगचा शोध घेतला जातो. म्हणजे नुसते नमुने गोळा करणे हीसुद्धा किती अवघड गोष्ट आहे हे लक्षात येईल.

मेरूपर्वताची रवी आणि वासुकीची दोरी करून देव आणि दैत्यांनी सागरमंथन करून चौदा रत्ने बाहेर काढली, ही पुराणातील गोष्ट भारतीयांना नवी नाही. आता खरोखरीच सागरमंथन करून धातूंच्या गोट्यांचा मौल्यवान खजिना हस्तगत करायचा आहे. हे सागरमंथन करण्यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवलगुंतवणूक, तांत्रिक विकास आणि परिश्रमांची गरज आहे. □

### आकृती क्र. २ ची सूची

(१) उपग्रहनियंत्रण.
(२) भू–केंद्रनियंत्रण.
(३) रेडिओ, टेलिफोन, दळणवळण.
(४) हायड्रोकास्ट.
(५) लाटा–नोंदणी–दर्शक.
(६) तापमानलेखक.
(७) खोलीदर्शक.
(८) सागरतळदर्शक.
(९) गोटे उचलण्यासाठी यंत्रणा.
(१०) गोटे गोळा करण्यासाठी यंत्रणा.
(११) गोटे उचलणारे बुमरँग.



## दोन प्रतिक्रिया

पृष्ठ ३ वरून

४. मिस. पी. एल. पराशर – एम. एससी.

५. श्री. ए. जी. खानापूरकर – बी. ई. (सिव्हिल)

ही सर्व मंडळी योग्य शैक्षणिक पात्रतेची आहेत याबद्दल 'माणूस' तरी शंका घेणार नाही.

याच लेखात विष्णू जयदेव यांनी मौनी विद्यापीठाचा सूचक विपर्यस्त संदर्भाने उल्लेख केला आहे आणि त्यातही व्यक्ती 'टारगेट' बनविण्याची त्यांची दृष्टी दिसून येते. विष्णू जयदेवांना मौनी विद्यापीठाच्या इतिहास–भूगोलाची फारशी माहिती नसावी आणि असली तर ती ऐकीव असावी, अन्यथा त्यांच्याकडून असे उल्लेख झाले नसते. मौनी विद्यापीठाच्या सत्य इतिहासाची पुनर्मांडणी डी. वाय. नी केली आणि भूगोलही बदलला. तो स्वतंत्र लेखाचा विषय होईल. संदर्भापुरतेच बोलावयाचे झाल्यास मौनी विद्यापीठाशी डी. वाय. यांचा संबंध आला तोच मुळी १९७५–७६ मध्ये एक निष्पाप विद्यार्थ्याचा बळी पडल्यावर ! त्यातून उभा राहिलेला संघर्ष दडपून टाकण्याऐवजी डी. वाय. नी आपली शक्ती संस्थेच्या लोकशाहीकरणाच्या बाजूने टाकली. संस्थेच्या माजी अध्यक्षांनी संस्थेचे शिल्पकार, थोर शिक्षणतज्ज्ञ, तपस्वी, पद्मश्री डॉ. जे. पी. नाईक यांना संस्था सोडून जाण्यास १९६४–६५ मध्ये भाग पाडले होते. त्या महर्षींना डी. वाय. नी संस्थेत सन्मानाने पुन्हा आणले ! दुर्दैवाने नाईकसाहेब अचानक गेले. अन्यथा संस्थेच्या विकासास, वाढीस त्यांचे नेतृत्व न मार्गदर्शन लाभले असते. डी. वाय. नी संस्थेच्या संस्थापक संस्था– इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन मुंबई आणि कोरगावकर धर्मादाय संस्था, कोल्हापूर यांना विद्यापीठाच्या कार्यात आणि घटनेत सन्माननीय स्थान मिळवून दिले.

### भूगोल

डी. वाय. नी. विद्यापीठाचा भूगोलही सहकाऱ्यांच्या सहकार्यातून बदलला. १९७५–७६ च्या प्रमुख घटनांची नोंद अशी–(१) १९७५-७६ पूर्वी कर्मचाऱ्यांकडून सक्तीने घेतली जाणारी वार्षिक ६० ते ७० हजाराची पगारकपात बंद केली. (२) विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांना शोषणमुक्त सेवा–सुरक्षितता दिली. (३) नवीन चार माध्यमिक शाळा सुरू केल्या. (४) शासकीय अनुदानप्राप्त आय. सी. आर. ई. (पॉलिटेकनिकचा) प्रवेशक्षमता ६० वरून १८० वर नेली. (५) विज्ञानविद्याशाखेचा आरंभ, विविध विद्याशाखांच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांचा आरंभ (६) साडेतीन लाखाच्या बी. एड. कॉलेज इमारतीचे बांधकाम, प्रशालेच्या साडेचार लाखांच्या विस्तारित कामाचा आरंभ आणि याहीपेक्षा संस्थेकडून मानधन, प्रवासभत्ता न घेता स्वतःच्या एक लाख रुपयांच्या देणगीची घोषणा नि त्यापैकी २५०००।– रोख देणगी, मा. नाईकसाहेबांच्या स्मारकउभारणीसाठी, दहा हजार रुपयांच्या पुतळ्याची वैयक्तिक देणगी ! संस्थेचे शोषण करून जगण्याच्या जुन्या प्रवृत्तीचा उच्छेद म्हणजे मौनी विद्यापीठाच्या इतिहास–भूगोलाची नवी मांडणी. डी. वाय. नी ती केली; पण ती दिसण्यासाठी किमान गुणग्राहकता हवी !

प्रा. ज. ना. कळके, गारगोटी-
सदस्य, लोकल मॅनेजिंग कमिटी.
रामराव आदिक इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी
कॉलेज ऑफ इंजि. मुंबई, वाशी.

## ( २ ) मांडणी काहींना अन्यायकारक

ह्या शिर्षकावरूनच हा लेख स्वच्छ हेतूने लिहिलेला नसून रामराव आदिक, डी. वाय. पाटील, गारगोटी विद्यापीठ इत्यादींवर चिखलफेक करण्यासाठी लिहिला आहे हे उघड आहे. विषय योग्य असला तरी मांडणी काहींना अन्यायकारक आहे व पक्षपाती वाटते, तस्मात् हे लेखन !

रामरावांच्या नावाने टीका करणाऱ्या विष्णू जयदेवास वसंतदादा पाटील, हिरे, सुधाकर नाईक, तात्या कोरे इत्यादींच्या कॉलेजमधले घोळ दिसत नाहीत काय ? शेगावच्या कॉलेजला इंजिनिअर नसला तरी चालेल अशी प्राचार्यविषयकची जाहिरात काय दाखवते ? व काही विद्यार्थ्यांनाच शिकवण्याचेही काम दिले आहे म्हणे. साखर कारखान्यांनी काढलेल्या कॉलेजविषयी लेखक अवाक्षर काढत नाहीत. प्रवरानगरला प्रत्येक विद्यार्थ्याकडून (१०% नव्हे) पैसे मागण्यात येत होते अशी तक्रार ऐकली. वारणानगरला अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी खास वसतिगृहे दिली आहेत (पंखा वगैरे). प्राध्यापकांना लोभवण्यासाठी घरे राहावयास द्यायची तर जुन्या कला वाणिज्य विद्यालयांतील प्राध्यापकांना हुसकून देणे सुरू झाले आहे. इतकेच नव्हे तर ही महाविद्यालये बंद करण्याच्या दिशेने पावले पडताहेत. शास्त्राचा आधार आहे म्हणून काही काळ तो विभाग चालू राहिलसे दिसते. ह्याविषयी माहिती मिळवून विष्णू जयदेवांनी लिहावे.

पेण, तुळजापूर, उस्मानाबाद इ. इ. नकाशात वाचल्यावरच आहेत असे लक्षात येणाऱ्या गावी कॉम्प्यूटर, इलेक्ट्रॉनिक विषयांचे अभियांत्रिकी कॉलेज काढले !

नांदेडच्या कॉलेजला दोन वर्षे होतील. अजून पुण्यासच प्रयोग करण्यासाठी विद्यार्थी येत आहेत. ही सरकारची स्थिती. मग इतर ठिकाणी काय होईल ?

ह्यामागे केवळ पैशाचा हेतू आहे. 'कर्नाटकात जाणारा पैसा महाराष्ट्रांतील पैसेवाल्यांना मिळावा' हा एकच हेतू इतकी महाविद्यालये काढण्यात आहे.

रामराव आदिक कॉलेज चालणार. त्यांनी प्रवेश देतानाही काटेकोरपणे अगदी व्ही. जे. टी. आय. मधल्या लोकांच्या मदतीने, तशाच पद्धतीने गुणक्रमानुसार प्रवेश दिला. साखरकारखानेवाल्यांनी हे केले नाही. (वारणानगरला तर विद्यार्थीच कमी आहेत म्हणून कर्जाची सोय वारणेचे कॉलेज करणार आहे व विद्यार्थ्यांना बोलवीत आहे अशीही वार्ता). मुंबईच्या वा शहरांच्या जवळपास असलेल्या

विद्यालयांचा प्रश्न नाही. सुरुवातीच्या १-२ वर्षानंतर त्यांचे सर्व सुरळीत होईल. अगदी आय. आय. टी. लाही सुरुवातीस व्ही. जे. टी आय. ची मदत घ्यावी लागली होती. परंतु ह्या जिल्हा तालुकावाल्या साखरसम्राटांच्या 'सहकारी' सोसायटयांच्या कॉलेजमध्ये मात्र काहीही शिकवले जाणार नाही. विष्णु जयदेवांनी कर्मवीर भाऊराव पाटलांचे उदाहरण दिले; परंतु नंतर त्याच रयतशिक्षणसंस्थेने कला वाणिज्य शास्त्र महाविद्यालये काढताना असेच सर्व प्रकार केले होते व चालू आहेत.

अभियांत्रिकी महाविद्यालयाची मान्यता काढून घेणे शक्य नाही. ही कल्पनाही अत्यंत चुकीची आहे. असलेल्या विद्यार्थ्यांची सोय दुसऱ्या महाविद्यालयात करून त्या कॉलेजकडून भरपूर नुकसानभरपाई घेता येईल व महाविद्यालय बंद करता येईल किंवा कारखाने किंवा गिरण्या– 'बंद पडलेल्या' सरकार ताब्यात घेते ना ? तसा हा कारखानाही ताब्यात घेईल.

ह्या नवीन अभियांत्रिकी महाविद्यालयांची व दारूच्या परवान्याची तुलना लेखकाने केली आहे. दुर्दैवाने महाविद्यालये ( अभियांत्रिकी असो की कलावाणिज्यशास्त्र असो) काढणे हे दारूच्या दुकानापेक्षा सोपे आहे, असे दिसते खरे. कदाचित आजची महाविद्यालये ही उद्याची दारूची दुकानेही ठरतील ! परंतु कदाचित ग्रामीण भागातून चांगले इंजिनिअर्स तयार होतीलही. शिकवण्याची भाषा मराठी केली पाहिजे हे आवश्यक आहे. नवीन अभियांत्रिकी महाविद्यालये काढणे चूक नाही. परंतु कुठल्या विषयाचे कुठे असावे ह्याचे तारतम्य सुटले आहे, ही चूक पुढच्या वर्षी दुरुस्त करता येईल. कारण सर्वच महाविद्यालयातील पहिल्या वर्षाचे शिक्षण समान असते. नवीन विषयांचा विषयक्रमही ठरायचा आहे. (जो दुसऱ्या वर्षापासून शिकवला जाईल) तेव्हा सर्वांनी एकत्र बसून 'विद्यार्थ्यांचे नुकसान न करणे' हाच मुख्य हेतू धरून पुनश्च अभियांत्रिकी विषयांची फेरवाटणी करावी. ज्या भागात विषयास योग्य असे वातावरण, प्रयोगशाला, कारखाने इत्यादी आहेत तिथे ते विषय सुरू करावे. नसलेल्या ठिकाणी ते काढू नयेत. ऐवजी 'स्थापत्यासारखे विषय घ्यावेत. जिथे बंदर नाही तिथे नेव्हल् (आरमारी) विषय सुरू करायचा, खाणी नाहीत तिथे मायनिंग (खाणकाम) विषय सुरू करायचा हे जितके हास्यास्पद तितकेच पेणला इलेक्ट्रॉनिक वा तुळजापूरसारख्या गावी कॉम्प्युटर विषय देणे हास्यास्पद आहे.

काही महाविद्यालयात कमी विद्यार्थी आहेत. त्याचा परिणाम अगदी सामान्य विद्यार्थ्यांनाही प्रवेश मिळण्याकडे साहजिकच होत आहे. शिक्षक चांगले मिळणे आज सरकारी महाविद्यालये व व्ही. जे. टी. आय सारखी कीर्तीवंत महाविद्यालये यांनाही शक्य होत नाही ते ह्या नव्यांना कसे व कितपत शक्य आहे. पुन: मुंबई पुण्याजवळच्या (कारखाने व महाविद्यालये असलेल्या) भागांत अधिक पगाराच्या अपेक्षेने माणसे येतील; परंतु शेगावला कोण जाणार ? मग असे प्राध्यापक असे विद्यार्थी ह्यातून कसे विशारद तयार होतील हे सांगावयास ज्योतिषी नको. त्यासाठी ही अनेक महाविद्यालये अजूनही सहकारी तत्त्वांवर दोन-तीनांचा जवळच्यांचा एक समूह करून चालवावी. ७०% वरील विद्यार्थ्यांसाठी किंवा अशी काही मर्यादा आखावी. कदाचित सारे हळूहळू स्थितिस्थापकत्वाने व्यवस्थित जमून जाईलही. पहिल्या काही बॅचेस्ना त्रास भोगावा लागेल आणि मग नको तो भाग जाऊन चांगले पीक येईलही. असे न घडता जर इंग्रजी माध्यमामुळे व अनपढ शिक्षक व मठ्ठ विद्यार्थी ह्या योगायोगामुळे चार-सहा वर्षांनंतर जर अनभिज्ञ इंजिनिअर्स बाहेर पडले तर आखाती देशातून परतलेल्या बेकारांच्या तांड्यात त्यांची हजारोने भर पडेल आणि मग जे घडेल ते अभूतपूर्व असेल. त्याविषयीची काही योजनाही करून ठेवणे आवश्यक आहे. तसेच आता आणखी महाविद्यालयांना परवानगी न देणे अत्यावश्यक आहे. कारण मोठी चूक अनेक(शंभरेक) विद्यालये व निकेतने एकदम काढली ही आहे. त्याचे दुष्परिणाम विविध प्रकारे होतील. ह्याबाबतीत कुटुंबनियोजनाची गरज आहे. एकदम तिळेच झाले ! तेव्हा आता नवीन वाढ बंद करणे अत्यावश्यक आहे.

श्री. करंजियांच्या पद्धतीचे आपण छापल्याने हे लिहिले आहे. योग्य वाटल्यास छापा. नाही तरी इतकेच समजेन की 'माणूस' (हा माणूसही) बदलला !

– निरंजन गाडगीळ, मुंबई

□

## वर्गणीदारांना सूचना

वर्गणीदारांना दिवाळी अंक वर्गणीतच दिला जातो. ज्यांना दिवाळी अंक रजिस्टर्ड पोस्टाने पाहिजे असेल त्यांनी दि. १५–१०–८३ पर्यंत चार रुपये म. ऑ. ने पाठवावेत.

अंक व्यवस्थित मोजून पोस्टाच्या ताब्यात दिले जातात. तरीही अंक न मिळाल्यास प्रथम स्थानिक पोस्टाकडे चौकशी करावी. तेथे लेखी तक्रार द्यावी व तक्रारीची एक प्रत आमच्याकडे पाठवावी.

अंक शिल्लक असल्यासच व रजिस्टर्डसाठी चार रुपये पाठविल्यासच अंक पुन्हा पाठवू.

ज्यांची वर्गणी ३० सप्टेंबर किंवा त्या सुमारास संपली असेल व ज्यांची पुढील वर्षाची वर्गणी जमा नसेल त्यांना दिवाळी अंक पाठविला जाणार नाही.

जे वर्गणीदार सा. माणूस कार्यालयातून दिवाळी अंक समक्ष नेणार असतील त्यांनी समक्ष वा पत्राने दिनांक १५–१०–८३ पर्यंत लेखी कळवावे.

# नाट्यमन्वंतर निर्मिती आणि अखेर

## गाव वाहून गेलं
## पण नाव मात्र राहिलं....

मराठी नाटक आणि रंगभूमीच्या क्षेत्रात 'आंधळ्यांची शाळा' आणि 'नाट्यमन्वंतर' यांच्या बाबतीत असेच काहीसे घडले आहे.
अनंत काणेकर, के. नारायण काळे, केशवराव दाते, पार्श्वनाथ आळतेकर, केशवराव भोळे-ज्योत्स्ना भोळे ही नावे या मराठी रंगभूमीवर मन्वंतर घडवणाऱ्या चळवळीशी निगडित असलेली.

हे 'मन्वंतर' कसे घडून आले ?

या मन्वंतराची सुरुवात कशी झाली ?

अखेर का झाली ? कोणामुळे झाली ?

कै. के. नारायण काळे यांनी पूर्वीच यासंबंधी एक सडेतोड आत्मपरीक्षणात्मक लेख लिहून ठेवला होता; पण अद्याप तो अप्रकाशित राहिला. मराठी नाटक व रंगभूमीक्षेत्रात वावरणाऱ्या सर्वांनाच— नव्यांना आणि जुन्यांना, प्रायोगिकतावाद्यांना आणि व्यावसायिकांना— उद्बोधक वाटेल असा प्रदीर्घ लेख—

यंदा 'नाट्यमन्वंतर' व 'आंधळ्याची शाळा' या नाटकाला पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत—त्या निमित्ताने.

## शिवाय

पद्मजा फाटक — नारायण धारप

सुधा नरवणे — राजन खान

विनया खडपेकर — कर्नल जाधव

यांच्या सहा उत्कृष्ट कथा !

अशा विविधरंगी समृद्ध साहित्यानं आणि आकर्षक मुखपृष्ठानं सजलेला

# दिवाळीचा आनंद पानापानानं वाढवणारा

# माणूस दिवाळी अंक ८३

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage–No. 11 ) Regd. No. PNCW–28

# रंगलेल्या तीन रसरशीत मुलाखती...

## एक संपादक / एक कवी

गेली ३०।३५ वर्षं साहित्यातले नवनवीन प्रवाह ज्यांनी आत्मीयतेनं, डोळसपणानं निरखून–तपासून पाहिले; पडद्यामागे राहून साहित्यातल्या प्रायोगिकतेला जाणीवपूर्वक वाव दिला असे सत्यकथा–मौजचे संपादक **श्री. पु. भागवत** यांची प्रसिद्ध कवी **मंगेश पाडगावकर** यांनी घेतलेली वैशिष्ट्यपूर्ण समग्र मुलाखत

□

## एक चित्रकार / एक लेखक

व्यंगचित्र–कलाक्षेत्रात आपल्या टोकदार, उपरोधिक रेषेनं ज्यांनी स्वतःचं वेगळं स्थान निर्माण केलं, व्यंगचित्रकलेची स्वतंत्र शैली निर्माण केली ते प्रसिद्ध व्यंगचित्रकार **वसंत सरवटे** यांच्याशी बोलताहेत त्यांचे जवळचे मित्र, त्यांच्याच शैलीत लिखाण करणारे प्रसिद्ध साहित्यिक **जयवंत दळवी.**

सरवटेंबद्दल आणि अर्थातच त्यांच्या चित्रांबद्दल.

□

## एक दिग्दर्शक / एक पत्रकार

वयाच्या आठव्या वर्षी तिचं पहिलं पुस्तक ' मुलांचा मेवा ' प्रसिद्ध झालं. मग शाळा–कॉलेजच्या अनेक नाटकांत तिनं ढिगानं बक्षिसं मिळवली. आकाशवाणीवर ती सगळ्यांची लाडकी बालोद्यानची ' ताई ' होती. चिल्ड्रन थिएटर–नाट्यद्वयी ... दूरदर्शन आणि नंतर चष्मेबद्दूर ... कथा ... बिच्छू

प्रत्येक माध्यमात आनंदाने बागडलेली आजची लोकप्रिय दिग्दर्शक **सई परांजपे** यांची तशीच हसरी मुलाखत ... **मेधा राजहंस**

# श्रीकृष्ण : एक मोठे स्वप्न

श्रीकृष्ण हा ऐतिहासिक पुरुष असेल वा नसेल; पण या संकल्पनेने ( Concept ) भारतीय समाजकारण, राजकारण, तत्त्वज्ञान सारेच भारावलेले आहे. या संकल्पनेचे व उद्याच्या तरुण-तरुणींचे काही नाते आहे का ?

**श्याम ते श्रीकृष्ण**

**आनंदसागर ते पूर्णपुरुष**

**राजकारणी रणछोडदास ते गुरुमाउली**

श्रीकृष्णाच्या या अनेक रूपांतून हे नाते शोधण्याचा एक हळुवार प्रयत्न. अमेरिकेत असलेल्या नातवांना अनेक पदव्या धारण केलेल्या आणि जग हिंडून आलेल्या ' भारतीय ' आजोबांनी लिहिलेली ही पत्रे–

# माणूस दिवाळी ८३